सोलापूर तरुण भारत

# आसमंत



**दसरा हा विजयाचा सण असल्याने षड्रिपूंवर विजय हे आपले ध्येय असायला हवे. सकारात्मकतेचे, सामर्थ्याचे, मैत्रीचे सोने वाटणे हाच खरा दसरा असायला हवा. आजच्या भौतिक सुखाच्या मागे धावणाऱ्या तरुण पिढीवर योग्य संस्कार करण्याची जबाबदारी आपलीच आहे. सण म्हणजे 'धम्माल' हे खरे असले, तरी त्याचे रूपांतर धांगडधिंगा आणि उन्मादात होऊ नये. हा संयम आणि विवेक पुढील पिढीत रुजवणे ही काळाची गरज आहे.**



# दसरा : गरज वैचारिक सीमोल्लंघनाची

विशेष

**साधना कुलकर्णी**

हल्ली मोबाईल किंवा टीव्हीवर 'द ग्रेट इंडियन फेस्टिव्हल' ही 'ॲंझॉन सेल'ची जाहिरात दिसायला लागली की समजावे, सणासुदीचे दिवस आले आहेत... म्हणजेच सण आले की खरेदी करायची, हे समीकरण बाजारपेठेने आपल्या मेंदूवर कोरून ठेवलेय. नखशिखान्त दागिन्याने मढलेल्या, उंची तलम वस्त्रे ल्यायलेल्या अत्यंत देखण्या स्त्रिया चुटकीसरशी विविध प्रकारच्या मिठाया स्वतः तयार करून घरच्यांना आग्रह करून खाऊ घालणारी जाहिरात दिसली की समजावे सण आलेत. (अशा महान स्त्रिया शोधा आणि हजार रुपये मिळवा, अशी माझी फार दिवसांची इच्छा... असो.) मुद्दा हा की, सध्या समाजात प्रामुख्याने दोन प्रकारचे समूह दिसतात. सण असले की, निर्बुद्ध मालिकेत बघितलेल्या सणांचे उत्सवी, पोषाखी अनुकरण करणारा एक समूह... हे म्हणे संस्कृतीचे (?) जतन करतात आणि दुसरीकडे कायम अर्ध्या चड्ड्या घातलेला, दाढीचे खूट वाढलेला, वर्षभरात कंगवा न लागलेले विस्कटलेले केस असणारा, सदैव लॅपटॉप बडवणारा... यांना दिवस-रात्र आंघोळ, जेवण, झोप, सणवार... यांच्याशी कवडीचेही देणे-घेणे नसते. ओटीटीवर आवडत्या सीरियलचा दुसरा/तिसरा सिझन येई, तोची दिवाळी दसरा, असेच असावे कदाचित. आणि या दोन टोकांच्या मध्ये असणारी आमची मध्यमवयीन पिढी. एकीकडे लहानपणी साजऱ्या केलेल्या सणांचा सात्त्विक आनंद शोधण्याची धडपड तर दुसरीकडे सणांचे श्रेयस पकडून ठेवण्याची असमर्थता. हे सगळे लिहिण्याचे कारण म्हणजे येऊ घातलेला दसरा. दसरा दिवाळीची चाहूल हीच मुळात ऊर्जादायक असते, पण ती केव्हा? बदललेला ऋतू याची हळुवारपणे जाणीव करून देतो तेव्हा... सोनपावलांनी येणारा आश्विन महिना येतानाच भक्ती आणि शक्तीचा संदेश घेऊन येतो. आश्विनातले लख्ख केशरी ऊन, मोकळी हवा, निरभ्र आकाश, टिपूर चांदणे, पिवळ्या-नारिंगी झेंडूंनी रंगलेला निसर्ग... सगळेच कसे मेंदूला चेतवणारे असते. आश्विनाच्या हवेतच ऊर्जा असते. नऊ दिवस केलेली जगदंबेची उपासना आणि दहाव्या दिवशीचा दसरा... सगळेच दिवस चैतन्याने रसरसलेले असतात. त्यात मनुष्यप्राणी हा उत्सवप्रिय आहे. भारतीय संस्कृतीमध्ये अत्यंत कल्पकतेने आणि योजकतेने या सण-उत्सवांची रचना केली आहे. प्रत्येक सणामागे एक निश्चित विचारांची बैठक आढळून येते; त्याच वेळी येणाऱ्या ऋतूचे स्वागत केले जाते. सोबतच आरोग्याचा एखादा नियमही जोडला जातो.



जीवनप्रणाली, विचारप्रणाली आणि उपासनाप्रणाली या तिन्हींचे उन्नयन या सणामुळे व्हावे हे अपेक्षित असते. शुष्क उपदेश सांगितले असते तर ते टाळण्याकडेच माणसाची प्रवृत्ती असते, पण सणावारांच्या माध्यमातून आणि प्रतीकांचा उपयोग करून ही संस्कृती आपल्या जीवनात रुजवली गेली आहे. सण- उत्सवांद्वारे मन प्रसन्न होते, कौटुंबिक संबंध दृढ होतात, सामाजिक जाणिवा व्यापक होतात तर प्रतीकांद्वारे बुद्धीचा विकास होतो. भारताचा सांस्कृतिक इतिहास हा पुस्तकांच्या पानात नाही, तर त्याच्या जिवंत उत्सवात लिहिला आहे. त्यामुळे प्रत्येक सणाचे ऐतिहासिक, पौराणिक, धार्मिक व शास्त्रीय माहात्म्य आपल्याला माहीत असायला पाहिजे. कारण सणांचा संबंध देहाच्या आणि मनाच्या आरोग्याशी तर आहेच; पण आत्मिक समाधानाशीही आहे. मानवी जीवन कौटुंबिक, मानसिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक स्तरावर अधिकाधिक समृद्ध करायचे असेल तर सण- उत्सवामागचा दृष्टिकोन लक्षात घ्यायला हवा.

काळ आणि परिस्थितीनुसार कालबाह्य आणि निरुपयोगी प्रथा मोडीत काढून सणांगचे तत्त्व आणि विज्ञान शाबूत ठेवणे गरजेचे आहे. या दृष्टीने दसऱ्याचा सण म्हणजे विजयाचा उत्सव आहे. या सणासंबंधी अनेक पौराणिक कथा प्रचलित आहेत. प्रभू रामचंद्रांनी रावणाचा पराजय करण्यासाठी लंकेवर स्वारी केली आणि आश्विन महिन्यातल्या दशमीला रावणाला ठार मारले म्हणून या दिवसाला विजयादशमी म्हणतात. दुसरी कथा महिषासुरमर्दिनी देवीची आहे. पृथ्वीवरील जनतेचा छळ करणाऱ्या महिषासुराचा नि:पात करण्यासाठी देवाने अष्टभुजा देवीचे रूप धारण करून, दहा दिवस युद्ध करून वध केला म्हणूनही या दशमीला विजयादशमी म्हणतात. म्हैसूरला याच देवीला चामुंडेश्वरी या नावाने संबोधतात. रघुराजाने विश्वजित यज्ञ केल्यामुळे त्याचा खजिना रिकामा झाला होता. अशात चौदा विद्या पारंगत असलेला कौत्स त्याच्याकडे दान मागायला आला. याचकाला विन्मुख पाठवणे ही रघुराजाची संस्कृती नव्हती. म्हणून द्रव्य संग्रहासाठी त्याने इंद्रावर स्वारी केली.

रघुराजाच्या अचाट पराक्रमाची कल्पना असल्यामुळे इंद्राने युद्धाचे कारण जाणून घेतले आणि कुबेराला रात्री शमी आणि आपट्याच्या वृक्षांवर सुवर्णुद्रांचा वर्षाव करण्याची आज्ञा दिली. रघुराजांनी कौत्साला या संपत्तीचे दान दिले. आवश्यकतेपेक्षा एकही सुवर्णुद्रा जास्त घेणार नाही, हा कौत्साचा निश्चय होता तर या द्रव्याने मी माझी तिजोरी भरणार नाही, हा रघुराजाचा आग्रह होता. शेवटी हे सोने लुटून घेण्याचा आदेश त्याने जनतेला दिला. लोकांनी त्या झाडाची पूजा करून ते सोने लुटून घरी आणले, तो दिवस होता आश्विन शुद्ध दशमीचा. तेव्हापासून या झाडाची पाने सोने म्हणून लुटण्याचा प्रघात आहे. पांडवांनीदेखील अज्ञातवासात असताना आपली अस्त्रे-शस्त्रे शमी वृक्षाच्या ढोलीत लपवून ठेवली होती.

इतिहासाचा मागोवा घेतल्यास विजयादशमीचा मुहूर्त मोहीम सुरू करण्यासाठी महत्त्वाचा होता, हे दिसून येते. शिवाजी महाराज, पेशवे याच मुहूर्तावर कूच करत असत, अशी इतिहासात नोंद आहे. हा सण साजरा करत असताना सीमोल्लंघन करण्याची पद्धत आहे. ईशान्य दिशेला असलेल्या शमी किंवा आपट्याच्या वृक्षाची पूजा करताना, शमी शमयते पापम्, शमी लोहित कंटका। धारिण्य अर्जुनं बाणानाम्, रामस्य प्रिय वादिनी। तसेच, अश्वंतक महावृक्ष, महादोष निवारणम्। इष्टानां दर्शनम् देहि, कुरु शत्रुविनाशनम्। अशी प्रार्थना म्हणून नंतर शमी तसेच आपट्याची पाने आणायची असतात. ही पाने म्हणजे सुवर्ण मुद्रांचे प्रतीक आहे. ही पाने आपण देवाला वाहतो, वडीलधाऱ्यांना, मित्रांना देतो. मला हे जे वैभव मिळाले आहे, त्याचा उपभोग मी एकटा घेणार नाही तर सगळ्यांना वाटून या आनंदाचा गुणाकार करायचा, ही कल्पनाच किती उदात्त आहे. मित्रांबरोबर शत्रूशीही प्रेमाचे नाते जोडायचे हा दसऱ्याचा संदेश आहे. या दिवशी शस्त्र लेखणी, वाहनांची पूजा करतात. म्हणजे आपली शक्ती वाढवणाऱ्या साधनांचे पूजन करून कृतज्ञता व्यक्त करण्याची ही कल्पना किती अभिनव आहे... या दिवशी रावणाचे दहन करतात. याद्वारे मनातली दुष्ट वृत्ती नष्ट होऊन रामप्रवृत्तीचा उदय होण्याची प्रेरणा मिळणे अपेक्षित आहे. या सगळ्या पद्धती प्रतीकात्मक आहेत. पौराणिक कथा या कपोलकल्पित असतीलही; पण लहानपणी अशा कथांवर विश्वास बसतो आणि त्यातून मिळणारा संदेश संस्काररूपात रुजत जातो. हे बालवयात झालेले संस्कार मनाला संयमी आणि विवेकी करतात आणि पुढील आयुष्यात सण साजरे करताना कधी वावगे वागू देत नाहीत. आश्विन महिना म्हणजे शरद ऋतू. आयुर्वेदानुसार या काळात शरीरातील पित्त प्रभावी असते. पित्त म्हणजे बुद्धी, पराक्रम. अशा वेळी प्रत्येकानेच एका चौकटीत बंदिस्त न राहता सीमोल्लंघन करावे,

(पान ४ वर)



# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा इतिहास

**प्रत्येक विचारधारेचा अभ्यास हा वस्तुनिष्ठपणे झाला पाहिजे. तो विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे. ही सत्यता नाकारता येणार नाही. म्हणून संघाच्या कार्याचा अभ्यासही वस्तुनिष्ठपणे करणे महत्त्वाचे वाटते. इतिहासाचे पुनर्लेखन हे होत असते. तथ्य संकलित करून शोधनाच्या आधारे घटनेचा अन्वयार्थ लावून नवीन माहिती मिळविली जाते. त्याच पद्धतीने संघकार्याबद्दल जे संशोधन झाले, त्या आधारे संघाचे राष्ट्रबांधणीतील योगदान हे दुर्लक्षित करून चालणार नाही! विजयादशमच्या दिवशीच 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली. त्यानिमीत्त...**

निमित्त

**डॉ. सतीश चाफले**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील बी. ए. द्वितीय वर्षातील चौथ्या सत्राच्या पाठ्यक्रमात, 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे राष्ट्रबांधणीतील योगदान,' या विषयावर आधारित प्रकरणाचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे तथाकथित विचारवंत, डावे इतिहास अभ्यासक तसेच काही विद्यार्थी संघटना अगदी अस्वस्थ झाल्या आहेत. प्रसारमाध्यमातून यावर बोचरी टीका होऊ लागली.

वृत्तवाहिन्यांवरील चर्चांध्ये वादविवादाचे महानाट्यही चांगलेच रंगले. विद्यार्थी संघटनांचे मोर्चे निघाले. राजकीय पक्षांच्या प्रवक्त्यांचा इतिहासासारख्या विषयावर बोलतानाचा आवेशही बघण्यासारखा होता. या सर्व गदारोळात अभ्यासमंडळाला धारेवर धरण्यात आले. प्रसंगी अभ्यासमंडळाने हा भाग अभ्यासक्रमातून हटवावा म्हणून दबावही टाकण्यात आला. पण, या सर्व गदारोळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या राष्ट्रबांधणीतील योगदानाची चर्चा का झाली, त्या मागची कारणे काय, हा इतिहास पाठ्यक्रमात का आला, याची तात्त्विक बाजू समजून घेण्याची कुणी साधी तसदीही घेतली नाही. म्हणून इतिहासाच्या दृष्टिकोनातून संघाच्या कार्याकडे बघत असताना त्याचे योगदान काय? व इतिहासातील लेखनाच्या परंपरा आणि प्रवाह यांचा संबंध अधोरेखित करून, संघाच्या कार्याचा उल्लेख, योगदानाची चर्चा पाठ्यक्रमात केली गेली आहे. ती कशी? तर त्याची तात्त्विक बाजू समजून घेणे आवश्यक आहे. इतिहास म्हणजे काय? घडून गेलेल्या महत्त्वाच्या घटनांची माहिती पुढील पिढीसाठी जतन करून ठेवणे म्हणजे इतिहास होय, असे हिरोडोट्स म्हणतो. अर्थात, घडणाऱ्या सर्व घटनांची माहिती संकलित करून, पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे काम इतिहास करतो. मुळात इतिहासाच्या अभ्यासाचा केंद्रबिंदू हा मानव असून, मानव हा समाजशील प्राणी आहे. मग मानवाचा अभ्यास करताना समाजाचाही अभ्यास करावा लागतो. समाजातील घटनांचाही अभ्यास करावा लागतो. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व आर्थिक या चहूबाजूने इतिहास घटनांची मांडणी करीत असतो. समाज, राज्य, राष्ट्र यातील सर्व घडामोडींचा अभ्यास हा इतिहासाच्या कक्षेतच येतो. हे विश्लेषण करताना समाजातील सर्व संस्था, संघटना, विचार, विचारधारा इत्यादी सर्व बाबींचा तपशीलवार अभ्यास इतिहास करतो. मग हा इतिहास कशासाठी समजून घ्यायचा, तर तो भविष्यात चुका होऊ नये म्हणून. ज्या राष्ट्राला इतिहास नाही ते राष्ट्र कधीही प्रगती करू शकत नाही. म्हणून जर का समाज व राष्ट्र बलशाली करायचे असेल, तर इतिहास माहीत असणे अनिवार्य आहे. इतिहासाची मांडणी करताना पाश्चात्त्य इतिहासकारांनी इतिहासाला सामाजिक शास्त्राचा दर्जा दिला व इतिहास मानव विज्ञान शाखेतील विषय झाला. रॉबीन कॉलिंगवूड हा इतिहासतज्ज्ञ इतिहासावर भाष्य करताना म्हणतो की, इतिहास म्हणजे केवळ घटना नसून घटनांची अर्थपूर्ण मांडणी होय. त्यासाठी घटनांागील विचार उलगडून दाखविणे गरजेचे आहे. असे म्हणून तो इतिहासातील घटनांना विचारांचे अधिष्ठान आहे, हे सिद्ध करतो. म्हणजेच इतिहास हा विचाराधारांचाही अभ्यास करतो. मग विचारधारांना इतिहासात किती महत्त्वाचे स्थान आहे, हे दिसून येते. म्हणून मग गांधीवादी विचारधारा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार हे किती महत्त्वपूर्ण आहेत, याची प्रचीती विद्यापीठातील स्थापन झालेल्या स्वतंत्र विभागाच्या अभ्यासक्रमातून येते. जगाच्या इतिहासावर कटाक्ष टाकताना, अमेरिकन राज्यक्रांती का झाली? या मागची कारणे कोणती? फ्रेंच राज्यक्रांतीचे परिणाम कोणते? तर रशियन राज्यक्रांतीमागील विचारधारा कोणती होती, याचाही तपशीलवार अभ्यास इतिहास करतो व या सर्व घटना पाठ्यक्रमातून आम्ही शिकतो, शिकवितो. म्हणून भारतीय शालेय पाठ्यक्रम ते पदवी-पदव्युत्तर अभ्यासक्रमात या सर्व घटना आम्ही शिकलो, हेही तेवढेच मोठे सत्य आहे.

वरील सर्व विचारधारांचा अभ्यास आम्ही केलाच ना? मार्क्सचा मार्क्सवाद, नव मार्क्सवाद व डाव्यांचा साम्यवादही शिकलो आणि सामंतवादी युगही अभ्यासले. मग सर्व विचार व विचारधारेचा अभ्यास करताना संघाच्या विचारधारेलाच विरोध का? हा प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे. या घटनेवरून जे वातावरण सध्या देशात तापले आहे त्याला द्वेषाची किनार तर नाही? असाही प्रश्न पडतो की, आपली मानसिकता अजूनही व्यापक झाली नाही का? इतिहासाकडे आम्ही कसे बघतो, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. ब्रिटिशांनी दीडशे वर्षांच्या गुलामगिरीतील वसाहतवादी इतिहासलेखनाची जी परंपरा आम्हाला देणगी म्हणून दिली, त्या मानसिक गुलामगिरीतून आम्ही कधी बाहेर पडणार? आमचा इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोन कधी व्यापक होणार? जर तो व्यापक झालाच नाही, तर नवनवीन संशोधन, तथ्यं यांचा अंतर्भाव इतिहासात कसा होईल, हेही विचारात घेतले पाहिजे. पण नाही, आम्ही अजूनही संकुचित विचार करतो, ही सत्यता नाकारता येणार नाही. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटिशांनी भारताच्या इतिहासाची मांडणी करताना, भारताचा इतिहास आपल्या दृष्टिकोनातून वा स्वार्थी दृष्टिकोनातून अर्थात, वसाहतवादी दृष्टिकोनातून लिहिला. त्यात चार्लस् ग्रॉटसारखे तज्ज्ञ भारतात ईसाई धर्माचा प्रचार, भारताला अंधश्रद्धा, कुप्रथां धून बाहेर काढण्यासाठी कसा योग्य आहे, याचे विश्लेषण करतो; तर साम्राज्यवादाला तात्त्विक बैठक देताना जेम्स मिल 'ब्रिटिश हिस्ट्री ऑफ इंडिया' या ग्रंथातून भारतीय कसे अप्रगत आहेत, रानटी आहेत, त्यांच्यात नीतिमत्ता नाही, त्यांचा बौद्धिक विकास झाला नाही, भारतीयांची प्रगती ब्रिटिशांुळे साधली गेली, याचे विश्लेषण करतो. म्हणजे ही वसाहतवादी साम्राज्यवादी इतिहासलेखनाची मानसिकता आम्हास चालते. परंतु, आमच्या वैभवशाली, गौरवशाली इतिहासाला आम्ही नाकारतो, यात कुठले आले आहे शहाणपण? जोपर्यंत आम्हास बाहेरच्यांनी आमच्या गौरवशाली इतिहासाचे दर्शन घडविले नाही, तोपर्यंत आम्हाला आमच्या वैभवाची प्रचीतीच आली नाही, असे म्हटले तर ते वावगे ठरू नये. कारण शेवटी 'External conflict of India' असे जे आपण म्हणतो, म्हणजे विचारधारेतील जो संघर्ष आहे व त्यामुळे आपण इतिहासाकडे एवढे दुर्लक्ष केले आहे की, जोवर विल्यम जोन्सने 'अभिज्ञान शांकुतलम्' या नाटकाचे इंग्रजी भाषांतर करून, जगासमोर आणले नाही, तोवर आम्हाला आमच्या साहित्याची खोली कळली नाही. हे भाषांतर पाश्चिमात्य लोक डोक्यावर घेऊन नाचायला लागले, तेव्हा आमचे डोळे उघडले! अशी प्रगल्भता, साहित्यिक कृती असणारे हे उच्च कोटीचे महानाट्य होते, हे आम्हास कधी कळणार? बाहेरच्यांनी सांगितल्यावर? याच परिपाठीत राष्ट्रवादी इतिहासलेखन प्रवाहात भारताच्या बांधणीत योगदान देणाऱ्या संघाचे कार्य कसे दुर्लक्षित झाले, याचाही शोध आम्हाला घ्यावा लागणार आहे.

संघाचे योगदान भारताला परमवैभवास नेण्यासाठी कटिबद्ध आहे, हे आम्हाला बाहेरचे इतिहासकार सांगणार, की ते आम्ही ठरवावे? संघाचा इतिहास हा फक्त राष्ट्रभावनेने भारावला आहे. ज्यासाठी फक्त राष्ट्र प्रथम आहे. जी संघटना गेल्या ९० वर्षांपासून फक्त राष्ट्रकार्यासाठी समर्पित आहे, त्या संघटनेच्या कार्याचा आढावा हा राष्ट्रवादी इतिहासलेखनाच्या प्रवाहातील इतिहासलेखन म्हणून अभ्यासक्रमात का समाविष्ट होऊ शकत नाही? या सर्व इतिहासलेखनप्रवाहाचा आढावा घेण्याचे कारण असे आहे की, आजपर्यंत भारताचे इतिहासलेखन हे ब्रिटिशांनी निर्माण केलेल्या औपनिवेशिक परंपरेच्या माध्यमातून झाले. ब्रिटिश सोडून गेल्याला आता ७० वर्षांचा काळ लोटला, तरी आम्ही अजूनही मानसिक गुलामच आहोत. कारण डाव्या विचारधारेच्या तथाकथित विचारवंतांनी ब्रिटिशांची जागा घेतली आणि या दरम्यान त्यांनी जे इतिहासलेखन केले, त्यात 'राष्ट्र, राष्ट्रवाद, राष्ट्रभावना,' या शब्दांना स्थान नव्हते. त्यात वसाहतवाद, नववसाहतवाद, मार्क्सवाद, साम्यवाद, नक्षलवाद इत्यादी विचारप्रवाहांचे लेखन करून हे विषय याच लोकांनी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातून मांडले व निर्माण होणारी पिढीही तशीच घडविली. कारण शालेय स्तर ते विद्यापीठीय अभ्यासमंडळावरही यांचेच वर्चस्व राहिले. स्वत:ला पुरोगामी समजणाऱ्या या तथाकथित विचारवंतांना मुस्लिम लिगचा इतिहास चालला, रशियाचा साम्यवाद चालला, पण भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक जडणघडणीत महत्त्वाचा वाटा उचलणाऱ्या, आपल्या सेवाकार्याने समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात सकारात्मक बदल घडविणाऱ्या व्यक्तिनिर्माण ते राष्ट्रनिर्माण ही संकल्पना प्रत्यक्ष राबविणाऱ्या समाजातील प्रत्येक घटकाला मुख्य प्रवाहात आणून, त्याच्या नैतिक

(पान ४ वर)



# 'नील अर्थव्यवस्थे'ची सुलभ वाट

**एके काळी पारंपरिक व्यवसाय म्हणून गणला जाणारा मत्स्यव्यवसाय, आज आंतरराष्ट्रीय व्यापार, अन्नसुरक्षा, रोजगार आणि आर्थिक विकासाचा आधार ठरतो आहे. संयुक्त राष्ट्रांच्या अन्न व कृषी संघटनेच्या (एफएओ) 'स्टेट ऑफ वर्ल्ड फिशरीज ॲण्ड ॲक्काकल्चर २०२६' अहवालाने, या क्षेत्राचे वाढते सामर्थ्य अधोरेखित केले.**

वेध

गायत्री श्रीगोंदेकर



समुद्राच्या लाटांमध्ये केवळ निसर्गसंपत्तीच नाही, तर जागतिक अर्थव्यवस्थेला नवी दिशा देण्याची क्षमताही आहे. एकेकाळी पारंपरिक व्यवसाय म्हणून गणला जाणारा मत्स्यव्यवसाय, आज आंतरराष्ट्रीय व्यापार, अन्नसुरक्षा, रोजगार आणि आर्थिक विकासाचा आधार ठरतो आहे. संयुक्त राष्ट्रांच्या अन्न व कृषी संघटनेच्या (एफएओ) 'स्टेट ऑफ वर्ल्ड फिशरीज ॲण्ड ॲक्काकल्चर २०२६' अहवालाने, या क्षेत्राचे वाढते सामर्थ्य अधोरेखित केले. २०२४ मध्ये जागतिक मत्स्यव्यवसाय आणि मत्स्यपालनातून झालेले एकूण उत्पादन, विक्रमी २३५ दशलक्ष टनांवर पोहोचले. तर, मत्स्य उत्पादनांचा आंतरराष्ट्रीय व्यापार १८६ अब्ज डॉलरवर गेला. या अर्थव्यवस्थेत भारतासाठी मोठीच संधी निर्माण झाली आहे.

जागतिक मत्स्यव्यवसायात आशियाचे वर्चस्व कायम असून, चीन मोठा उत्पादक देश आहे. तर, भारताचे स्थान दुसरे आहे.

इंडोनेशिया, व्हिएतनाम आणि बांगलादेशचेही योगदान महत्त्वाचेच. २०२४ मध्ये मत्स्यपालनातून आशियात १०३ दशलक्ष टन उत्पादन झाले. जागतिक उत्पादनातील हा वाटा ५३ टक्के आहे. नैसर्गिक जलस्रोतांमधील मत्स्य उत्पादन स्थिर असताना, मत्स्यपालनाने नवा मार्ग खुला केला आहे. समुद्र आणि इतर जलस्रोतांच्या आधारे आर्थिक विकास साधणे, रोजगार निर्मिती आणि पर्यावरणाचे संरक्षण, या संकल्पनेला 'ब्ल्यू इकोनॉमी' म्हणतात. यात मत्स्यव्यवसायाला केंद्रस्थानी ठेवले आहे. 'एफएओ'चा 'ब्ल्यू ट्रान्सफॉर्मेशन' दृष्टिकोनही शाश्वत मत्स्यपालन, प्रभावी मत्स्यव्यवस्थापन आणि अधिक कार्यक्षम व सर्वसमावेशक उत्पादन-मूल्यसाखळी यांवर भर देतो.

भारतासाठी या दृष्टिकोनाचे महत्त्व विशेषच. मात्र, त्यासाठी धोरणात्मक सातत्य, आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन, पायाभूत गुंतवणूक आणि पारंपरिक मासेमारांच्या हितांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. भारतासाठी ही उत्पादनवाढीची स्पर्धा नसून, जागतिक बाजारपेठेतील स्थान मजबूत करण्याचीही संधी आहे. विस्तीर्ण किनारपट्टी, अंतर्गत जलस्रोत, कोळंबी उत्पादन आणि निर्यातीच्या बळावरच, भारत या क्षेत्रात मोठी झेप घेऊ शकतो. मात्र, उत्पादनाबरोबरच प्रक्रिया उद्योग, शीतसाखळी, गुणवत्ता नियंत्रण आणि मूल्यवर्धित उत्पादनांवर भर देणेही आवश्यकच. जागतिक मत्स्यव्यापाराचे मूल्य पाहता, नॉर्वेने 'सॅल्मन' उत्पादनातून, चिलीने मत्स्यपालन आणि निर्यातीतून, तर थायलंडने प्रक्रिया उद्योगातून जागतिक बाजारपेठेत ओळख निर्माण केली. यातून भारतानेही अधिक मूल्य मिळवून देणार्या उत्पादनांकडे वळण्याची गरज अधोरेखित होते. या क्षेत्राचे महत्त्व रोजगाराच्या दृष्टीनेही मोठेच. 'एफएओ'च्या अहवालानुसार, २०२४ मध्ये मत्स्यव्यवसाय आणि मत्स्यपालनाच्या प्राथमिक क्षेत्रात ६.५ कोटींपेक्षा जास्त लोक कार्यरत होते, तर जगभरातील ६० कोटींहून अधिक लोकांची उपजीविकाच यावर अवलंबून होती. त्यामुळे यातील गुंतवणूक ही किनारपट्टीवरील समुदाय, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि लघुउद्योगांच्या विकासाचीही संधी आहे.

मत्स्य अन्नपदार्थ हे प्रथिने आणि आवश्यक पोषक घटकांचे महत्त्वाचे स्रोत. २०२४ मध्ये जगभराात उत्पादित मत्स्य उत्पादनापैकी, सुमारे ८९ टक्क्याचा वापार मानवी अन्नासाठी झाला. मात्र, याची उपलब्धता जगभरात समान नाही. २०२३ मध्ये आशियात ती प्रतिव्यक्ती २६.३ किलो होती; तर आफ्रिकेत केवळ ९.१ किलो. त्यामुळे उत्पादनवाढीसोबतच, पोषक अन्नाची समान उपलब्धता सुनिश्चित करणेही महत्त्वाचेच. दुसरीकडे हवामानबदल, जलप्रदूषण, अधिवासांचा र्हास आणि अतिमासेमारीमुळे, नैसर्गिक मत्स्यसाठ्यांवर दबाव वाढता आहे. 'एफएओ'च्या अंदाजानुसार, २०३४ पर्यंत जागतिक मत्स्य उत्पादन २१४ दशलक्ष टनांपर्यंत पोहोचेल. ही वाढ शाश्वत मत्स्यपालन, विज्ञानाधारित व्यवस्थापन आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाच्या आधारावर टिकवता येईल.

मत्स्यव्यवसायाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची हीच वेळ आहे. समुद्र आणि जलसंपत्ती ही केवळ अन्नाची साधने नसून रोजगारनिर्मिती, आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आर्थिक विकासाचीही ताकद आहे. आज विविध कारणांनी जगाला शाश्वत जलाधारित अन्नव्यवस्थेची गरज तीव्रतेने जाणवत आहे. अशा वेळी भारतासाठी मत्स्यव्यवसाय हा, जागतिक अर्थव्यवस्थेत आपले स्थान भक्कम करण्याची सुलभ वाट आहे.

# बालहक्क आणि शाळांची जबाबदारी

पोरकी पोरं

डॉ. तुषार सावरकर



**मुलाला शाळेत पाठवताना पालकांची पहिली अपेक्षा गुणांची नसते; मूल सुरक्षितपणे शाळेत जावे आणि सुरक्षितपणे घरी परतावे ही असते. शाळा म्हणजे केवळ ज्ञान देण्याची जागा नाही. घरानंतर मुलाच्या आयुष्यातील सर्वांत महत्त्वाची सामाजिक जागा म्हणजे शाळा. तिथे तो शिकतो, खेळतो, मित्र बनवतो, प्रश्न विचारतो, चुका करतो, स्वतःबद्दलची भावना तयार करतो आणि समाजाशी नाते जोडायला शिकतो. त्यामुळे शाळा सुरक्षित नसेल, सन्मान देणारी नसेल आणि समानतेची जाणीव निर्माण करणारी नसेल, तर शिक्षणाचा संपूर्ण अर्थ अपूर्ण ठरतो. आज भारतातील शाळा व्यवस्थेची व्याप्ती प्रचंड आहे. २०२४-२५ च्या अधिकृत आकडेवारीनुसार देशात सुमारे १४.७१ लाख शाळा, २४.६९ कोटी विद्यार्थी आणि १.०१ कोटी शिक्षक आहेत. ही केवळ आकडेवारी नाही; या प्रत्येक संख्येमागे एका मुलाचे आयुष्य आहे. त्यामुळे शाळेतील सुरक्षितता, सुविधा, समानता आणि सन्मान हा शिक्षण व्यवस्थेचा दुय्यम विषय नसून तिच्या केंद्रस्थानी असायला हवा.**

बालहक्क म्हटले की आपल्या डोळ्यांसमोर मारहाण, लैंगिक अत्याचार किंवा गंभीर हिंसेच्या घटना उभ्या राहतात. त्या निश्चितच बालहक्कांचे गंभीर उल्लंघन आहेत. पण बालहक्काची व्याप्ती त्यापेक्षा कितीतरी मोठी आहे. एखाद्या मुलाला सुविधा नाकारणे, त्याला इतर मुलांपेक्षा कमी लेखणे, सामाजिक किंवा आर्थिक पृष्ठभूमीमुळे वेगळे वागवणे, स्पर्धा आणि उपक्रमांमध्ये संधी न देणे, सतत अपमानित करणे, त्याच्या क्षमतेवर शिक्का मारणे किंवा त्याच्या आवाजाकडे दुर्लक्ष करणे हेही बालहक्कांच्या प्रश्नाचाच भाग आहे. याच ठिकाणी सामाजिक विषमतेचा प्रश्न शाळेच्या दारातून आत येतो.

राजस्थानमध्ये एका सामाजिक समूहाने सरकारी शाळांची पाहणी करताना शाळेच्या इमारती आणि मूलभूत सुविधांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले. जयपूरजवळील एका शाळेची इमारत धोकादायक ठरल्यानंतर मुलांना तात्पुरत्या जागेत हलवण्यात आले; त्या जागेबाबत गुरे बांधण्याच्या जागेतच मुलांचे शिक्षण सुरू असल्याचा आरोप करण्यात आला. या घटनेनंतर राज्य सरकारच्या आकडेवारीतही राजस्थानमधील शेकडो सरकारी शाळांकडे स्वतःची इमारत नसल्याचे आणि हजारो शाळांमध्ये स्वच्छतागृह किंवा पिण्याच्या पाण्याची सुविधा नसल्याचे समोर आले. या घटनेकडे केवळ एखाद्या राज्यातील प्रशासकीय त्रुटी म्हणून पाहून प्रश्न संपवता येणार नाही. उलट, ती आपल्याला अधिक अस्वस्थ करणारा प्रश्न विचारते- सुविधांच्या बाबतीत सर्व मुलांना समान दर्जाचे बालपण मिळते आहे का? सरकारी शाळांमध्ये शिकणारी मुले प्रामुख्याने आर्थिकदृष्ट्य दुर्बल, ग्रामीण, वंचित आणि विविध सामाजिकदृष्ट्य मागासलेल्या घटकांतून येतात. अनुसूचित जाती, अनुसूचित माती, भटक्या-विमुक्त समुदाय, अल्प उत्पन्न गट आणि इतर वंचित कुटुंबांतील मुलांचे शिक्षण सरकारी व्यवस्थेवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. त्यामुळे एखाद्या सरकारी शाळेत स्वच्छतागृह नाही, पिण्याचे पाणी नाही, सुरक्षित इमारत नाही किंवा मुलांना सुरक्षित निवासाची सुविधा नाही, तर त्याचा परिणाम फक्त 'सुविधेच्या अभावावर' होत नाही; तो सामाजिक न्यायाच्या प्रश्नाला स्पर्श करतो. मात्र, येथे एक गोष्ट अत्यंत काळजीपूर्वक सांगावी लागेल.

प्रत्येक सुविधेच्या अभावामागे सरकार जाणीवपूर्वक एखाद्या सामाजिक समूहाकडे दुर्लक्ष करते, असा निष्कर्ष पुराव्याशिवाय काढणे योग्य नाही. पण जर वंचित मुलांच्या शाळांमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव सातत्याने दिसत असेल, तर शासनाच्या धोरणांमध्ये आणि अंमलबजावणीत समानतेचा निकष खरोखर लागू होतो आहे का, हा प्रश्न विचारणे मात्र आवश्यक आहे. गडचिरोलीतील जपतलाई येथील अनुदानित आदिवासी आश्रमशाळेत ऑगस्ट २०२६ मध्ये तीन आदिवासी विद्यार्थिनींचा सर्पदंशाने मृत्यू झाला. या घटनेनंतर वसतिगृहातील सुरक्षिततेच्या व्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आणि राज्य सरकारने संबंधित आश्रमशाळेची मान्यता रद्द करण्यासह इतर कारवाई केली. या तीन मुलींच्या मृत्यूकडे केवळ दुर्दैवी नैसर्गिक घटना म्हणून पाहणे पुरेसे आहे का? जर मुलांना सुरक्षित झोपण्याची व्यवस्था, संरक्षित निवास, आवश्यक प्रतिबंधात्मक उपाय आणि तातडीची वैद्यकीय मदत उपलब्ध करून देणे शक्य होते, तर त्या व्यवस्थेत कुठे त्रुटी राहिली, हा प्रश्न विचारावाच लागेल. कारण आदिवासी मुलगी हीही तितकीच मौल्यवान आहे जितकी शहरातील प्रतिष्ठित खाजगी शाळेत शिकणारी मुलगी. तिच्या जीवाची किंमत कमी असू शकत नाही. हीच सामाजिक विषमता दुसऱ्या टोकाला वेगळ्या स्वरूपात दिसू शकते. खासगी शाळेत इमारत, स्वच्छतागृह, तंत्रज्ञान, उपक्रम आणि सुविधा असतील; पण त्यामुळे तेथील प्रत्येक मूल समानतेचा अनुभव घेत असेलच असे नाही. काही ठिकाणी एखाद्या विशिष्ट सामाजिक किंवा आर्थिक समूहातील मुलांना मागच्या बाकावर बसवणे, वेगळ्या तुकडीत ठेवणे, त्यांच्या पालकांच्या आर्थिक किंवा सामाजिक स्थितीवरून त्यांच्याकडे वेगळ्या नजरेने पाहणे, स्पर्धा किंवा शालेय उपक्रमांमध्ये त्यांना दुय्यम संधी मिळणे, नेतृत्वाच्या भूमिकांपासून दूर ठेवणे अशा प्रकारची विषमता उघडपणे दिसत नसली तरी मुलाच्या मनावर तिचा खोल परिणाम होऊ शकतो.

हीच तर अदृश्य विषमता आहे. एखाद्या मुलाला कोणी मारले नाही, त्याच्यावर शिवीगाळ केली नाही, त्याच्यावर उघड अत्याचार केला नाही; पण प्रत्येक वेळी त्याला मागे बसवले, त्याच्याकडे कमी अपेक्षेने पाहिले, त्याच्या क्षमतेला संधी दिली नाही, इतर मुलांसमोर त्याची तुलना करून त्याला कमी लेखले तर त्याच्या मनात हळूहळू एक संदेश जातो- 'तू इतरांइतका महत्त्वाचा नाहीस.' हा संदेश बालहक्कांच्या दृष्टीने तितकाच गंभीर आहे. म्हणूनच बालहक्क म्हणजे फक्त हिंसेपासून संरक्षण नाही. बालहक्क म्हणजे संधीचा अधिकार, समानतेचा अधिकार, सन्मानाचा अधिकार, भेदभावमुक्त वातावरणाचा अधिकार आणि स्वतःची क्ष विकसित करण्याचा अधिकार.

शाळेतील भेदभाव अनेकदा इतका सूक्ष्म असतो की, त्याची नोंद कोणत्याही तक्रार पुस्तकात होत नाही. कोणाला वक्तृत्वासाठी निवडले जाते, कोणाला सांस्कृतिक कार्यक्रमात प्रमुख भूमिका मिळते, कोणाला क्रीडा संघात स्थान मिळते, कोणाला शिष्यवृत्ती किंवा नेतृत्वाची संधी मिळते, कोणाच्या मताला महत्त्व दिले जाते या छोट्या वाटणाऱ्या निर्णयांमधूनही मुलाला समाजातील आपले स्थान जाणवू लागते. म्हणून शाळेची समानता केवळ प्रवेशाच्या दारापर्यंत मर्यादित राहू नये. प्रवेश समान, पण अनुभव असमान, अशी परिस्थिती असेल तर बालहक्कांची खरी अंमलबजावणी झालेली म्हणता येणार नाही. याचबरोबर मुलांवर होणाऱ्या मानसिक दबावाकडेही गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे. गुण, परीक्षा, स्पर्धा, पालकांच्या अपेक्षा आणि सततची तुलना यामुळे अनेक मुले मानसिक तणावाखाली असतात. प्रत्येक मूल प्रथम क्रमांक मिळवेलच असे नाही. प्रत्येक मूल गणितात हुशार असेलच असे नाही. प्रत्येक मूल वक्तृत्व, क्रीडा किंवा कलाक्षेत्रात सारखीच कामगिरी करेलच असे नाही. मुलाच्या व्यक्तिमत्त्वाची किंमत त्याच्या गुणपत्रिकेतील आकड्यांनी ठरवणे हीदेखील एक प्रकारची मानसिक अन्यायाची प्रक्रिया ठरू शकते.

'तू काहीच करू शकत नाहीस', 'तुझ्यापेक्षा अमुक मुलगा चांगला आहे', 'तुझ्याकडून काही अपेक्षा नाहीत' अशी वाक्ये कदाचित शिक्षक किंवा पालक सहज बोलून जातात; पण मुलाच्या मनात त्यांचे परिणाम दीर्घकाळ राहू शकतात. शिक्षणाचे उद्दिष्ट मुलाला स्वतःवर विश्वास ठेवायला शिकवणे असताना, सततची तुलना त्याचा आत्मविश्वासच नष्ट करत असेल तर आपण नेमके कोणते शिक्षण देत आहोत? शारीरिक शिक्षा आणि मानसिक छळावरील बंदीचा कायदेशीर आधार स्पष्ट आहे.

मुलांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मध्ये शारीरिक शिक्षा आणि मानसिक छळास मनाई करण्यात आली आहे. राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगानेही शाळांमधील सुरक्षितता, बालसंरक्षण, छळ आणि संगणकीय माध्यमातून होणारा छळ याबाबत मार्गदर्शक तत्त्वे प्रसिद्ध केली आहेत. मात्र कायदा असणे आणि त्याची शाळेच्या संस्कृतीत अंमलबजावणी होणे यात मोठा फरक आहे.

(पान ६ वर)

# रिपोर्ट कार्ड

कथा

रश्मी वाघमारे

शाळेच्या गेटपाशी उभं राहून सुलभाने रुमालाने हात पुसला. ती थोडी संकोचली होती. सकाळी सहाच्या आधी उठून तीन घरची भांडी- कपडे उरकून, चौथ्या घरचा स्वयंपाक करून ती इथे पोचली होती पालक-सभेसाठी. साडी नवी नव्हती, पण इस्त्री केलेली होती. शाळेच्या अंगणात बायकांचा एक घोळका उभा होता. मोठ्या गाड्यांतून उतरलेल्या, खूप तयार होऊन परफ्यूम लावून, हातात मोबाईल घेऊन एकमेकींशी हसत बोलणाऱ्या! 'ए!' मागून हाक आली. वळून बघितलं तर मीनल; शेजारच्या सोसायटीतल्या एका घरात सुलभा कामाला होती, तिथली मालकीण!

तू इथे कशी, तू इथे काय करतेय? की, आता मुलींना शाळेत सोडायचंही काम सुरू केलं आहे? सुलभा चमकली; तिच्या तोंडून ठामपणे निघाले... नाही. माझी मुलगी रेवती याच शाळेत टिळक हाऊसच्या सातवी 'इ' मध्ये आहे. 'अच्छा! मीनलच्या आवाजातले आश्चर्य आणि उपहास लपत नव्हते. आजूबाजूच्या दोन-तीन बायकांनी एकदम वळून बघितलं आणि सुलभाला जाणवलं की, तिचं हे वाक्य म्हणजे त्यांच्यावर आघात होता! जणू ते खरं वाटतंच नव्हतं की घरकाम करणाऱ्या बाईची मुलगी सातवी 'इ' मध्ये; त्याच शाळेत, त्यांच्या मुलींसोबत शिकतेय. सुलभाच्या मागे दोन बायका हळू आवाजात बोलत होत्या... 'तिचीच का ही..?' 'म्हणे अभ्यासात हुशार आहे...' ...कुठून येत असेल इतका वेळ, काम सांभाळून....' सुलभाने न ऐकल्यासारखं केलं. आत गेल्यावर शिक्षिकेने हसून स्वागत केलं. 'बसा सुलभाताई. रेवतीचं रिपोर्ट कार्ड बघूया.' गुण चांगले होते. गणितात ९२, विज्ञानात ८८, मराठीत ९५. शिक्षिका कौतुकाने बोलत होती..

'फार शिस्तीची मुलगी आहे. वर्गात व्यवस्थित राहते..कधी दंगामस्ती नाही. नियमित अभ्यास, खरंच फार गुणी मुलगी आहे! सुलभाच्या छातीत काहीतरी उचंबळून आलं. बाहेर पडताना मीनल पुन्हा भेटली, यावेळी दोन-तीन बायकांसोबत.'काय म्हणाल्या मॅडम? आमची तर म्हणे नुसती गप्पा मारते वर्गात. रेवतीचे गुण चांगले आहेत. सुलभा म्हणाली, आवाजात हलकासा अभिमान लपवत. एक बाई मध्येच हसत बोलली, बरं झालं बाई, निदान मुलीचं तरी भलं होईल. तुमचं आयुष्य तर असंच गेलं, कामात. त्यात मुलीचं कौतुक नव्हतं तर सुलुच्या जीवनावर एक हलकासा कटाक्ष होता. पण सुलभाला ते वाक्य सुरीसारखं वाटलं. तिचं आयुष्य 'असंच गेलं' हे इतक्या सहज, हे इतक्या नक्की स्वरात कुणीतरी का सांगावं? ती फक्त मान हलवून चालायला लागली, चालता चालता मनात एक निखारा फुलत गेला... 'तुमचं आयुष्य असंच गेलं' म्हणजे काय? कुणी ठरवलं हे? तिने कधी कुणाचं वाईट केलं होतं का? रोज पहाटे उठते, सहा घरची कामं करते, मुलीला वेळेवर शाळेत पाठवते, स्वतःचं पोट स्वतः भरते. तरी तिचा दर्जा यांच्या नजरेत कायम खालचाच का? 'माझेच का असे आयुष्य, तिच्या मनात प्रश्न उमटला. काम कुठलंही असो, कष्ट तेच असतात... मग हा भेद कशासाठी? या तथाकथित उच्चभ्रू बायका, ज्यांचं स्वतःचं कर्तृत्व बहुतांशी फक्त नवऱ्याच्या पगारावर आणि पदावर उभं आहे; त्यांना दुसऱ्याच्या कष्टाची किंमत कधीच कळणार नाही. यांचा दर्जा त्यांच्या स्वतःच्या हातांनी कमावलेला नाही, तरी यांच्या वागण्या-बोलण्यातला तोरा व इतरांना तुच्छ लेखण्याची वृत्ती अशी का? यांचे भारी कपडे, दागिने, यांच्या मोठ्या गाड्या, यांचे महागडे परफ्यूम हे सगळं नवऱ्याच्या कमाईने मिळवलेलं वैभव आणि तरी स्वतः कष्ट करणाऱ्यांना असे बोलायचे? घरात एक कपभर चहा स्वतःसाठी हाताने न करणाऱ्या बाईला दुसऱ्याच्या आयुष्याचा हिशोब मांडायचा अधिकार दिला कुणी? ती जोरात पावलं टाकू लागली, जणू चालण्याच्या वेगातच तो राग विरघळवायचा होता.

गेटबाहेर रेवती उभी होती, दप्तर सांभाळत.



'काय म्हणाल्या मॅडम? तिने विचारलं, आईचा चेहरा वाचण्याचा प्रयत्न करत. चांगले गुण आहेत तुझे. मॅडम खूप कौतुक करत होत्या. रेवतीचा चेहरा उजळला... 'आई... तू का अशी उभी होतीस बाजूला? इतर आया तर आत गप्पा मारत होत्या ना एकमेकींशी. सुलभाने उत्तर दिलं नाही लगेच. चल, उशीर होतोय. मनू मावशींच्या घरी भांडी राहिलीयेत अजून. चालता चालता रेवती गप्प राहिली, पण तिची नजर आईच्या चेहऱ्यावरून हलत नव्हती. काहीतरी तिला जाणवलं होतं, नक्की काय, हे तिला अजून शब्दांत मांडता येत नव्हतं. फक्त इतकंच कळत होतं की, आज तिचे गुण चांगले आले आणि तरी आई हसताना खुश नव्हती. घरी पोचल्यावर रेवतीने रिपोर्ट कार्ड कपाटात नीट ठेवलं, सगळ्यात वरच्या कण्यात, जिथे तिची बक्षिसं आणि प्रमाणपत्रंही होती. सुलभा स्वयंपाकघरात गेली,, गॅस पेटवला चहा करण्यासाठी आणि भांडं गॅसवर ठेवताना तिचा हात क्षणभर थांबला. खिडकीतून बाहेर बघत ती उभी राहिली, किती वेळ, तिचं तिलाच कळलं नाही. तेवढ्यात बाहेरून हातगाडीचा आवाज आला. रामभाऊ, रेवतीचे वडील भाजी विकून घरी परतले होते, हातगाडी अंगणाच्या कोपर्यात लावत. रेवतीचं काय झालं? त्यांनी विचारलं, चेहर्यावर दिवसभराच्या उन्हाचा शीण असूनही आवाजात उत्सुकता होती.

मॅडम खूप कौतुक करत होत्या तिचं, सुलभा म्हणाली, आणि यावेळी तिचं हसू खरं होतं, कुणाच्या नजरेला घाबरणारं नव्हतं. रामभाऊंनी खिशातून एक छोटी मूठभर पेरूची फळं काढली. विकायला उरलेली, पण चांगली निवडून बाजूला ठेवलेली. रेवतीसाठी! गोड बातमी आहे, गोड काहीतरी हवं. रेवती धावत आली, पेरू घेत हसली. सुलभाने त्या दोघांकडे बघितलं नवरा, मुलगी, आणि हे छोटंसं घर जे कष्टांवर उभं होतं. मीनलचे शब्द अजूनही मनात कुठेतरी टोचत होते, पण आत्ता या क्षणी त्यांचं वजन थोडं हलकं वाटलं. तिने भांड्यात पाणी ओतलं आणि कामाला लागली; पण यावेळी तिच्या हालचालीत आधीचा भार नव्हता, एक हलकीशी लय होती, जणू आजच्या दिवसाने तिला काहीतरी परत दिलं होतं.

वळणावरच्या नोंदी

स्वाती काळे

# प्रवासवेडा: इब्न बतूता

घरट्यातून पक्षाच्या पिलाने लुकलूकत्या डोळ्यांनी बाहेर बघावं आणि उंच झेप घेऊन घरटं कायमचं सोडावं तसंच इब्न बतूताच्या बाबतीत घडलं. निमित्त झालं वयाच्या २१ व्या वर्षी इ. स. १३२५ च्या जून महिन्यात मक्केच्या यात्रेचं. यात्रेचे निमित्त करून हा प्रवासवेडा घरून निघाला तो तब्बल २९ वर्षांनी घरी परतला. तो म्हणतो, पक्षी जसे घरटे सोडून बाहेर पडतात, तसा मी जवळच्या माणसांना सोडून प्रवासाला निघालो. हा माणूस प्रवासवेडाच होता. जवळ कोणी मित्र नाही, मदत करणारा साथीदार नाही. पण २९ वर्षांच्या कालावधीत त्याने ७३ हजार मैलांचा प्रवास केला. कधी खेचर, घोडा, बैलगाडीच्या मदतीने तर कधी पायी चालत आणि कधी जहाजाचे धक्के खात त्याने खडतर प्रवास केला.

या २९ वर्षांच्या कालावधीत त्याने पूर्व गोलार्ध अक्षरशः पिंजून काढला. अनेकदा समुद्री वादळामुळे त्याचे लिखाण समुद्राच्या तळाशी बुडून गेले. पण तीव्र स्मरणशक्तीच्या जोरावर त्याने त्याचे प्रवासवर्णन पुन्हा लिहून काढले. इ. स. १३५६ मध्ये मोरोक्कोच्या सुलतानाने इब्न जुझ्ये या तरुण लेखकाला इब्न बतूताच्या मदतीला दिले आणि त्याचे पुस्तक पूर्ण झाले. पुस्तकाचे मूळ नाव 'जे कोणी आश्चर्यकारक शहरांचा आणि प्रवासाचा विचार करतात त्यांच्यासाठी भेट' असे लांबलचक होते. पण नंतर हे पुस्तक

ठाण्यातील दूत तयार होत असत. संदेश घेऊन आलेल्या दूताकडून पुढील दूत त्याच्या हातातून पत्र घेई आणि पुढे सुसाट धावत सुटे. पुढच्या दावापर्यंत वेगाने धावत जाताना आपली घंट्यांची काठी वाजवायला तो विसरत नसे. पुढच्या टप्प्यावर पुन्हा दुसरा दूत पत्र ताब्यात घेऊन पुढे धावत असे. पायी धावणार्या दूतांची टपाल व्यवस्था घोड्यावरून जाणार्या टपालापेक्षाही जास्त जलद होती. त्यामुळे खुरासानहून भारतात जाणारी फळेसुद्धा या पायी धावणाऱ्या टपाल सेवेकडूनच आणली जायची. विणलेल्या टोपल्यांमध्ये ही फळे ठेवून पायी धावणारे दूत वेगात निघायचे. अशा रीतीने गुन्हेगारांनासुद्धा खाटेवर झोपवून वेगाने एका जागेवरून दुसऱ्या जागेकडे नेण्यात येई. जेव्हा सुलतान दौलताबादला असायचा तेव्हा त्याच्यासाठी गंगेचे पाणीदेखील हे पायी धावणारे दूतच घेऊन यायचे.

भारतातील गुप्तचर खाते अतिशय तीक्ष्ण बुद्धिमत्तेचे होते. देशात बाहेरचा पाहुणा आला तर त्याचे हुबेहूब वर्णन सुलतानाकडे पोहोचत असे. त्याचा पोशाख, त्याच्या चेहऱ्याची ठेवण, त्याची वागणूक, त्याच्याबरोबर आलेले त्याचे सेवक, गुलाम हे सर्व वर्णन सुलतानाकडे गेल्यावर त्याला हद्दीच्या आत घ्यायचे की नाही, हा निर्णय सुलतानाचा असायचा. त्याला कोणत्या प्रकारची वागणूक द्यायची हाही निर्णय सुलतान घ्यायचा. देशाबाहेरच्या व्यक्तीला चांगली वागणूक देण्याचा पायंडा सुलतानाने घालून दिला. त्याने फर्मान काढले होते की, बाहेरून आलेल्या व्यक्तीला 'अजीज' म्हणजे 'मान्यवर' असे संबोधले गेले पाहिजे.



'रिहाला' म्हणजे 'प्रवास' या छोट्याशा नावानेच प्रसिद्ध झाले. 'रिहाला ' हे प्रवासवर्णन म्हणजे १४ व्या शतकाच्या मध्यावरच्या मुस्लिम जगाचा आरसा आहे आणि हे पुस्तक आफ्रिका आणि आशिया खंडाच्या मध्ययुगीन इतिहासाचा अत्यंत महत्त्वाचा संदर्भ ग्रंथ समजले जाते. इब्नबतूताच्या ग्रंथाचे साधारणपणे चार भाग आहेत. आपण त्याने भारताबद्दल काय लिहिले आहे या भागाकडे प्रथमतः बघू आणि नंतर इतर देशांकडे वळूया.

इब्नबतूता १२ सप्टेंबर १३३३ रोजी सिंधू नदीपाशी पोहोचला. नंतर सिंधू नदी ओलांडून मुलतान प्रांतात आला. भारतात तेव्हा मुहम्मद तुघलकाचे राज्य होते. जून १३३४ मध्ये तो मुहम्मद तुघलकाला भेटायला गेला. तेव्हा तुघलकाने दिल्ली शहराचा काझी म्हणून त्याची नेमणूक केली. पुढची सात वर्षे त्याने दिल्लीमध्ये काझी म्हणून काम केले. तो लिहितो की, सिंधू नदी ओलांडल्यापासून समृद्ध पंजाबचा प्रांत सुरू होतो. पंजाबमध्ये पाच नद्यांचे पाणी आहे. उन्हाळ्यामध्येही या नद्या दुथडी भरून वाहतात. येथील जमीन सुजलाम सुफलाम आहे. इब्न बतूता मुलतानला पोहोचताच त्याच्या येण्याची वर्दी मुलतानच्या गव्हर्नरला देण्यात आली. खरे तर गव्हर्नर तेव्हा शिविस्तान (आत्ताचे सेहवान, पाकिस्तान) येथे राहत होता. पण तो म्हणतो की, त्या काळची टपाल सेवा अतिशय तत्पर होती आणि त्याद्वारे असे निरोप दिले जायचे. तो म्हणतो की, त्या काळची भारतातील टपाल सेवा सांगण्यासारखी आहे. सुलतानाचे घोडे टपाल वाहून न्यायचे. त्याला 'उलाक' म्हणायचे. दर चार मैलांवर हे घोडे बदलण्यासाठी ठाणे असत. काही दूत टपाल घेऊन धावतसुद्धा जायचे.

एका मैलामध्ये तीन टप्पे असत. या टपाल सेवेला 'दावा' म्हणायचे. एक दावा म्हणजे मैलाच्या एक तृतीयांश अंतराएवढा असायचा. संपूर्ण एका मैलाला 'कुरुह' म्हणायचे. प्रत्येक एक तृतीयांश मैलावर वस्ती असलेले गाव असायचे आणि गाववेशीच्या बाहेर तीन ठाणे उभारलेले असायचे. या ठाण्यामध्ये तीन दूत नेहमी तयार बसलेले असायचे. प्रत्येकाच्या हाती सुमारे दोन हात लांबीची एक काठी असायची आणि तिच्या टोकाला तांब्याच्या घंट्या लावलेल्या असायच्या. जेव्हा एखादा दूत गावातून संदेश घेऊन निघायचा तेव्हा एका हाताच्या बोटांमध्ये पत्र घट्ट पकडून आणि दुसऱ्या हातात घंट्या लावलेली काठी घेऊन तो शक्य तितक्या वेगाने धावत सुटायचा. त्याच्या घंट्याचा आवाज ऐकताच पुढील

त्या व्यक्तीला मोठे पदही देण्यात यायचे. सुलतानापुढे जायचे तर मौल्यवान नजराणा घेऊनच जायचे हा प्रघात पडला होता. येथील व्यापाऱ्यांनी नफ्याची नामी संधी शोधून काढली. बाहेरच्या पाहुण्याला ते पैसे आणि नजराणे उधार द्यायचे. त्यामध्ये उंट, घोडे, हत्ती, सेवक, गुलाम अशा अनेक गोष्टी असत. पाहुणा नजराणा घेऊन सुलतानाकडे गेल्यावर सुलतान खुश होऊन त्याला भरपूर द्रव्य द्यायचा. यातील काही द्रव्य व्याजासकट व्यापाऱ्याला जायचे. इब्न बतूताने भारतात पोहोचल्यावर घोडे, उंट, काही मौल्यवान वस्तू, सेवक व्यापाऱ्याकडून विकत घेतले. ज्या व्यापाऱ्याकडून विकत घेतले त्या व्यापाऱ्याला नंतर त्याने भरपूर मोबदला दिला आणि तो व्यापारी नंतर मुख्य व्यापारी बनला. बदाम, मनुका इब्न बतूताने अफगाणिस्तानमधून आणले होते. भारतात बदाम आणि मनुका मिळत नसल्यामुळे त्याचे भारतीयांना कौतुक वाटते, असे त्याने लिहिले आहे.

सिंध प्रांतातली नदी ओलांडून इब्न बतूता वेताच्या घनदाट जंगलात शिरला. तेथे त्यांच्यावर गेंड्याने हल्ला केला. तो म्हणतो की, हा प्राणी हत्तीपेक्षा लहान आहे; पण याचे डोके प्रचंड मोठे आहे. घोडेस्वाराच्या मांडीवर शिंगाने जोरदार हल्ला करून तो जंगलात पुन्हा दिसेनासा झाला. घोडेश्वर जागीच मेला. हा ग्रंथ वाचत असताना आपल्याला बरीच नाहीशी झालेली गावे भेटतात. इब्न बतूता दोन दिवस जंगलातून फिरल्यावर त्याला 'जनानी' हे मोठे गाव लागले. यात भव्य आणि सुंदर अशा बाजारपेठा वसविल्या होत्या. येथे सामीरा जमातीचे लोक होते. ही माणसे कधीच कोणाबरोबर जेवत नाही आणि त्यांना जेवतानाही कोणी पाहिले नाही. त्यांची लग्ने बाहेरच्या समाजात होत नाहीत. १२ व्या शतकापासून अनेक मुस्लिम व्यापारी, सुफी संत काबुल, मुलतान मार्गे भारतात येत होते.

प्रवासवर्णन करताना त्यांचेही रसाळ उल्लेख पानोपानी येतात. त्याला मुली द्यायला अनेक अमीरउमराव उत्सुक असायचे. त्यामुळे त्याने त्याच्या प्रवासात बरेचदा लग्नेही केली. तो मुहम्मद तुघलकाच्या काळात आला आणि सुलतानाने त्याला चांगली वागणूक दिली. पण मूलतः सुलतानाचा स्वभाव संशयी असल्यामुळे कधी तो विश्वासातला अंमलदार असायचा तर कधी परकीय देशद्रोही ठरायचा. असे अनेकमान-अपमान सहन करीत इब्नबतूता मुलतानहून दिल्लीकडे जात होता.

आनंद स्पंदन

डॉ. अविनाश मोहरील

# इतर फाऊंडेशन्सचे काय?

नुकतेच वर्तमानपत्रात मी एका आयआयटीच्या तयारीच्या क्लासेसची पूर्ण पेजभर चकचकीत जाहिरात बघितली. जवळपास १० लक्ष रुपये त्यासाठी त्यांनी मोजले असणार! अतिशय आकर्षक अशी ती जाहिरात होती. सध्या असल्या क्लासेसचा सर्वच शहरांमध्ये प्रचंड गवगवा आहे. या सर्व क्लासेसमधून अतिशय परिश्रमपूर्वक मुला-मुलींना आयआयटीसारख्या अत्यंत प्रभावी शिक्षण देणाऱ्या संस्थांमधील प्रवेशासाठी तयार केले जाते. भारतात सध्या उपलब्ध असलेल्या आयआयटीच्या एकूण जागांच्या जवळपास ५० पट जास्त विद्यार्थी या क्लासेसमधून प्रशिक्षण घेत असतात. एकंदरीत अतिशय मोठ्या प्रमाणात स्पर्धा त्या ठिकाणी आहे. या क्लासेसच्या विविध वर्गवारी आहेत. म्हणजे अमुक एका गावाशी संबंधी असल्याने आम्ही कसे वेगळे आणि चांगले भवितव्य घडविणारे आहोत, हे विविध जाहिरातींच्या माध्यमांतून पालकांना पटविण्याची स्पर्धा सुरू असते. पालकांना पटविणे महत्त्वाचे




जुंपलेल्या बैलासारखा त्या कोवळ्या जिवाला स्वतःच्या मनाच्या आकांक्षांना जुंपायचे आणि त्याच्या जीवनात विविध अनुभव घेण्याच्या सर्व संधींपासून त्याला वंचित ठेवायचे, हा कुठला न्याय आहे. वयाच्या ११ व्या वर्षापासून त्याला एका स्पर्धेच्या स्वप्नात बांधायचे, पण मग बालपणी त्याला पडत असलेल्या अनेक रंगीबेरंगी स्वप्नांचे काय? त्यांनी दिवाळीत किल्ला कधी बनवायचा, पतंग कधी उडवायची, मित्रांसोबत रंग कधी खेळायचे, त्यांनी लगोरी कधी मांडायची, घरासमोर मोठ्ठी रांगोळी काढायला कधी शिकायचे, त्यांनी भांडायचे कधी, पडायचे कधी, फास्टर फेणे किंवा इसापनीतीच्या कथा कधी वाचायच्या, गड किल्ल्यांवर कधी चढायचे, पावसात चिंब कधी भिजायचे, त्यांच्या पायाला लोण्यासारख्या चिकणमातीचा स्पर्श कधी होणार, ते आपल्या घरी वाटेल तसे पाणी वापरीत असताना त्याच्या गावापासून थोड्याच अंतरावर लोक पाण्यासाठी एकमेकांचा जीव घेतात, हे त्याला क कळणार? आपण ८०० रुपयांचा पिझ्झा पटकन बोलावतो, पण तेवढे पैसे कम वायला एका कष्टकऱ्याला दोन दिवस तापत्या उन्हात घाम गाळून काम करावे लागते, हे त्याला कधी समजणार? हेमलकस्याच्या जंगलात

असते. कारण या क्लासेससाठी लागणारी भरमसाट फी अखेर त्यांनाच द्यायची असते. स्पर्धेच्या युगात हे सारे चालणारच. स्पर्धा म्हटली की ईर्ष्या आलीच आणि त्यापाठोपाठ व्यवहारही. शेवटी हे सर्व क्लासेस व्यावसायिक स्वरूपात प्रशिक्षण देत असल्याने व त्यांनाही स्पर्धेत टिकायचे असल्याने अशा प्रकारचे मार्केटिंग करावे लागणार हे गृहीतच आहे. शिवाय काही मोजकी कनिष्ठ महाविद्यालये सोडल्यास विविध कनिष्ठ महाविद्यालयांमधून शिक्षण घेणारे विद्यार्थी महाविद्यालयाच्या वेळात या क्लासेसमध्ये बसले असतात. यावरून या क्लासेसने परंपरागत शिक्षण प्रणालीला मात देणे सुरू केले आहे, हे मान्य करावे लागेल. परंतु या आयआयटीच्या जीवघेण्या स्पर्धेमध्ये काही महत्त्वाचे असे हरवत तर नाही ना, याचा विचार माझ्या मनात आला ती वर्तमानपत्रातील जाहिरात बघून.

आयआयटीसाठी प्रशिक्षण, बॅचेसची माहिती वगैरे गोष्टींसोबत एक गोष्ट मला बुचकळ्यात टाकून गेली; ती म्हणजे या क्लासेसतर्फे सहाव्या वर्गापासून आयआयटीचे फाऊंडेशन कोर्सेस सुरू होणार व त्याची नोंदणी करणे सुरू आहे, असा उल्लेख जाहिरातीमध्ये होता. सुरुवातीला मला आपण काही चूक वाचले की काय असे वाटले. दुर्दैवाने ती बाब खरी होती. सहाव्या वर्गापासून फाऊंडेशन कोर्स?

आयआयटीचा? मी चकित झालो. दोनच दिवसानी मला कळले की, त्या कोर्ससाठी नोंदणी अंतिम टप्प्यात असून पालकांनी त्यांच्या या कोर्सचे मनापासून कौतुक केले आहे. जेमतेम १०-११ वर्षांच्या मुला-मुलींना या कोर्सला प्रवेश करवून आपल्या चिमुकल्याचे आनंदविश्व उद्ध्वस्त करणाऱ्या त्या पालकांची मला खरोखरंच कीव वाटली. पालक म्हणून आपल्या पाल्यांच्या भावी आयुष्याबद्दल जागरूक राहून त्यांना उत्तम शिक्षण देणे ही पालकांची जबाबदारी असली, तरी त्याच्या बाल्यावस्थेतील सोनेरी व खळखळत्या क्षणांना अभ्यासाच्या व अपेक्षांच्या साखळ्यांनी आवळून निर्जीव करून टाकण्याचा अधिकार प्राप्त नाही. अशा प्रकारचे कृत्य करणार्या पालकांनी आपल्या मुलाच्या कोवळ्या व उमलत्या मनाचा विचार करायला हवा.

या पृष्ठभूमीवर एक मूळ प्रश्न उपस्थित होतो की, मुलाच्या इतक्या लहान वयापासून आयआयटीचे फाऊंडेशन तयार करणे या व्यतिरिक्त आवश्यक अशा व्यक्तित्व विकसनाच्या इतर फाऊंडेशन्सचे काय? हवा तितका पैसा देऊन घाणीला

गेली ४० वर्षे एक आमटे आडनावाचे डॉक्टर जोडपे किंवा धारणीतील वैरागड येथेही कोल्हे दाम्पत्य आदिवासी बांधवांच्या पुनरुत्थानासाठी आपले आयुष्य वेचताहेत, हे त्याला कधी कळणार?

गडचिरोलीत सर्च नावाच्या संस्थेद्वारे चालविले जाणारे डॉ. अभय व डॉ. राणी बंग यांच्या अद्भुत कार्याबद्दल किंवा मेळघाटातील वझ्झर येथे शंभराहून अधिक मूक- बधिर व अनाथ मुलांचा पिता बनून त्यांच्याकडून १५ हजार वृक्ष लागवडीचे काम करून घेऊन त्यांना आयुष्याचा आधार देणाऱ्या शंकरबाबा पापळकर यांच्या समर्पणाबद्दल या भविष्यातील आयआयटीयन्सना कधी माहिती मिळणार? समाजाच्या वंचित घटकांकरिता आयुष्य अर्पण करणाऱ्या पुण्यातील गिरीश प्रभुणे यांचे कार्य त्यांना कसे कळणार? त्यांचे आयआयटीचे फाऊंडेशन तयार करण्याच्या नादात या लहान लहान मुलांच्या जीवनाला खरा आकार देणारी किती फाऊंडेशन्स या अक्राळ-विक्राळ स्पर्धेपोटी आपण उद्ध्वस्त करतोय, याची जाणीव पालकांमध्ये फार कमी प्रमाणात दिसते. २१ वे शतक खरे तर तंत्रज्ञानाचे शतक आहे. या तंत्रज्ञानाच्या भाऊगर्दीत माणसाचे अस्सल माणूसपण हरवत चालले आहे. याला सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे आपल्या व्यवस्थांमधून निर्माण झालेला सामाजिकतेचा अभाव. मुळातच या स्पर्धेच्या व भौतिकतेच्या जगात प्रत्येकजण आपापल्या कोषात बंद होत चालला आहे. सामाजिक भान निर्माण होण्याच्या संधीच मुळात कमी झाल्यात. सुखाचे सोडा, पण एकमेकांच्या दु:खातही सहभागी होण्याइतपत संवेदना शिल्लक राहू नये किंवा त्यासाठी वेळ मिळू नये यापेक्षा जास्त दुर्दैव ते कोणते? अशा सामाजिक संवेदना संपत चालल्या असताना लहान लहान मुलांना स्पर्धेच्या आणि अपेक्षांच्या फाऊंडेशनला बांधून चालणार नाही. या उद्याच्या भारताला आपण असे जखडून टाकले तर येणारा काळ आपल्याला माफ करणार नाही. रस्ते, इमारती, यंत्रे निर्माण करणारे आयआयटीयन्स तयार होतील, पण त्यांच्या शिक्षण प्रक्रियेमध्ये सामाजिक जाणिवा जर निर्माण झाल्या नाहीत तर मग त्यांनी बनविलेल्या मशिन्समध्ये व त्यांच्यामध्ये काय फरक उरेल? सहाव्या वर्गापासून आयआयटीचे फाऊंडेशन तयार करताना त्या चिमुकल्यांचा निर्मळ जीवनानंद तर हिरावून घेत नाही ना, याचा विचार सुजाण पालकांनी जमल्यास जरूर करावा.

विवेचन

श्रीरंग हिर्लेकर

# नाचू कीर्तनाचे रंगी




कीर्तन हा शब्दही ठावूक नाही अशी व्यक्ती अभावानेच असेल. म्हणजे कीर्ती कथन आणि श्रवण. मात्र काही जण अज्ञानाने भजन, कीर्तन, प्रवचन या सर्वांची गणना एकाच मापाने करतात तर कोणी उपहासाने हा विषय फक्त म्हाताऱ्याकोताऱ्या, त्यातही देवभोळ्यांचा, टाळ कुटण्यात व्यर्थ वेळ घालवण्याचे साधन असाही करतात. भतृहरीच्या नीतिशतकात उंटाच्या बेढब शरीराचे कौतुक करताना गाढव 'अहो रूपं...' असे करते आणि प्रत्युत्तरादाखल उंट त्याच्या सुरेल आवाजातील गायनाचे 'अहो ध्वनिः।'असा करते. या अर्थाचा एक श्लोक आहे. तुम्ही आमच्या असल्या- नसल्या गुणांचे कौतुक करा आणि आम्ही तथाकथित गुणांचे कौतुक करू, अशी परस्पर प्रशंसा करणारी मनोवृत्ती सर्वत्र आढळते.

'हनुमान चालीसा' या स्तोत्राच्या धर्तीवर लालुचालीसा किंवा अशा प्रकारच्या कीर्तनांना तर राजकीय निवडणूक प्रचारात अक्षरशः ऊत येतो. कीर्तन शब्दाचे हे विडंबन आहे. कीर्तन शब्दांत जी उदात्तता आहे, जी उत्स्फूर्तता आहे ती निराळीच. निर्गुण परमेश्वराच्या सगुण रूपाचे गुणवर्णन अपेक्षित आहे. अज्ञानी समाजाला हळूहळू बोध करीत सगुणातून निर्गुणाकडे वळवण्याचे ते एक प्रभावी साधन आहे. एकदम निर्गुणाचा मोठा घास घेता येणार नाही म्हणून आई जशी लहान बाळाला लहान लहान, मऊ- मऊ घास करून भरवते तसे चांगले कीर्तनकार श्रोत्यांना भरवत असतात. प्रवचन हे तर फार उच्च कोटीचे असते. त्याचा दर्जा प्रत्यक्ष वेद वचनांचा. प्रत्यक्ष वचन ते प्रवचन. आज मात्र आपण परमेश्वराच्या सगुण कीर्तनापुरताच विचार करू. श्रीमद् भागवतात कीर्तनाचे महत्त्व सांगताना कलियुगातील ते साधन असल्याचे म्हटले आहे.

**कलेर्दोषनिधे राजन्नस्ती ह्येको महान्गुणः।**
**कीर्तनादेव कृष्णस्य मुक्तसंगः परं व्रजेत॥** किंवा
**कृते यत् ध्यायतो विष्णुं त्रेतायां यजतो मखैः।**
**द्वापरे परिचर्यायां कलौ तद्धरिकीर्तनात्।**

असेच नारदीय भक्तिसूत्र पण म्हणते: 'लोकेऽपि भगवत् गुणश्रवण कीर्तनात्। ज्ञानेश्वर माउलींनी भगवंत-भक्त संबंधात केलेली कीर्तनाची व्याख्या आता भक्त ते भगवंत अशी उलट करून म्हणता येईल की, 'तयांच्या गुणांची लेणी। लेववू अपुले वाणी। तयांची कीर्त श्रवणीं। आम्ही लेवू।' महर्षी नारदांनी भक्तीविषयी सांगतांना जे ९ प्रकार सांगितलेत ते असे-

**श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम्।**
**अर्च वन्दनं दास्यं सख्यमात्मनिवेदम्॥**

श्रवण कोणासारखे असावे तर परीक्षितासारखे आणि कीर्तन करावे तर ते शुक मुनींसारखे. हेच दोघे का तर ज्याला आपला मृत्यू फक्त ७ दिवसांवर असल्याचे कळूनही खरोखर जिज्ञासा उत्पन्न झाली म्हणून सर्व इंद्रियांची शक्ती श्रवणेंद्रियांच्या ठिकाणी एकवटून ऐकतो तो परीक्षित खरा श्रोता; आणि कीर्तनकार पण कोणी सामान्य नाही, तर 'नमोस्तुते व्यासविशाल बुद्धे' अशा महर्षी व्यासांपेक्षाही वैराग्यात किंचित एक पाऊल पुढेच 'मूर्तिमंत वैराग्यच म्हणावे- असे त्यांचे तरुण सुपुत्र शुकमुनीच. कीर्तन परंपरेचे प्रवर्तक महर्षी नारद. त्यांनी महर्षी व्यासांना आणि त्यांनी शुकाचार्यांना ही परंपरा दिली. नारदीय कीर्तन ही भक्तीची परंपराच त्यांनी निर्माण केली. त्यामुळे नारदांना वंदन करूनच कीर्तनाचा आरंभ करावा, असा संकेत आहे. साहजिकच त्या पीठावरून कीर्तनात काय बोलावे आणि काय नाही याचे भान कीर्तनकारांनी ठेवणे महत्त्वाचे आहे. औचित्याचा भंग होऊ देऊ नये. ईश्वरीय गुणांचे संकीर्तन करत नाठाळांना भक्तिमार्गावर यावयास भाग पाडणे हे तेथील साध्य आहे.. संकीर्तन म्हणजे संगीताचा यथायोग्य उपयोग करत कथा निरुपण करणे. संगीताचा आणि भक्तीचा अनन्य संबंध आहे.

**नाहं वसामि वैकुण्ठे, योगिनां हृदये न च।**
**मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ॥**

असे भगवंताचे अभिवचन आहे. म्हणजे मी वैकुण्ठात सापडणार नाही. योग्यांच्या हृदयातही दिसणार नाही. मात्र, माझे भक्त प्रेमाने जेथे माझे गुणगान करत असतील तेथे मात्र मी निश्चितच असेन. 'वेदानां सामवेदोऽस्मि' म्हणजे ४ वेदातील सामवेद ही माझीच विभूती असे कृष्णानेही अर्जुनाला सांगितले. सामवेद म्हणजे संगीतांतील स्वर, ताल, लय आणि राग यांचे सूत्रबद्ध ज्ञान.

### कीर्तन सांप्रदाय

नारदांनी सुरू केलेली परंपरा शुकमुनींनी सर्वत्र पसरवली. साहित्य, वक्तृत्व, अभिनय, भाषासमृद्धी, शुद्ध शब्दोच्चार, विनोदबुद्धी, जगातील महत्त्वाच्या दैनंदिन घटनांची अद्ययावत् माहिती आणि संगीत हे सर्व गुणकीर्तनाला आवश्यक आहेत. संगीतात जशी देशकालानुरूप घराणी आहेत तसेच कीर्तनांत अनेक पद्धती निर्माण झाल्या. (पान ६ वर)



## आदिशक्ती रेणुका..

आश्विनात शुद्धपक्ष नेत्रदीप सोहळा
शोभतेस रक्तवर्ण तेजपुंज तांदळा
आस लागली मनास दाविशीस पादुका
धाव पाव प्रार्थनेस आदिशक्ती रेणुका..
शुंभ आणि दैत्य सर्व तू रणात मारले
हे बघून देव लोक हर्षयुक्त जाहले
दिव्यशक्ती शूरवीर तूच तार बालका
धाव पाव प्रार्थनेस आदिशक्ती रेणुका..
मातृशक्ती मंदिरात सज्ज होत बैसली
दिव्यतेज व्योराज लोहगोल भासली
पर्वताग्र राहतेस मूळपीठ नायिका
धाव पाव प्रार्थनेस आदिशक्ती रेणुका..
शोकसागरात माय डुंबलो असा जरी
त्राण येतसे कुडीत मूर्त देख हासरी
लक्ष भक्त दर्शनास येति माय अंबिका
धाव पाव प्रार्थनेस आदिशक्ती रेणुका..

देवेंद्र जोशी

## विजयादशमी

सोनियाचा सण सोनियाचा दिन
शमीपर्ण सोनपर्ण देता घेता हर्षे मन...
विजयादशमी सण शुभदिन विजयदिन
स्नेहभेट क्षणभर सोनपर्णाचा मान...
रावण दहन दुराचाराचे हनन
मर्यादापुरुषोत्तम मनोन नमन...
संस्काराचा सण आरंभ सीमोल्लंघन
नैतिकतेचा विजय दसरा आनंदून ...
उल्हसित आनंदित सारे जन जन
स्नेहभेटीत आनंद मधुबोल धन...

मीना खोंड

# मंदिराभिमुख समाज

आकलन
अनिल सांबरे

## श्रद्धा, संस्कार, सेवा आणि सामर्थ्याचा संकल्प

### मंदिर संघटनेची आवश्यकता

मंदिर संघटनेची आवश्यकता हिंदू समाजाने पुन्हा हिंदू जीवनपद्धतीनुसार जीवन जगावे, याचा अर्थ केवळ धार्मिक विधी करणे असा नाही. सत्य, सदाचार, कर्तव्य, संयम, परस्पर सहकार्य, निसर्गाविषयी आदर आणि सर्वांच्या कल्याणाची भावना आपल्या दैनंदिन आचरणात उतरावी, ही त्यामागची अपेक्षा आहे. व्यक्तीचे जीवन संस्कारित व्हावे, कुटुंबातील नाती दृढ व्हावीत आणि समाजात आत्मीयता निर्माण व्हावी, यासाठी सातत्याने प्रेरणा देणारी केंद्रे आवश्यक आहेत. आपल्या परिसरातील मंदिर ही भूमिका प्रभावीपणे निभावू शकते. मंदिरात येणाऱ्या भक्ताला दर्शनाबरोबर जीवनाची दिशा मिळावी, दुःखी माणसाला आधार मिळावा, नव्या पिढीला संस्कार मिळावेत आणि समाजाला संघटित कार्याचे सामर्थ्य मिळावे. यासाठी मंदिरांना जागृत, सक्रिय आणि समर्थ बनवण्याची गरज आहे. मंदिर हे श्रद्धाकेंद्र, संस्कारकेंद्र, सेवाकेंद्र आणि शक्तिकेंद्र व्हावे, ही काळाची आवश्यकता आहे.

### हिंदू जीवनपद्धतीला आचरणाची जोड

हिंदू जीवनदृष्टी व्यक्ती आणि समाज यांचा एकत्रित विचार करते. आपल्या सुखाबरोबर दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव ठेवणे, कुटुंबातील ज्येष्ठांचा आदर करणे, श्रमाची प्रतिष्ठा मानणे, गरजूंना मदत करणे आणि आपल्या कर्तव्याचे प्रामाणिक पालन करणे, ही तिची व्यवहारातील रूपे आहेत. पूजा, उत्सव यांच्या माध्यमातून या मूल्यांची आठवण होते; परंतु त्यांचे महत्त्व प्रकट होते. श्रद्धा आणि व्यवहार यांची अशी सांगड घातली, तर मंदिराशी जोडलेला माणूस सकारात्मक बदल घडवू शकतो.

### श्रद्धेला दिशा देणारे मंदिर

मंदिरात माणूस श्रद्धेने येतो. कुणी आनंद व्यक्त करण्यासाठी, कुणी संकटातून मार्ग शोधण्यासाठी, तर कुणी मनःशांतीसाठी देवासमोर उभा राहतो. या प्रत्येक भावनेचा आदर करून मंदिराने त्याला सद्विचारांची आणि सेवाकार्याची दिशा द्यावी. भक्तीमुळे मनाला स्थैर्य मिळावे आणि त्या स्थैर्यातून कर्तव्य निभावण्याचे बळ निर्माण व्हावे. नियमित आरती, भजन, कीर्तन, ग्रंथवाचन आणि विचारप्रबोधन यांचे नियोजन करता येईल. त्यातील विषय सामान्य माणसाच्या जीवनाशी जोडलेले असावेत. कौटुंबिक सलोखा, व्यसनमुक्ती, प्रामाणिकपणा, सामाजिक जबाबदारी आणि पर्यावरणाची काळजी यांवर संवाद व्हावा. मंदिरातील आध्यात्मिक वातावरणातून व्यक्तीला चांगले जीवन जगण्याची प्रेरणा मिळणे, हे या प्रयत्नांचे मुख्य उद्दिष्ट असावे.

### नव्या पिढीसाठी संस्कारकेंद्र

मुलांना आणि युवकांना मंदिराशी जोडताना त्यांच्या मनातील प्रश्न समजून घेतले पाहिजेत. परंपरेचा अर्थ, सणांचे महत्त्व आणि उपासनेमागील विचार त्यांना समजेल अशा भाषेत सांगितला पाहिजे. प्रश्न विचारण्याची संधी आणि समजून घेणारे मार्गदर्शन मिळाले, तर त्यांची नाळ मंदिराशी अधिक सहजपणे जोडली जाईल. बालसंस्कार वर्ग, कथाकथन, श्लोकपठण, वाचन उपक्रम, व्यक्तिमत्त्व विकास आणि सेवाकार्यातील सहभाग यांमधून हे काम करता येईल. मुलांना ज्येष्ठांना मदत करणे, परिसर स्वच्छ ठेवणे, पुस्तके वाटणे किंवा झाडांची काळजी घेणे अशी छोटी कामे देता येतील. युवकांना आयोजनाची जबाबदारी दिल्यास त्यांच्यात नेतृत्व, शिस्त आणि सहकार्य विकसित होईल.

### 'माझे मंदिर, माझी जबाबदारी'

मंदिराची जबाबदारी फक्त विश्वस्त, अर्चक किंवा काही कार्यकर्त्यांवर सोपवून समाजाने दूर राहणे योग्य नाही. प्रत्येक भक्ताने 'माझे मंदिर, माझी जबाबदारी' ही भूमिका स्वीकारली पाहिजे. मंदिरात दर्शनाला येताना त्याच्या गरजा, स्वच्छता आणि उपक्रम यांकडेही लक्ष द्यावे. क्षमतेनुसार वेळ, श्रम, कौशल्य किंवा आर्थिक सहकार्य द्यावे.

### भक्तांच्या सहभागातून सक्षम व्यवस्थापन

मंदिराचे व्यवस्थापन श्रद्धेइतकेच जबाबदारीचे कार्य आहे. दैनंदिन व्यवस्था, धार्मिक कार्यक्रम, मालमत्तेची देखभाल, कर्मचारी, देणग्या आणि सेवाउपक्रम यांचा सुव्यवस्थित विचार करावा लागतो. यासाठी प्रामाणिक, कार्यक्षम आणि समाजाशी संवाद ठेवणारी व्यवस्था आवश्यक आहे. विश्वस्त आणि भक्त यांच्यात नियमित संवाद असावा. मंदिराच्या गरजा, नियोजित कामे आणि खर्चाची माहिती स्पष्टपणे मांडावी. भक्तांच्या सूचना ऐकण्यासाठी बैठका घ्याव्यात. सेवा, स्वच्छता, संस्कार आणि उत्सव यांसाठी कार्यगट करता येतील. सहभागामुळे व्यवस्थापनाला अधिक हात मिळतात आणि समाजाचा विश्वास वाढतो.

### स्वायत्त आणि उत्तरदायी मंदिर व्यवस्था

मंदिरांचे व्यवस्थापन हिंदू समाजाने जबाबदारीने करावे आणि मंदिरांना सरकारी नियंत्रणातून मुक्त करण्यासाठी कायदेशीर व लोकशाही मार्गाने प्रयत्न व्हावेत, ही भूमिका समाजासमोर स्पष्टपणे मांडली पाहिजे. मंदिराच्या धार्मिक परंपरा, उपासना आणि भक्तांच्या श्रद्धेचा आदर राखणारी स्वायत्त व्यवस्था विकसित होणे आवश्यक आहे. स्वायत्ततेबरोबर उत्तरदायित्वही स्वीकारले पाहिजे.

### स्वच्छता अभियानातून सामूहिकतेचा संस्कार

मंदिर स्वच्छता अभियान हे समाजाला एकत्र आणण्याचे प्रभावी माध्यम आहे. परिसरातील कुटुंबे, युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सामाजिक संस्था एकत्र येऊन श्रमदान करू शकतात. एकत्र काम केल्याने परस्पर परिचय वाढतो आणि मंदिराशी आपलेपणाचे नाते तयार होते. सभामंडप, अंगण, प्रवेशमार्ग आणि परिसर स्वच्छ ठेवावा. निर्माल्य आणि इतर कचऱ्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करावी. गर्भगृह, मूर्ती आणि पूजेच्या वस्तूंची स्वच्छता अर्चकांच्या मार्गदर्शनाखाली करावी.

### मंदिरात येऊ न शकणाऱ्यांपर्यंत पोहोचणे

समाजातील काही भक्त वृद्धत्व, आजारपण, दिव्यांगत्व किंवा कौटुंबिक अडचणींमुळे मंदिरात येऊ शकत नाहीत. त्यांच्याशीही मंदिराचे नाते टिकले पाहिजे. भक्त मंदिरापर्यंत येऊ शकत नसेल, तर मंदिराने सेवाभावाने त्याच्यापर्यंत पोहोचावे. स्वयंसेवकांनी अशा व्यक्तींशी संपर्क ठेवावा, त्यांच्या घरी भेट द्यावी आणि गरजा समजून घ्याव्यात. शक्यतेनुसार प्रसाद, धार्मिक ग्रंथ किंवा भजनाचा लाभ पोहोचवता येईल. त्यांच्या आरोग्यासाठी प्रार्थना करणे-पूजा करणे. औषधे आणणे, रुग्णालयात जाण्यास मदत करणे अथवा आवश्यक सेवांशी संपर्क करून देणे अशा कामांत सहकार्य करता येईल.

### समाजाच्या गरजांशी जोडलेले सेवाकेंद्र

प्रत्येक मंदिराने आपल्या परिसरातील गरजा जाणून घ्याव्यात. कुठे विद्यार्थ्यांना अभ्यासाची जागा हवी असेल, कुठे ज्येष्ठांना आधार हवा असेल, तर कुठे आरोग्यविषयक मार्गदर्शनाची गरज असेल. उपलब्ध जागा, निधी आणि स्वयंसेवकांच्या क्षमतेनुसार उपक्रम निवडावेत.

### मंदिराचा निधी समाजकल्याणासाठी

भक्तांनी मंदिराला दिलेली देणगी ही श्रद्धेतून आलेली असते. तिचा उपयोग करताना मोठी जबाबदारी स्वीकारावी लागते. नित्यपूजा, धार्मिक परंपरा, देखभाल आणि आवश्यक खर्च यांची योग्य व्यवस्था करून उपलब्ध निधीतून हिंदू समाजाच्या कल्याणासाठी नियोजनबद्ध कार्य व्हावे. विद्यार्थ्यांचे शिक्षण, गरजूंच्या उपचारासाठी मदत, संस्कार उपक्रम आणि संकटग्रस्त कुटुंबांना आधार यांसाठी निधी वापरता येईल. हे नियोजन लागू नियम आणि मंदिराच्या उद्दिष्टांशी सुसंगत असावे. कोणाला, कशासाठी आणि किती मदत दिली, याची नोंद ठेवावी. खर्चाची पारदर्शकता आणि कामाचा प्रत्यक्ष परिणाम समाजासमोर आल्यास भक्तांचे सहकार्य अधिक दृढ होते.

### समरसतेतून समाजाचे शक्तिकेंद्र

मंदिराच्या परिसरात येणाऱ्या प्रत्येक भक्ताला सन्मान आणि आपुलकी मिळाली पाहिजे. विविध समाजघटकांनी एकत्र बसणे, उपासना करणे, उत्सव साजरे करणे आणि सेवा करणे यांतून सामाजिक जवळीक वाढू शकते. भजन, सहभोजन आणि श्रमदान यांसारखे उपक्रम ही भावना दृढ करू शकतात.

### मंदिरांच्या संघटनातून व्यापक कार्य

एका मंदिराचे कार्य महत्त्वाचे असते; परंतु अनेक मंदिरे परस्पर जोडली गेल्यास अनुभव, साधने आणि मनुष्यबळ यांची देवाणघेवाण करता येते. परिसर, तालुका आणि जिल्हा स्तरावर मंदिरांचे संपर्कजाळे तयार व्हावे. विश्वस्त, अर्चक, पुरोहित आणि सक्रिय भक्त यांचा नियमित संवाद असावा. चांगले उपक्रम इतर मंदिरांपर्यंत पोहोचवता येतील. व्यवस्थापन, स्वच्छता, संस्कारवर्ग आणि सेवाकार्य यांबाबत परस्पर मार्गदर्शन करता येईल. लहान मंदिरांना आवश्यक सहकार्य मिळू शकेल.

### मंदिराधारित अर्थव्यवस्था आणि युवकांना रोजगार

मंदिर हे धार्मिक आणि सामाजिक जीवनाबरोबरच स्थानिक अर्थव्यवस्थेलाही गती देणारे केंद्र होऊ शकते. मंदिरात येणाऱ्या भक्तांच्या विविध गरजांमुळे अनेक लहान व्यवसायांना आधार मिळतो. फुले, पूजासाहित्य, प्रसाद, धार्मिक ग्रंथ, स्थानिक हस्तकला, भोजन, निवास आणि वाहतूक अशा सेवांमधून रोजगाराच्या संधी निर्माण होतात. पारंपरिक कला, मूर्तिकला, वाद्यनिर्मिती, वस्त्रनिर्मिती आणि पूजेसाठी लागणाऱ्या वस्तू तयार करणाऱ्या कारागिरांना मंदिरांशी जोडता येईल. स्थानिक उत्पादकांकडून दर्जेदार साहित्य घेण्याची पद्धत विकसित झाल्यास परिसरातील अर्थव्यवस्थेला बळ मिळेल. निर्माल्यापासून खत तयार करणे, पर्यावरणपूरक पूजासाहित्य उपलब्ध करणे आणि स्थानिक हस्तकलेची विक्री करणे अशा उपक्रमांतून सेवा आणि उपजीविका यांची सांगड घालता येईल. मात्र प्रत्येक उपक्रमात स्वच्छता, गुणवत्ता, योग्य दर आणि भक्तांच्या सोयीचा विचार आवश्यक आहे. युवकांना केवळ काम उपलब्ध करून देण्याबरोबर त्यासाठीचे प्रशिक्षण आणि मार्गदर्शनही मिळावे. मंदिरांनी उद्योजक आणि विषयतज्ज्ञांच्या सहकार्याने कौशल्यविकास व स्वयंरोजगार मार्गदर्शन आयोजित करावे. रोजगाराच्या संधींची माहिती गरजू युवकांपर्यंत पोहोचवावी. मंदिराच्या पावित्र्याचा आणि उपासनेच्या व्यवस्थेचा आदर राखून विकसित केलेली अर्थव्यवस्था समाजाला आर्थिक सामर्थ्य देऊ शकते. (पान ६ वर)

पुस्तक परिचय
दिलीप क्षीरसागर

## ज्येष्ठ संघ प्रचारक उदय जोगळेकर यांच्या आठवण व्यक्तींची साठवण प्रसंगांची या पुस्तकाचे नुकतेच पुण्यात मा. सहसरकार्यवाह अतुलजी लिमये यांच्या हस्ते प्रकाशन झाले. त्या पुस्तकाचा हा परिचय...

राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील गृहस्थी कार्यकर्ता व पूर्णवेळ प्रचारक अशा कार्यकर्त्यांच्या दोन श्रेणी आहेत. या दोघांच्या परिश्रमातून संघाची शतकी वाटचाल झालेली आहे. प्रचारक हा घटक प्रेरक म्हणून काम करत असतो. संघटनांतर्गत घडामोडींचा स्वतः कर्ता न होता, अशा घडामोडी घडवून संघटनेचे पाऊल पुढे पडण्यासाठी तो अप्रत्यक्षरीत्या भरपूर परिश्रम करत असतो. त्यामुळे पूर्णवेळ प्रचारक हा बाल-किशोर- तरुण- प्रौढ व गृहस्थी कार्यकर्त्यांच्या कुटुंबातील सर्वांचे आकर्षण असतो. अशाच प्रचारक मांदियाळीतील महाराष्ट्रातील ज्येष्ठ प्रचारक उदय तथा तात्या जोगळेकर यांनी आपल्या प्रचारकीची जीवनातील व्यक्ती व प्रसंगांचे चित्रण आठवण व्यक्तींची, साठवण प्रसंगांची या अनुभवपर कथनात्म क पुस्तकातून केली आहे. घरातून संघकार्याचा समृद्ध वारसा मिळालेले तात्या जोगळेकर हे वास्तूरचनाकारची पदवी घेऊन पूर्ण वेळ संघाचे प्रचारक म्हणून बाहेर पडले. त्यांच्या सोलापूर, मुंबई, कोकण अशा विविध कार्यक्षेत्रातील काही प्रातिनिधीक व्यक्ती- संस्था यांचा उद्बोधक परिचय आपल्याला या पुस्तकातून होतो.

### आणीबाणीत प्रचारक

लेखकाच्या बालपणीच्या रम्य आठवणी, माता- पिता, बंधू (ज्येष्ठ पत्रकार व लेखक सुधीर जोगळेकर) या सगळ्यांची संघ समज व अनुभवांची शिदोरी संघप्रचारक निघताना त्यांच्यापाशी होती. अर्थातच कोरी पाटी असणे आणि अशी शिदोरी असणे यात फरक असतो. अर्थातच संघाचे घर असल्यामुळे कै. लक्ष्मणराव इनामदार, कै. सुरेशराव केतकर, कै. वसंतराव केळकर,कै. वसंतराव भिडे, कै. नानाराव ढोबळे अशा ज्येष्ठ प्रचारकांचे पाय ज्या खोलीत लागलेले होते, त्याच खोलीत तत्कालीन विभाग प्रचारक सुमंतराव घायाळ तात्यांना पूर्णवेळ प्रचारक म्हणून घोषित करतात.खरेतर औपचारिक प्रचारक बैठक होऊन त्यात नियुक्ती होत असते. परंतु त्या बैठकीत त्यांना जाता आले नव्हते. त्यामुळेही एका अभिनव पद्धतीने झालेली नियुक्ती म्हणावी लागेल. अशा प्रचारक कार्यकर्त्याला घडवणारे संघामध्ये देखील काही असावे लागतात. त्यातील काही कार्यकर्त्यांचे अत्यंत कमी शब्दात परंतु विविध पैलूंचे वर्णन करणारे शब्दचित्र आहे. आणीबाणी (१९७५) असताना बंदीमुळे संघ कामावर शासनाची वक्रदृष्टी होती. तरीही अशा कालावधीत लेखक पूर्णवेळ प्रचारक म्हणून बाहेर पडतात. त्यात आणीबाणीचे संकट त्यामुळे हे सतीचे वाण घेऊन पदरात निखारा बांधून घेण्यासारखे त्यांचे काम होते. परंतु ज्येष्ठ संघ कार्यकर्त्यांनी सामान्य संघ स्वयंसेवकांपर्यंत मनोधैर्य टिकवून ठेवले हा इतिहास विलक्षण आहे.

### सोलापूर - गृहस्थी कार्यकर्ते

सोलापूर जिल्ह्याच्या संघ कामातील तपस्वी गृहस्थी कार्यकर्त्यांचे शब्दांकन हे प्रेरणादायी आहे. स्वतःच्या व्यवसायातील ज्येष्ठता आणि व्यवहारातील सात्विक शुचिता जपणारे संघ पदाधिकारी आहेत. ग्रामीण भागात रामभाऊ म्हाळगींसारख्या प्रचारकाने पेरलेल्या संघबीजाला आलेले फळ अनुभवण्यास मिळते. पूर्ण वेळ प्रचारक कार्यकर्त्याला गृहस्थी कार्यकर्ते सहजगत्या संघ कामातील अभ्यास करण्याचा संस्कार करून जातात. संघ कामाचा प्राण शाखा आहे तसे हॉटेल व्यवसायातील संघ कार्यकर्त्याला लाभदायक असणारे बाकडे तसे असल्याचे श्रद्धेने स्वयंसेवक म्हणतो. संघ संस्कार मनात किती खोलवर रुजलेला आहे हे जाणवते.प्रचारक हा आपल्या कुटुंबातील एका घटकाप्रमाणे असून त्याची सर्व ख्याली-खुशाली, भोजन, कपडे तसेच निवासासाठी स्वतःच्या घरातील एक खोली प्रचारकासाठी राखून ठेवणारे कार्यकर्ते आहेत.




संघ प्रचारकाचे कार्यकर्त्यांकडे भोजनास जाणे ही व्यवस्था हा देखील एक अभ्यासाचा विषय विषय आहे. त्यातील अनेक मनोरंजक गमती जमती एका प्रकरणात येतात. कारण भोजन हे सर्वस्वी घरातील गृहलक्ष्मीच्या नियंत्रणातील विषय आहे. संघ कार्यकर्ते प्रेमाने व आत्मीयतेने प्रचारकास भोजनास बोलवत असतात. पण यातून देखील काही गमती जमती घडतात. अर्थात अशा सहस्त्रावधी गृहलक्ष्मी संघ प्रचारकांच्या भोजनाची दीर्घकाळ जबाबदारी घेत आहेत. संघ कामातील तो वैशिष्ट्यपूर्ण पैलू आहे. याचे वर्णन यात आहे. हे सर्व गृहस्थी कार्यकर्ते किती सहजपणे स्वतःचे काम म्हणून करत असतात यातला खोलवर रुजलेला संघ संस्कार हा अभिनव आहे. महाराष्ट्र प्रांताचे तत्कालीन संघचालक कै. प्रल्हादजी अभ्यंकर हे संघटन कार्यातील सूत्र सांगताना म्हणतात,समाजात मोठा असलेला व्यक्ती संघात अत्यंत लहान काम करतो व समाजात कामाच्या दृष्टीने अत्यंत छोटे स्थान असलेली व्यक्ती संघामध्ये मोठ्या जबाबदारीचे निर्वहन करीत असतात. अशी काही व्यक्तिमत्वे आपल्याला या पुस्तकात चित्रित झालेली दिसतात. समर्पण हा संस्कार स्वयंसेवकांवर सातत्याने होत असतो. त्यातील गुरुदक्षिणेचे समर्पण हे खरचटून गेले पाहिजे असे ज्येष्ठ कार्यकर्ते म्हणतात. याचा अर्थ समर्पण हे आपल्या कौटुंबिक अंदाजपत्रकात झळ लागणारे असले पाहिजे याची जाणीव व्हायला पाहिजे.

### प्रचारक निघणारी घरे

गृहस्थी कार्यकर्त्याच्या मनातील एक उत्कट भावना असते ती म्हणजे आपल्या पुढच्या पिढीत संघकाम संक्रमित व्हावे आणि त्यातूनही पूर्ण वेळ प्रचारक निघणे हा दुग्धशर्करा योग असतो. अशी प्रचारक निघणारी घरे हा देखील संघ कामातला समर्पणाचा मोठा संस्कार आहे. एकाच कुटुंबातून संघ प्रचारक, राष्ट्र सेविका समितीच्या प्रचारिका आणि आई- वडील हे वानप्रस्थी कार्यकर्ते म्हणून जातात असे घाटे कुटुंबीय आहे. तर घरातील दोघे भाऊ-भाऊ, बहीण असे देखील प्रचारक किंवा विद्यार्थी परिषदेचे पूर्ण वेळ कार्यकर्ता निघण्याची परंपरा अनेक घरांमध्ये आहे. वडील आणि मुलगा दोघेही प्रचारक निघण्याची परंपरा आहे. कालांतराने कामाचे महत्त्व कळल्यानंतर व आपल्या मुलातील झालेला बदल लक्षात घेऊन या कुटुंबांचेही मन परिवर्तन झालेले दिसते.

### महिला शक्ती

संघ कामातील महिला शक्तीबद्दल बरीच चर्चा होते. संघकार्याची माहिती न घेता संघातील महिलांच्या स्थानाविषयी प्रश्न विचारले जातात. संघकामात व संघप्रेरित सामाजिक कार्यातील महिलांचा सहभाग आहे. महिलांच्या सक्षमीकरणाने सहस्त्रावधी कुटुंबांचे जीवन उजळून निघणाऱ्या कार्याच्या प्रेरणास्त्रोत अशा चंद्रिकाभाभी चौहान आहेत. तर अत्यंत दारिद्र्याच्या परिस्थितीत आपला मुलगा संघाचा पूर्णवेळ प्रचारक जातो आहे. या भावनेने स्वतःच्या पोटाला टाच देऊन ती माऊली पत्रात म्हणते, मी इथे रोज कालवणाबरोबर भाकरी खात आहे शहरी वातावरणात वाढलेल्या लेखकाला केव्हातरी त्या माऊलीच्या घरात गेल्यावर लक्षात आले की अठरा विश्व दारिद्र्य असल्यामुळे भाकरीबरोबर ठेचा किंवा कांदा हे कोरडे कालवण होते. समर्पणाच्या या संस्काराने वाचकाच्या डोळ्यात दोन अश्रू आल्याशिवाय राहणार नाही. लेखकाच्या संपर्कात आलेल्या महिला कार्यकर्त्यांचे कर्तृत्व व समर्पणाबद्दल माहिती देऊन जातो. लेखकाच्या कौटुंबिक पृष्ठभूमीवर संघाचे संस्कार असल्यामुळे प्रचारक जाण्यासाठी अनुकूलता होती परंतु पुढे प्रचारक निघाल्यावर ज्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा खोलवर संस्कार आहे व प्रभाव आहे असे कै. मधुभाई कुलकर्णी, कै. सुरेशराव केतकर यांच्या कार्यशैलीची वैशिष्ट्ये लेखक अधोरेखित करतात.

### सेवा विभाग

सेवा विभागाची जबाबदारी आल्यानंतर सेवा प्रकल्पात येणाऱ्या सामान्य परिस्थितीतील गुणवान विद्यार्थिनी, तर अशा सेवाकार्यास भरभरून देणारे धनको तसेच अत्यंत आत्मविश्वासाने कितीही मोठ्या धनकोंकडे सेवा कार्यासाठी लागणाऱ्या धनाची अपेक्षा व्यक्त करणारे कार्यकर्ते आपल्याला कळतात. रेल्वे स्टेशनवर घरातून पळून आलेल्या मुलांकडे लक्ष देऊन त्यांना नीट मार्गी लावून पुन्हा कुटुंबात पाठवण्याचा प्रकल्प उभा करणारे समतोल फाउंडेशनच्या कामामुळे सेवाक्षेत्रात वैविध्यपूर्ण कामे प्रतीक्षा करीत आहेत याची जाणीव होते.

### स्वेच्छा निवृत्ती

नोकरीत असते तशी प्रकृती अस्वास्थ्यामुळे लेखकाला प्रचारकी जीवनातून स्वेच्छा निवृत्ती घ्यावी लागली. ज्या कामात प्रवास, भेटी यावर होणारी शारीरिक दगदग कमी करून बैठ्या स्वरूपाचे काम करणे शक्य आहे असे राष्ट्रीय सेवा भारतीच्या कामातील त्यांचे काही अनुभव आहेत.त्या अंतर्गत ग्रामविकास सारख्या कामांचा लेखकाला जवळून परिचय झाला. त्याचेही चित्रण या पुस्तकात आहे.

### संघ कार्यालय प्रभाव

संघातील अनेक वैशिष्ट्यांमध्ये संघाला मिळालेल्या वास्तू होय.ज्या पुढे संघकार्यासाठी वापरल्या जातात. समर्पित संघ कार्यकर्त्यांच्या वास्तव्याने या वास्तूंची सुद्धा एक सात्विक शक्ती निर्माण होत असते.अशा पुण्यातील कोशिक आश्रम या जुन्या वास्तुत व त्याचे नवनिर्माण झाल्यावर देखील लेखकाचा निवास आहे. या वास्तूतील संस्कार, या वस्तूने घडवलेले कार्यकर्ते हि वास्तूची वैशिष्ट्ये देखील आपल्याला या पुस्तकात दिसतात.

खरे तर एक- एक संघ कार्यकर्ता आणि त्यात देखील पूर्ण वेळ संघ प्रचारक यांच्याकडे संघकामातील एवढ्या विविध आठवणींचा आणि प्रसंगांचा संग्रह असतो की त्यातून कितीतरी गोष्टी पुढच्या पिढीला प्रेरक असतात. तर अभ्यास करणाऱ्यांना संघ कामाचे विविध पैलू लक्षात आणून देण्यासाठी उपयोगी असतात. त्यातील काही आठवणींचा संग्रह आणि त्यानिमित्ताने या समर्पित कार्यकर्त्यांचे चित्रण या पुस्तकात आपल्याला वाचायला मिळतात. त्यामुळे हातात घेतल्यावर हे पुस्तक संपेपर्यंत खाली ठेवत नाही हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे. लेखकाची कथन शैली यातून आपल्याला लक्षात येते त्यामुळे हे पुस्तक वाचनीय झालेले आहे. संघशताब्दीच्या कालावधीत प्रकाशित झालेले हे पुस्तक संघ स्वयंसेवकांसाठी प्रेरणादायी व अभ्यासकांसाठी एक चांगला दस्तऐवज झाला आहे.

(लेखक राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत कार्यकारिणी सदस्य आहेत.)

पान २ वरून

## दसरा : गरज वैचारिक ...

अशी अपेक्षा आहे. महिषासुरमर्दिनीचा पराक्रम, रामाने रावणावर केलेली मात, रघुराजाचे दातृत्व, परधनाबद्दल विरक्ती, कौत्साची निर्मोही वृत्ती... यातून आपण योग्य तो बोध घेतला पाहिजे. या सणातला उत्साह, उल्हास, आनंद, प्रे हे जीवनाचे प्रेयस आहे तर वैचारिक सीमोल्लंघन हे आत्मशक्ती, संघटनशक्ती, अन्याय निवारण यासाठी पोषक ठरणारे म्हणजेच या सणातील श्रेयस आहे. उत्सव साजरा करताना श्रेयस आणि प्रेयसाचा योग्य समन्वय हवा. दसरा हा विजयाचा सण असल्याने षडरिपूंवर विजय हे आपले ध्येय असायला हवे. आजच्या भौतिक सुखाच्या मागे धावणाऱ्या तरुण पिढीवर योग्य संस्कार करण्याची जबाबदारी आपलीच आहे. सण म्हणजे 'धम्माल', 'मज्जामस्ती' हे नक्कीच खरे आहे; पण त्याचे रूपांतर 'धांगडधिंगा' आणि 'उन्मादात' होऊ नये. हा संयम आणि विवेक पुढील पिढीत रुजवणे ही काळाची गरज आहे. 'आला आश्विन आश्विन, जाती सीमा उल्लंघून, लुटा समतेचं सोनं, गात मानव्याचं गाणं' असा समानतेचा, वैचारिक उन्नतीचा, परस्परसौहार्दाचा दसरा साजरा करूया.

## राष्ट्रीय स्वयंसेवक...

उन्नतीसाठी प्रयत्न करणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा इतिहास का चालत नाही? थोडक्यात, मी भारतीय इतिहासलेखनाची जी तात्त्विक चर्चा वर केली, त्यामागचे कारण असे की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा इतिहास हा भारतीय इतिहासलेखनपरंपरेतील राष्ट्रवादी इतिहासलेखनप्रवाहातील एक स्वर्णि पान आहे! हे कार्य- योगदान अभ्यासक्रमातून नव्या पिढीसमोर यावे, ही त्यामागची तात्त्विक भूमिका! राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या बी. ए. भाग दोन चतुर्थ सत्रात, १८८५ ते १९४७ या कालखंडात 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे राष्ट्रबांधणीतील योगदान' याची चर्चा करताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना, उद्देश, विचारधारा व स्वातंत्र्यआंदोलनातील योगदान अपेक्षित आहे. 'स्वातंत्र्यआंदोलनातील संघ स्वयंसेवकांचे योगदान,' या भागाचा समावेश करण्यात आला आहे. या सर्व बाबींचा पाठ्यक्रमातील समावेश का महत्त्वाचा आहे, तर संघाची स्थापना ज्या उद्देशातून झाली, तो म्हणजे भारतीय समाज हा आत्मविस्मृत व विघटित होत चालला होता. परिणामी, भारतीयांची मानसिकता ही गुलामाची बनली. या आत्मविस्मृत समाजाला आत्मभान व आत्मस्मृती देऊन संघटित करण्याचे काम राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने केले. ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून भारताला जर स्वतंत्र्य मिळवून द्यायचे असेल, स्वातंत्र्यआंदोलन यशस्वी व मजबूत करायचे असेल, तर त्यासाठी राष्ट्राचे मन आणि आत्मा गुलामीच्या मानसिकतेतून मुक्त करावे लागेल. त्यासाठीच समाज संघटित करणे आवश्यक आहे. जर समाज संघटित झाला, तरच त्यात राष्ट्रीय भावना जागृत होईल आणि समाज जागृत झाला, तर तो सक्रिय होऊन स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत पोहोचेल.

भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीचे स्वप्न उराशी बाळगून देशाच्या सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात ९० वर्षांपासून आपले अमूल्य योगदान देणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्याचा इतिहास अभ्यासक्रमात समाविष्ट केला गेला आहे. कोणतीही समाजव्यवस्था, वैचारिक आंदोलन १०० टक्के यशस्वी होऊ शकत नाही. परंतु, त्या विचारधारांचा अभ्यास करूच नये, हे कुठले शहाणपण झाले? प्रत्येक विचारधारेचा अभ्यास हा वस्तुनिष्ठपणे झाला पाहिजे. आजपर्यंत संघाच्या योगदानाकडे दुर्लक्ष झाले, हे मान्य आहे. इतिहासाचे पुनर्लेखन हे होत असते. तथ्य संकलित करून संशोधनाच्या आधारे घटनेचा अन्वयार्थ लावून नवीन माहिती मिळविली जाते. त्याच पद्धतीने संघकार्याबद्दल जे संशोधन झाले, जे तत्त्व समोर आले, त्या आधारे संघाचे राष्ट्रबांधणीतील योगदान हे दुर्लक्षित करून चालणार नाही!

कीर्तिरूपांच्या आठवकथा

डॉ. रमा गोळवलकर

# राजा सुदर्शन



सोलंकी शैलीतली महिषासुरमर्दिनी दुर्गा : राणी की बाव, पाटण गुजराथ, इ. स. ११ वं शतक

भारताच्या वैभवशाली इतिहासात सूर्यवंशी इक्ष्वाकू वंशात जन्म घेऊन असामान्य कर्तृत्व गाजवलेले एकाहून एक राजे होऊन गेलेत. त्यातले सगळेच सत्यवचनी म्हणजे नेहमी खरं बोलणारे, ज्याचं बोलणं कधीही खोटं ठरलं नाही किंवा जे आपल्या शब्दाला (वचनाला जागले, जे बोलले ते सत्यात उतरवणारे, बोलल्याप्रमाणेच वागणारे होते. सगळेच पराक्रमी आणि प्रजाहितदक्ष होते; पण त्यांच्यातला एक राजा देवीचा निस्सीम भक्त होता. भारतीय भक्तिपरंपरेत महादेव शिवशंकरांची उपासना करणारे शैव, भगवान विष्णूंची आराधना करणारे वैष्णव, सूर्याची उपासना करणारे सौर, शक्तीची साधना करणारे शाक्त आणि गणपतीला आराध्य मानणारे गाणपत्य असे मूळ पाच संप्रदाय उद्ध त्यात शाक्तसाधक म्हणून देवी भागवतात ज्या इक्ष्वाकूवंशीय राजाच्या देवी भक्तीचं वर्णन आवर्जून करण्यात आलं आहे असा राजा सुदर्शन!

देवी भागवताच्या अध्यायांना स्कंध म्हणतात आणि त्यातल्या तिसऱ्या स्कंधात या सुदर्शनची कथा येते. अयोध्या नगरी ज्याची राजधानी आहे अशा कोसल प्रांतावर राज्य करणारा इक्ष्वाकू वंशाचा राजा ध्रुवसंधीला दोन राण्या होत्या. मोठी राणी मनोरमा, धाकटी राणी लीलावती. दोघींनाही एक एक पुत्र होता. महाराणी मनोरमांचा पुत्र सुदर्शन आणि राणी लीलावतीचा शत्रुजित. दोन्ही राजपुत्रांच्या वयात फारसं अंतर नव्हतं. राजपुत्र सुदर्शन काही दिवस किंवा महिन्यांनी शत्रुजितपेक्षा मोठा होता.

साहजिकच परंपरेनुसार राजपुत्र सुदर्शन त्याच्या ज्येष्ठतेमुळे राज्याचा उत्तराधिकारी होता. दोन्हीही पुत्र रांगते असतानाच राजा ध्रुवसंधी शिकारीसाठी वनात गेले असताना सिंहाच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडले. त्यानंतर अयोध्येच्या गादीसाठी संघर्ष सुरू झाला. दुसरी राणी लीलावतीही उज्जैनी नगरीचा राजा युधाजिताची मुलगी होती. त्यामुळे ती विधवा होताच तिचा मुलगा अयोध्येचा राजगादीवर बसावा म्हणून राजा युधाजितानं अयोध्येवर आक्रमण केलं. नातवाला गादीवर बसवण्यासाठी बाल सुदर्शनला ठार मारण्याचा कटही रचला.

शैशवावस्थेत असलेल्या सुदर्शनला पदराखाली घेऊन पट्टराणी मनोरमेनं एका विश्वासू प्रधानपुत्र 'विदुल' च्या मदतीनं कसंबसं पलायन केलं. कोसल प्रांताच्या सीमा ओलांडून रानावनातून वाट काढत ती प्रयागराजमध्ये येऊन पोहोचली. तिथे तिनं भरद्वाज ऋषींच्या आश्रमात आश्रय घेतला. महर्षींच्या छत्रछायेत सुदर्शननं तोल सांभाळत दोन पायांवर उभं राहायला सुरुवात केली. त्याच्या बोबड्या बोलांत आणि दुडूदुडू चालण्यात तो आश्रम गुंगून गेला.

एक दिवस आश्रमातला एक ऋषिकुमार बाळ सुदर्शनला कडेवर घेऊन खेळवता खेळवता आश्रमातल्या कामावर निगराणी करीत होता. इतक्यात त्याला गोशाळेतला एक सेवक कामचुकारपणा करताना दिसला. त्याला व्यवस्थित काम करण्याविषयी सांगूनही त्याच्या कामात काहीही सुधारणा नाही, असं बघून तो ऋषिकुमार रागावला. त्यानं त्या सेवकाच्या नाकर्तेपणाला 'क्लीब' संबोधलं. संस्कृतभाषेत क्लीब म्हणजे नपुंसक ! बाल सुदर्शनच्या कानावर क्लीब हा शब्द गेला, त्यानं तो ऐकला आणि खेळता खेळता तो त्या शब्दाचा उच्चार करू लागला.

नुकताच बोलायला लागला असल्यामुळे त्याला त्या शब्दाचा पूर्ण आणि व्यवस्थित उच्चार करता येत नव्हता. जे कानावर पडलं, जे ऐकू आलं आणि जे त्याच्या बालसुलभ उच्चारांना उच्चारता आलं, तो अजाणताच म्हणत होता. तो उच्च्चार होता 'क्लीं'. अबोध वयात, नकळतपणे त्याच्या मुखातून भगवती महामाया जगदंबेचा सर्वोत्तम आणि अतिशय प्रभावी असा कामबीज मंत्र 'क्लीम्' बाहेर पडत होता. आश्चर्य म्हणजे त्याच्या उच्चारांत खंड पडला नाही. झोपेत असतानादेखील त्याच्या मुखातून तो बीजमंत्र बाहेर पडत राही. जणू त्याच्याकडून देवी भगवती आपणहून स्वतःची उपासना करवून घेत होती. राजकुमार सुदर्शनला त्या बीजाक्षर मंत्राचं जणू वेडच लागलं होतं. त्याचा तो ध्यास साधनेत कधी परिवर्तित झाला कळलंच नाही. शाक्त संप्रदायाचा निस्सीम अनुयायी म्हणून सुदर्शनची साधना अतुलनीय होती. त्याची परिणती म्हणजे अखंड मंत्र जपाने प्रसन्न होऊन भगवती जगदंबेनं त्याला प्रत्यक्ष दर्शन दिलं आणि त्याला दैवी धनुष्य, बाण व अभेद्य कवच प्रदान केलं.

तरुण, सुदृढ, सुस्वरूप आणि चारित्र्यसंपन्न सुदर्शनची कीर्ती सर्वदूर पसरली. तशीच ती काशीराज सुबाहूची राजकन्या शशिकलेच्याही कानी गेली. ही देखील लावण्यवती, सुविद्य आणि सुसंस्कृत उपवर कन्या होती. सुदर्शनच्या देवीभक्तीविषयी ऐकून तिच्या मनात त्याच्याविषयी अनुराग निर्माण झाला. तिनं मनोमन त्याला आपला पती मानलं. त्याच रात्री आदिमाया जगदंबेने शशिकलेला स्वप्नात दृष्टांत दिला आणि सांगितलेः हे सुश्रोणि (सुंदर कटिप्रदेश/नितंब असलेली स्त्री) ! माझा परम भक् असलेल्या सुदर्शनचाच तू पती म्हणून स्वीकार कर, मी तुझ्या सर्व इच्छा पूर्ण करीन. या स्वप्नानंतर तर शशिकलेचा निश्चय आणखी दृढ झाला. तरीही राजा सुबाहूनं तिचं स्वयंवर आयोजलं. त्यात देशविदेशातून अनेक पराक्रमी, श्रीमंत आणि उन्मत्त राजा-महाराजांचं आगमन झालं. यात सुदर्शनचा सावत्र भाऊ शत्रुजित आणि त्याचे आजोबा युधाजित दोघेही मोठ्या सैन्यासह काशी नगरीत उपस्थित झाले. पण शशिकलानं तिच्या विश्वासू दासाकरवी सुदर्शनला संदेश धाडला. त्यालाच आपला पती मानलं असून अन्य कोणाशीही तिला विवाह करायचा नाही, हे स्पष्ट सांगून देवीचा दृष्टांतही सांगितला. तुम्ही येऊन मला घेऊन जावं, अशी विनंतीही केली. तिच्या आवाहनाचा सन्मान करत सुदर्शन एकटाच आपल्या दिव्य अस्त्र-शस्त्रांसह काशी नगरीत पोहोचला. तिथे जमलेले इतर राजेलोक त्याची यथेच्छ चेष्टा, अपमान करू लागले. शत्रुजितानं तर त्याला शिरच्छेद करण्याचीच धमकी दिली.

स्वयंवराच्या दिवशी मंडपात येण्यास नकार देत शशिकलेनं सुदर्शनला आपला पती म्हणून घोषित केलं. उरलेल्या सगळ्या प्रतिस्पर्ध्यांनी काशीराजावर आक्रमण केलं. त्यावेळी आकाशात प्रचंड गर्जना झाली; त्याचे पडसाद सर्वत्र उमटले. एका प्रचंड तेजाच्या मागून साक्षात भगवती जगदंबा प्रकटली. युद्धाच्या आवेशानं तिची उग्र मुद्रा अतिशय भीषण होती. तिच्या पराक्रमामुळे पराभूत झालेले सगळे शत्रू देवीसह सुदर्शनलादेखील शरण गेले. युद्धाचा आवेश उतरल्यानंतर देवीनं सर्वांना सुदर्शनचा अयोध्येचा राजा म्हणून राज्याभिषेक करण्याची आज्ञा केली. देवीवर असलेल्या निष्ठेमुळे चक्रवर्ती सम्राटपदी विराजमान झालेल्या राजा सुदर्शननं सर्वप्रथम संपूर्ण अयोध्येत 'शारदीय नवरात्र' उत्सवाची रुजवात केली. त्यानंतर त्याचा प्रसार भारतीय उपमहाखंडात झाला. ज्या देवीभक्त सुदर्शन राजामुळे नवरात्र उत्सव सुरू झाला त्याची ही आठवकथा.

---

लीळाचरित्र' आणि 'गोविंदप्रभूचरित्र' या प्राचीन चरित्र ग्रंथांत लोकभाषेतील शब्दांचा खजिना आहे. या ग्रंथातला दिठी मिनणे' हा अर्थसघन वाक्प्रचार आता लुप्त आहे. 'दिठी दिठी मिनणे' म्हणजे दृष्टादृष्ट होणे. संत ज्ञानेश्वरांनी 'दिठी' या बोलीतील शब्दाचे सुरेख उपयोजन नाहे. दिठी म्हणजे नजर किंवा दृष्टिक्षेप असा एक अर्थ

तिये दिठी आहे। हळुवार जें।। नाना कमळदळें। डोलविजती ढाळें। तो जेणें पाडें बुबुळें। वारा घेप ।।

बोली आणि संस्कृती

प्रा. अजय देशपांडे

# तमाच्या तळाशी दिवे लागले...



कमळाच्या पाकळ्या डोळ्याजवळ हळूहळू हलवल्या अत्यंत हळुवार सुखद आणि सौम्यता, कोमलता हवा डोळ्याच्या बुबुळाला लागेल तितके हळुवारपण, पण आणि सौम्यता त्याच्या नजरेत आहे तो कडेही क्रूर किंवा वाईट नजरेने पाहत नाही. एका संत ज्ञानेश्वरांनी स्मरण केले असता डोळ्यांसमोर रूप कसे दिसते ते सांगितले आहे.

तया गुरूचे रूप आठवे। तंव दिठीपुढें सुख पालवे।
जैसा चंद्रमा उगवे। आणि आल्हाद होय।।

जेव्हा गुरूंची आठवण होते, तेव्हा डोळ्यांसमोर (दिठीपुढे) आनंदाला नवे धुमारे फुटतात. ज्याप्रमाणे आकाशात चंद्र उगवताच चकोराला आणि जगाला शब्दातीत आनंद होतो, तशीच अवस्था गुरूंच्या स्मरणाने डोळ्यांची होते. संत ज्ञानेश्वरांनी तम हा संस्कृत शब्द काही ठिकाणी वेगवेगळ्या संदर्भात उपयोजिला आहे

दीपे तम जैसा। पाहावया गेला तैसा।
विचारी हा तंव भंसा । कांहींच नाही।।

हातात दिवा घेऊन कोणी अंधार (तम) पाहायला गेला तर तो अंधार तिथे शिल्लकच राहत नाही, दिवा अंधाराचे अस्तित्वच नष्ट करतो. सत्याचा विचार अज्ञान पूर्णपणे नाहीसा करीत असते. तमाच्या तळाशी दिवे लागणे म्हणजे नवीन काही दृष्टिपथात येण्याची अवस्था होय. मनातील तम नाहीसे होऊन नवे शब्द स्फुरण्याची अवस्था होय. कवी शंकर रामाणी यांची 'दिवे लागले रे..' ही कविता शब्दातीत काव्यनिर्मितिप्रक्रियेचे वर्णन करणारी आहे. कविता मनात प्रकटणे हा खरे तर उजेडाचाच सोहळा असतो. कविता मनात अंकुरण्याचा क्षण विलक्षण असतो, तो शब्दांच्या चिमटीत पकडणे कठीण आहे. यासंदर्भात कवी शंकर रामाणी यांची 'दिवे लागले रे' ही कविता अर्थसघन आहे.

दिवे लागले रे, दिवे लागले रे,
तमाच्या तळाशी दिवे लागले,
दिठींच्या दिशा खोल तेजाळताना
कुणी जाग रे? कुणी जागलें?
रित्या ओंजळी दाटली पुष्पवृष्टी
असे झाड पैलाड पान्हावले;
तिथे मोकळा मी मला हूंगितांना
उरी गंध कल्लोळुनी फाकले....
उभ्या रोमरोमांतुनी चैत्रवाटा
कुणी देहयात्रेत या गुंतलें?
आरक्त त्याच्या कृपेच्या कडा
अन् उषः सूक्त ओठांत ओथंबले...

शंकर रामाणी यांची ही कविता 'पालाण' या कवितासंग्रहातली आहे. मनाच्या तळाशी कविता अंकुरण्याचा क्षण तमाच्या तळाशी दिवे उजळण्याच्या क्षणासारखा असतो, हा अनुभव 'गगन सदन तेजोमय' असतो.

प्रारंभीच्या दोन ओळीत कविता गवसण्याचा अनुभव आहे. पहिल्या ओळीत असणारी लय आशयाला आणि अंतर्यामी आनंदाला वेढणारी आहे. ही लय कवितेच्या अंगभर आहे. गर्भातल्या काळोखातही अंकुरणाऱ्या जिवास दृष्टी लाभते, तो क्षण जसा शब्दांत सांगता येत नाही, तसाच हा निर्मितीचा क्षण आहे. सारा अंधारच प्यावा अशी तहान लागण्याचा हा क्षण आहे. पुढच्या ओळीत 'दिठी' हा शब्द आहे, 'दिठी' या शब्दाचा अर्थ 'दृष्टी' असा होतो आणि 'दिठा' या शब्दाचा अर्थ 'द्रष्टा', 'आत्मा' असा होतो. 'दिठींच्या दिशा खोल तेजाळताना' अशी ओळ आहे. जो द्रष्टा आहे, त्याच्या दृष्टीच्या सर्व दिशा तेजाळताना म्हणजे जगाला जे अदृष्ट आहे ते द्रष्ट्या मनाला गवसतानाचा अनुभव येथे सांगितला आहे. ही अवस्था कवितेशी 'दिठी दिठी मिनण्या'ची आहे. 'कुणी जागले रे? कुणी जागले?' या प्रश्नांची उत्तरे नकारार्थीच आहे. कारण जगाला जे अदृष्ट असते ते द्रष्ट्या मनाला गवसते, ते कुणाला दिसणार? कविता कागदावर उतरेल तेव्हाच ते दिसेल. पहिला अनुभव कवितेचे बीज गवसण्याचा आहे, तर दुसरा अनुभव कवितेचे बीज अंकुरण्याचा आहे. 'रित्या ओंजळी दाटली पुष्पवृष्टी असे झाड पैलाड पान्हावले' या ओळीतला अनुभव विलक्षण देखणा आहे. पैलाड आणि पान्हावणे हे दोन्ही शब्द बोलीतील आहेत. 'पैलाड' म्हणजे जाणिवेच्या पलीकडे नेणिवेत, अव्यक्त मनात कवितेचे बीज अंकुरते; पण हे अंकुरणे कसे आहे, तर झाड पान्हावण्यासारखे! गाय पान्हावली की वासराची भूक शमते, मन तृप्त होते. तिचे पान्हावणे वासराची भूक शमवूनही उरतेच उरते. झाडाचे पान्हावणे, रित्या ओंजळीत कितीही फुले भरली, ओंजळींनी फुले कितीही वाहून नेली, तरी उरतेच उरते. 'तिथे मोकळा मी मला हूंगिताना उरी गंध कल्लोळुनी फाकले' या शब्दांत अव्यक्त मनात, नेणिवेत, प्रतिभाकोशात जेव्हा कवितेच्या अंकुरण्याचा अनुभव पान्हावणाऱ्या झाडासारखा फुलतो, तेथे व्यक्त मनातील भावना कशा असतात ते सांगितले आहे काय ? कविता व्यक्त करण्याचा अनुभवही विलक्षण आहे.

कवितेच्या जन्मापाशी कवी मोकळा असतो. कवितेच्या अनुभवाला तो नम्रपणे सामोरा जातो. कुठलाही अहंकार नसणारे, स्वार्थही नसणारे फक्त कवी असणारे, पुरुष आणि प्रकृती दोन्ही असणारे, पण दोहोंच्याही अहंता नसणारे असे मन कवितेच्या पान्हावणाऱ्या अनुभवाला सामोरे जाते, नव्हे त्या अनुभवात विरघळून जाते. येथे कविमन आणि कविता वेगवेगळे असत नाहीत. पूर्वेची प्रभा फाकावी, तसे अंतर्यामीचे सारे गंधकल्लोळ बाहेर यावे असा कविता स्फुरण्याचा अनुभव असतो.

संत ज्ञानेश्वरांनी प्रणवानुभव सांगितला आहे. हा अनुभव सरूप नाही कुरूपही नाही त्याला प्रतिबंध नाही तो दाखवता येत नाही, सांगता येत नाही; तो फक्त अनुभवता येतो. दिठी दिठी मिनणे अनुभवता येते, पण सांगता येत नाही. पुढच्या कडव्यातला अनुभव कविता तनामनातून फुलण्याचा आहे. अंतर्यामी कविता फुलण्याचा अनुभव कुणाच्याही वाट्याला सहजासहजी येत नाही.

निर्मितीचे गूढ प्रत्येकाचे वेगळे असते, हे गूढ ज्याचे त्यालाच उकलतही असते. कवितेचे मनात उलगडणेदेखील भव्य आणि लख्ख असते. गर्भातून बाहेर पडलेल्या जिवाला सारे भव्य आणि लख्ख दिसावे तसा शब्दातीत अनुभव कवितेचे शब्द कागदावर उतरवतानाचा असतो. 'उषः सूक्त ओठांत ओथंबण्याचा' अनुभव कविता फुलण्याचा असतो. हा फुलून येण्याचा, उजेडाचा सोहळा असतो. कविता मनात अंकुरणे, म्हणजे तमाच्या तळाशी दिवे लागणे आणि कविता अंगभर फुलून- पान्हावून ओठावर येणे म्हणजे उषःसूक्त ओठांत ओथंबणे होय. तमाच्या तळाशी दिवे लागले या ओळीतील सांस्कृतिक अर्थसंदर्भ कवितेच्या निर्मितीशीही जुळलेले आहेत.

---

# नात्यांचं महावस्त्र- भाग बारा : 'आई-मुलगी' (बिंब आणि प्रतिबिंब)

उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे

भ्र. ९४०३७४९९३२

'नात्यांचं महावस्त्र' विणताना आपण आतापर्यंत आई, बाबा, आजी, आजोबा, मामा, मावशी, आत्या, काका, बहीण- भाऊ आणि संसाराची चौकट भक्कम करणारे पती-पत्नी हे समृद्ध पदर अनुभवले. या महावस्त्रात एकाच रूपाचे दोन अंश असणारा, मायेचा अखंड पाझर वाहणारा आणि एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे वात्सल्याचा वारसा नेणारा सर्वात हळवा पदर म्हणजेच 'आई आणि मुलगी'! हे नातं म्हणजे निव्वळ हाडामांसाचं नातं नसतं, तर ते साक्षात 'बिंब आणि प्रतिबिंब' असतं.

लहानपणी अभ्यासात असणाऱ्या काही कविता आयुष्यभर मनात घर करून राहतात; कारण त्या कवितांमध्ये आपले संपूर्ण भावविश्व व्यापून टाकण्याची ताकद असते. कवी कृ. ब. निकुंब यांची 'घाल घाल पिंगा वाऱ्या' ही अशीच एक अजरामर कविता. या कवितेत सासरी गेलेली लेक वाऱ्याला साद घालत आपल्या आईची आठवण काढते. ती म्हणते-

**घाल घाल पिंगा वाऱ्या माझ्या परसात,**
**माहेरी जा सुवासाची कर बरसात...**

सासरी गेलेल्या आपल्या मुलीची आईला अखंड काळजी असते, म्हणून ती लेक वाऱ्याला विनवते-

**सुखी आहे पोर सांग आईच्या कानात,**
**आई, भाऊसाठी परी मन खंतावतं...**

पुढे या कवितेचे गाणे झाले आणि सुमन कल्याणपूर यांच्या अमृततुल्य स्वरांनी या शब्दांचे सोने झाले! सुमनताईंच्या गोड गळ्यातून सासरी गेलेल्या लेकीच्या भावना जणू मूर्तिमंत प्रकट होतात. आजही ते गाणे ऐकले की डोळे पाणावल्याशिवाय राहत नाहीत. मी जरी पुरुष असलो, तरी ते गाणे ऐकताना ती लेक माझ्या मनात पाझरते आणि डोळ्यांतील अश्रूंच्या रूपाने बाहेर पडते. वसंतराव देशपांड्यांनी गायिलेले 'दाटून कंठ येतो' हे गाणेही असेच; अर्थात ती सासरी जाणाऱ्या लाडक्या लेकीसाठी वडिलांच्या हृदयात दाटलेली अथांग वेदना असते.

बहिणाबाई चौधरी यांच्या रचनेतील ओळींना तर सुभाषितांचे मोल लाभले आहे. एका कवितेत त्या सासरी गेलेल्या मुलीच्या भावना अत्यंत साध्या, पण काळजाला भिडणाऱ्या शब्दांत मांडतात. एक साधू भिक्षा मागत येतो, तेव्हा सासरी शेतात राबणारी लेक त्या साधूजवळ माहेरचे गोडवे गाते आणि सासरचे दुःख सांगताना तिचे डोळे भरून येतात. तेव्हा तो साधू विचारतो, एवढं तुझं आईवर आणि माहेरवर प्रेम आहे, तर तू माहेरी परत का जात नाहीस? यावर ती लेक अत्यंत मार्मिक उत्तर देते-

**ऐक ऐक साधुबोवा, काय मी सांगते,**
**लेकीच्या माहेरासाठी, माय सासरी नांदते!**

जीव ओवाळून टाकावा अशा या ओळी आहेत. आईची आणि माहेरची महती यापेक्षा अधिक समर्पक शब्दांत कोण सांगू शकेल?

बहिणाबाईंच्या या विचारात मलाही काही ओळींची भर घालावीशी वाटते. अशी कल्पना करू की तो साधू त्या लेकीला विचारतो-अगं, मग तू स्वतः तरी इथे सासरी का नांदते आहेस? तेव्हा ती लेक नक्कीच अभिमानाने सांगेल-

**ऐक ऐक साधुबोवा,**
**काय मी सांगते,**
**माहेरच्या नावासाठी,**
**लेक सासरी नांदते!**
**लेक दुवा दोन्ही घरचा,**
**सासर-माहेर सांधते...**

माय आणि लेकीचं नातंच मुळी अनोखं, बहुरंगी आणि अनेक पदर असलेलं असतं. आई 'बिंब' तर लेक तिचं चालतं-बोलतं 'प्रतिबिंब'! खरं तर आईचं तिच्या सगळ्याच लेकरांवर जिवापाड प्रेम असतं. लेकरं आजारी पडली की आईचा जीव व्याकुळ होतो; त्यांची सेवा करताना ती स्वतःची तहान- भूक विसरून जाते. पण जेव्हा घरात आई आजारी पडते, तेव्हा लेकीचा जीव आईसाठी सर्वात जास्त तुटतो! मायलेकींची ओढच न्यारी. त्यांची माया आणि काळजी अवघे विश्व व्यापून उरते. प्रसंग पडला तर आजारी आईसाठी ही लाडकी लेक आपल्या नवऱ्याला किंवा आईकडे दुर्लक्ष करणाऱ्या आपल्या भावालाही चार खडे शब्द सुनावण्याचा अधिकार गाजवते; कारण ती दोन्ही घरांना जोडणारा भक्कम सांधा असते.



आज काळ बदलला आहे; मुलगा आणि मुलगी आपण समान मानतो आहोत. पण जुन्या काळात मुलगी झाली की घरामध्ये बऱ्याचदा नाराजी व्यक्त व्हायची. पण आई...? आईला मात्र तिची मुलगी काळजाचा तुकडा वाटायची. एका जुन्या ओवीत आई आपल्या मुलीचे कौतुक करताना म्हणते-

**लेका गं परीस, लेक कशियाने उणी,**
**गुणांची लेकीबाई, हिरा नव्ह, हिरकणी!**

तर दुसऱ्या एका लोकगीतात आईचे थोरपण सांगताना लेक कृतज्ञतेने म्हणते-

**गणगोतांमधी सये, माझी माऊली अधिक,**
**माझी मायबाई, शुद्ध गंगेचं उदक!**

कित्येक डॉक्टरेट (Ph.D.) या ओळींवरून ओवाळून टाकाव्यात, इतका मोठा भावनिक ठेवा या लोकगीतांतून ग्रामीण माऊलींनी आपल्याला दिला आहे. सगळ्या नात्यांपेक्षा आई अधिक श्रेष्ठ आणि कशी, तर साक्षात 'गंगेच्या निर्मळ उदकासारखी'!

अशी ही गंगेसारखी निर्मळ आई आपल्या जगण्याचा संपूर्ण वारसा मुलीला सोपवत असते. तिच्यात ती आपले प्रतिबिंब पाहते. संसारात स्वतः जे कष्ट आणि हालअपेष्टा भोगल्या, त्या आपल्या लेकीच्या वाट्याला येऊ नयेत म्हणून ती जीवाचा रान करते. आपल्या आयुष्यातील शहाणपण, समजूतदारपणा, क्षमाशीलता आणि संस्कार ती लेकीच्या पदरात भरभरून घालते. तिच्या मनात एकच प्रार्थना असते- माझी लेक सासरी सुखात राहावी, तिने दोन्ही कुळांचा उद्धार करावा आणि नाव उज्ज्वल करावे.

आई ही कुठेही असो; ती माणूस असो वा पशुपक्षी. ती भारतातली असो वा साता समुद्रापलीकडची! पु. ल. देशपांडे यांच्या 'अपूर्वाई' या प्रवासवर्णनात ते इंग्लंडमधील एका आईचे उदाहरण देतात. तिची मुलगी एअर होस्टेस असते; पण तरीही त्या आईला तिच्या लग्नाची आणि भवितव्याची सतत काळजी लागून राहिलेली असते. त्यावर पुलं मिश्कीलपणे पण तितक्याच भावूकतेने म्हणतात-

पुण्यातली शांताबाई असो की लंडनमधली जेन... आई ती आईच!

सासरी गेलेल्या मुलीचे जगातील सर्वात हळवे ठिकाण म्हणजे तिची आई! सासरी काही खुट्ट झाले, तरी ओठांवर सहज शब्द येतो-'आई गं!' खरं तर आता ती स्वतःही एका मुलाची आई झालेली असते; पण आपल्या आईसाठी तिचे मन कायम लहान मूल होऊन माहेरच्या वाटेने धाव घेत असते.

अक्षयतृतीयेला ग्रामीण भागात 'आखाजी' म्हणतात. आखाजी आणि दिवाळी या सणांना लेकीला माहेरची अनिवार ओढ लागते. 'साधी माणसं' या चित्रपटातील अजरामर गीतात म्हटल्या प्रमाणे-धावत माहेरच्या वाटेनं मन जातं... ही तीच अनावर ओढ असते.

आई आणि लेक या एकमेकींच्या सर्वात चांगल्या मैत्रिणी असतात. आईने लेकीजवळ मन हलके करावे आणि माहेरी आलेल्या लेकीने साऱ्या सुख-दुःखाचा पाढा आईच्या मांडीवर डोके ठेवून वाचावा; इतकी पारदर्शकता जगात इतर कुठल्याच नात्यात नसते. हे नाते रेशमासारखे मुलायम असले, तरी त्याची वीण अभेद्य असते. माहेरावरून सासरी परत जाताना लेक खूप काही सोबत घेऊन जाते; ती समृद्ध आठवणी, मायेची शिदोरी आणि तृप्ती घेऊन जाते. तिच्या चेहऱ्यावर ते समाधान इतके विलक्षण उमटते, की तिला जणू 'मूठभर मांस' चढते! पण सतत सावलीत वाढणारे झाड कधीच उन्हापावसाच्या झळा सोसू शकत नाही; म्हणूनच ज्या मायलेकी या नात्यातील मर्यादा आणि ताकद ओळखतात, त्या संसारातल्या प्रत्येक वादळाला खंबीरपणे सामोरे जातात.

आज या नात्याचा परिघ अधिक विस्तारण्याची गरज आहे. आईच्या मायेला पारख्या झालेल्या अनाथ लेकीला समाजाने आईचे प्रेम दिले पाहिजे, सासूने सुनेमध्ये आपली मुलगी पाहिली पाहिजे आणि सुनेनेही सासूच्या रूपात आईची सावली शोधली पाहिजे. नात्यांच्या या भरजरी 'महावस्त्रा'चा हा 'आई-मुलगी' नावाचा पदर दोन घरांना पावित्र्याने जोडणारा, सासर-माहेर सांधणारा आणि वात्सल्याचा अखंड सुगंध देणारा पदर आहे. हा पदर जेवढ्या स्नेहाने जपला जाईल, तेवढे आपले कुटुंब आनंदी आणि सुसंस्कृत राहील!

# ग्रहसंकेत

**(रविवार, १८ आक्टोबर ते शनिवार, २४ आक्टोबर २०२६)**

नारायण जगन्नाथ कारंजकर,ज्योतिष भास्कर, ज्येष्ठ पत्रकार
'शिवकृपा' फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो. कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र.९४२३७५८४०१)

✲ **रविवार, १८ आक्टोबर-** ज्योतिर्लिंग जागर कोल्हापूर, महालक्ष्मी पूजन (घागरी फुंकणे), भानुसप्तमी, सरस्वती बलिदान, आयबिल ओळी प्रारंभ (जैन) ✲ **सोमवार, १९आक्टोबर-** दुर्गाष्टमी, महालक्ष्मी जागर कोल्हापूर, महाष्टमी व महानवमी उपवास, आयुध पूजन, एकरात्रोत्सवारंभ, घोडेकर यात्रा कुरकली ✲ **मंगळवार, २० आक्टोबर-** खंडेमहानवमी, विजयादशमी, दसरा, विजय मुहूर्त दु.२.१९ ते ३.०५ नवरात्रोत्थापन, सीमोल्लंघन शमीपूजन, धम्मचक्र प्रवर्तन दिन, साईबाबा पु.ति. शिर्डी, महानवमी, अपराजिता, अश्वपूजा ✲ **बुधवार, २१ आक्टोबर-** श्री मध्वाचार्य जयंती, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी ✲ **गुरुवार, २२ आक्टोबर-** पाशांकुशा, एकादशी, भवानीदेवी निद्राकाल प्रारंभ तुळजापूर, श्री म्हंकाळेश्वर (दरगोबा देव) ✲ **शुक्रवार, २३ आक्टोबर-** प्रदोष, संत बाळूमामा जन्मोत्सव आदमापूर क्षीरदान, द्विदल व्रत, भारतीय कार्तिक मासारंभ, सौर हेमंत ऋतू प्रारंभ, वृक्षिकायन, संत बाळूमामा जन्मोत्सव आदमापुर, श्री देव वेताळ स्वामी आगमन प्रियोळ ✲ **शनिवार, २४ आक्टोबर-** स्वात्यर्कः दु. १२.५०, वाहन-बेडूक.

**मुहूर्त :-** ✲ **साखरपुडा-** १९, २०, २१, २४ ऑक्टोबर ✲ **डोहाळ जेवण -** १९(१६ नंतर ), २० (१८ पर्यंत) ऑक्टोबर ✲ **बारसे-** २०, २१ (१४ पर्यंत) ऑक्टोबर, २२ (१५ नंतर ), २४ (१४ पर्यंत) ऑक्टोबर ✲ **जावळ-** २१ ऑक्टोबर ✲ **गृहप्रवेश-** २१, २४, (१४ पर्यंत) ऑक्टोबर

### मेष :- समाधानकारक घटना

दरवाजा बंद दिसला म्हणून वाट संपली असं नसतं. दिशा बदलावी. सप्तमातील रवि, बुध, शुक्रामुळे श्रीशक्ती उत्सवात समाधानकारक घटना घडतील. प्राप्ती चांगली वाढल्याने दीपोत्सवाची तयारी चांगली करू शकाल. नव्या विचारांना चालना मिळेल. स्थावर सौख्य लाभेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. नव्या संधीचे स्वागत करावे. शुभ ता. २०, २३

### वृषभः- कार्यक्षेत्रात प्रगती

ध्येय एकदा निश्चित झालं की, मार्ग सापडतो. षष्ठातील रवि, बुध कार्यक्षेत्रात प्रगती करणारे आहेत. आर्थिक प्रगती चिकाटीने होईल. महत्त्वाचे निर्णय विचारणे घ्यावेत. स्पर्धांमध्ये यश मिळेल. अडचणींची तीव्रता कमी होईल. उष्णतेपासून जपून असावे. त्रास संभवतो. प्रतिकूलतेवर मात कराल. स्वमताग्रह टाळावा. दगदग टाळावी. शुभ ता. २०, २४

### मिथुनः- कलागुणांचा विकास

अपघात तर नशिबाचा खेळ असतो, पण विश्वासघात पंचमातील रवि, बुधामुळे आर्थिक बाबतीत विशेष अनुकूलता राहील. यांत्रिक क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. नव्या कामांना गती मिळेल. खर्च वाढले तरी प्राप्ती ही तशीच चांगली होईल. जुने येणे वसूल झाल्यामुळे समाधान वाटेल. मिळालेल्या संधीचे स्वागत करावे. कलागुणांचा विकास होईल. शुभ ता. २०, २१

### कर्कः- निश्चिंत रहावे

गरज असते, तोपर्यंत आपल्या कौतुकाचा सोहळा गावभर साजरा होतो. राशीतील गुरु, मंगळामुळे ठामपणे पावले उचलू शकाल. घरातील वातावरण सुखदायक राहील. नव्या ओळखी लाभदायक ठरतील. गुढ विद्येत प्रगती होईल. अनावश्यक खर्च टाळायला हवा. चिकाटीने रहावे. प्रगती होत जाईल. उत्साहवर्धक घटना घडतील. भाग्यवृधिंगत होईल. शुभ ता. २०, २४

### सिंहः- प्रकृतीकडे दुर्लक्ष नको

गरज संपली की, आपल्या निंदेची खिरापत घरोघरी वाटली जाते. राशीत केतू, शनि नेपच्यून त्यामुळे विचारपूर्वक व्यवहार करावेत. नव्या योजना हुशारीने मार्गी लावाव्यात. प्रकृतीच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करू नये. विकृत कार्यात समाधानकारक प्रगती होईल. नोकरीत वरिष्ठांचा रोख राहू देऊ नका. थोड्या प्रतिकूलतेशी झगडावे लागेल. शुभ ता.२०, २४

### कन्याः- आशादायी वातावरण

आपल्यातील चांगल्या गुणांवर सगळे गप्प असतात. धनस्थ रवि, बुधामुळे नोकरीत समाधानकारक घटना घडतील. लाभातील गुरु, मंगळामुळे आर्थिक स्थिती चांगली सुधारेल. नव्या विचारांना चालना देऊ शकाल. गायन वादनादि कलेचा गौरव होईल. नव्या ओळखी लाभप्रत ठरतील. बिनधास्थ राहून वाटचाल करावी. आशादायी वातावरण निर्माण होईल. शुभ ता. २०, २३

### तुलाः- सुसंधीचा लाभ उठवावा

दुर्गुणावर चर्चा सुरू झाली की, मुकेही बोलू लागतात. राशीतील रवि, बुधामुळे अंगीकृत कार्यात समाधानकारक घटना घडतील. नवे विचार साकार करता येतील. नवीन गुंतवणूक करण्यास अनुकूल कालावधी आहे. सुसंधीचा लाभ उठवावा. प्रगतीच्या घटना घडतील. कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. अडचणींवर मात कराल. शुभ ता. २०, २१

### वृश्चिकः- नव्या कामांना गती

ज्ञान हेच खरे वैभव, शक्ती हीच खरी संपत्ती असते. भाग्यस्थ गुरु, मंगळामुळे अनुकूलता वाढेल. सरकारी कामे विचारपूर्वक करावीत. अडचणीतून मार्ग निघत जाईल. नव्या संधीचे स्वागत करावे. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. नव्या कामांना गती मिळेल. चिकाटीने रहावे. अपेक्षित संधी लाभतील. अनावश्यक खर्च टाळायलाच हवा. शुभ ता. २०, २४

### धनुः- नव्या कामांना गती

जग फिरायला छान, पण आधार मात्र आपल्या माणसांमध्येच मिळतो. ग्रहमान थोडे अनुकूल, थोडे प्रतिकूल आहे. त्यामुळे विचाराने रहावे. लाभातील रवि, बुधामुळे समस्या सुटत जातील. फार चिंता करू नका. नव्या कामांना गती मिळेल. सुसंधी विचाराने स्वीकाराव्यात. अडचणींवर मात करावी लागेल. अनावश्यक जबाबदाऱ्या स्वीकारू नका. शुभ ता. २०, २३

### मकरः- मार्ग निघत जाईल

देवाकडे सुख मागण्यापेक्षा, दुःख सहन करण्याची ताकद मागावी. कर्मस्थ रवि, बुधामुळे कार्यक्षेत्रात मनासारख्या घटना घडतील. शुक्रामुळे खाद्यपदार्थ, वस्त्र प्रावरणे अशा व्यवसायात चांगली प्रगती होईल. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. आत्म विश्वासाने वाटचाल करावी. मार्ग निघत जाईल. गुढ विद्येत प्रगती होईल. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. २०, २४

### कुंभः- चिंता करू नका

टेन्शन नाही, जगण्याचे सुख नक्की कमी होते. चौथ्या हर्षलमुळे कोणत्याही व्यक्तीबाबत त्यांना समस्या वाढवू नका. येणाऱ्या आव्हानांना धैर्याने सामोरे जावे. नव्या योजना विचारपूर्वक स्वीकाराव्यात. यांत्रिक क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. कार्यक्षेत्रात फार दगद करू नका. चिंता करू नका. शुभ ता. २०, २३

### मीनः- मार्ग निघेल

मनापासून बोललेले शब्द साधे असले तरी पुरेशे असतात. रवि, बुध, शुक्र अष्टमात असल्याने लगेच सर्वकाही मनासारखे घडत जाईल अशी शक्यता नाही. लगेच सर्वांसाठी अधिक गुंतवणूक करावी लागेल. नव्या योजना विचारपूर्वक राबवाव्यात. अपेक्षित कामासाठी अधिक पाठपुरावा करावा लागेल. दैवीकृपा जतन करावी. मार्ग निघेल. शुभ ता. २०, २१, २३

!! नवरात्रीच्या शुभेच्छा !!शुभ भवतु !!

---

**'पातंजल योगदर्शना'तील तिसऱ्या म्हणजे 'विभूतिपादा'त धारणा, ध्यान आणि समाधी यांचे लक्षण सांगितले आहे. धारणेचे लक्षण पहिल्या सूत्रात सांगितले आहे. 'देशबन्धश्चित्तस्य धारणा'**

तत्त्वदर्शन

डॉ. राजेंद्र डोळके

# न्यायदर्शन



वेदांतून निघालेल्या विद्यांचे प्रथमतःच दोन भाग झाले. एक आत्मविद्या व दुसरी आन्वीक्षिकी. तत्त्वज्ञान या शब्दाचा मूळ प्राचीन पर्याय 'आन्वीक्षिकी' हा आहे. आन्वीक्षण अथवा अन्वेषण म्हणजे शोध घेणे. आत्मविद्येला अलौकिक विषयांची विद्या व आन्वीक्षिकीला लौकिक विषयांची विद्या असे स्वरूप आले. पुढे जाऊन आन्वीक्षिकीलाही आत्मविद्येचा दर्जा प्राप्त झाला. याचे कारण असे की, आत्मबोध हा जो आत्मविद्येचा प्रमुख विषय असतो त्या विद्येतील सिद्धांत तर्कदृष्ट्या कसे बरोबर आहेत हे 'आन्वीक्षिका' सांगत असते. म्हणजे आन्वीक्षिकित प्रामाण्यशास्त्राचा समावेश होतो. पुढे जाऊन या शास्त्रालाच न्यायशास्त्राचे स्वरूप आले.

'न्याय' या शब्दाचा अर्थ सर्वांनाच ठाऊक आहे. सत्यासत्याची कसोटी दाखवून सत्याच्या बाजूने निर्णय देणे यालाच 'न्याय' म्हणतात. न्यायाधीश, न्यायालय या शब्दांमध्ये तोच अर्थ असतो. न्याय ज्या विषयाचा करावयाचा असतो त्यात त्या विषयाची योग्य मीमांसा म्हणजेच निर्दोष विचार, चर्चा व अनुमाने असतात. न्यायालयात पक्ष व प्रतिपक्ष यांच्या मांडणीतील दोषांना व हेत्वाभासांना हुडकून काढून सत्य निर्णय करावयाचा असतो. हे सत्य हुडकण्याकरिता त्याला प्रत्यक्ष व अनुमान या दोन पुराव्यांचा प्रामुख्याने आधार घ्यावयाचा असतो. जेथे 'प्रत्यक्ष' पुरावा उपलब्ध असतो तेथे दुसऱ्या कोणत्याच पुराव्याची आवश्यकता नसते. कारण प्रत्यक्षाइतका खात्रीलायक पुरावा दुसरा कोणताच नसतो. परंतु 'प्रत्यक्ष' प्रत्येक वेळी उपलब्ध असतेच असे नाही. अशावेळी अनुमानजन्य इतर पुरावे लक्षात घ्यावे लागतात. असे पुरावे लक्षात घेताना 'तर्का'चा आश्रय घ्यावा लागतो. म्हणून 'न्याय' शब्दाला 'तर्क' असेही म्हटले गेले.

न्याय शब्दाची व्युत्पत्ती 'नियते अनेन इति न्यायः' अशी सांगितली जाते. म्हणजे ज्या योगाने मानवी मन एखाद्या अनुमानाकडे नेले जाते तो न्याय. या व्युत्पत्तीवरून न्याय शब्दाचा अर्थ तर्क स्पष्ट दिसतो. 'तर्का'ला 'न्याया'त एवढे महत्त्व असल्यामुळे न्यायशास्त्राला 'तर्कशास्त्र' असेही म्हटले गेले. परंतु न्यायशास्त्र हे संपूर्ण तर्कशास्त्र नसते तर न्यायशास्त्राचा महत्त्वाचा भाग तर्क म्हणजे तर्कशास्त्र असतो. 'तर्का'चा संबंध केवळ न्यायशास्त्राशीच असतो असे नव्हे, तर सर्वच ' दर्शनां' शी आहे. कारण ब्रह्म, आत्मा, मोक्ष इत्यादी अदृश्य विषय 'तर्का'वरच आधारित आहेत.

केवळ दर्शनेच नव्हे तर संपूर्ण शास्त्रे आणि मानवी जीवन यात तर्काचे महत्त्व फार असते. कारण 'तर्का'च्याच आधारे मानव सृष्टीतील तत्त्वांचे आणि घटनांचे ज्ञान करून घेत असतो. 'तर्का'चे हे महत्त्व बौद्ध धर्मीयांनी ओळखले होते. म्हणून या विषयांवर त्यांनी अतिशय उच्च दर्जाची ग्रंथ निर्मिती केली आहे.

अर्वाचीनकाळी 'तर्कशास्त्र' हा शब्दप्रयोग भारतीय न्यायशास्त्राला सर्रास वापरला जाऊ लागला. परंतु या शब्दाने लोकांसमोर प्राचीन 'न्यायशास्त्र' समोर न येता पाश्चात्यांचे 'लॉजिक' समोर येऊ लागले आणि तर्क म्हणजेच पाश्चात्यांचे 'लॉजिक' हा समज अभ्यासकांत दृढ झाला. परंतु हे सत्य नाही. कारण ग्रीसमध्ये तर्कशास्त्राची अथवा 'लॉजिक'ची व्यवस्थित मांडणी केली ती प्रथम रिस्टॉटलने, म्हणजे २२००-२३०० वर्षांपूर्वी. आपल्याकडे या शास्त्राचा उगम महाभारत काळापूर्वीही झाला होता, असे भारताचार्य वैद्य म्हणतात. (महाभारताचा उपसंहार, पृ. ६४७)

मेधातिथी गौतम आणि अक्षपाद गौतम असे न्यायशास्त्रकारांचे दोन प्रकारचे निर्देश आढळतात. हल्ली उपलब्ध असलेले न्यायशास्त्र अक्षपाद गौतमाचे असून त्याचाच अभ्यास होत असतो. याला गोतम आणि गौतम असे दोन्ही शब्द लावतात.

दीर्घतपस् असे आणखी त्याला नाव आहे. हा गौतम रहूगणाचा पुत्र व कुरुसंजय राजांचा पुरोहित होता. गौतम हे कुलनाम (गोत्र) असावे. हे कुल वैदिकब्राह्मण व क्षत्रिय या दोघांमध्येही सापडते. न्यायदर्शनाकार गौतम हा ब्राह्मण होता. याचे अक्षपाद नाव पडण्याचे कारण, दंतकथा असे सांगते की, तो डोळे मिटून ध्यान व मनन करीत चालला असता विहिरीत पडला. तिथून त्याला मोठ्या कष्टाने बाहेर काढण्यात आले. त्याच्यावर पुन्हा आपत्ती येऊ नये म्हणून ईश्वराने त्याच्या पायाला डोळे दिले. गौतमाचे मूळचे गाव मिथिला प्रांतात दभंगा गावाजवळ २८ मैलांवर आहे. त्याला गौतमस्थान हे नाव आहे.

'न्यायसूत्रां' चा काळ निश्चित सांगता येत नाही. इ. स. पू. तिसर्या शतकापासून तो इ.स. १५० पर्यंत निरनिराळे विद्वान निरनिराळे काळ सांगतात. या ग्रंथावर अनेक टीकाग्रंथ अथवा भाष्यग्रंथ निर्माण झाले आहेत. वात्स्यायनाने 'न्यायभाष्य' नामक टीकाग्रंथ सुमारे चौथ्या शतकात लिहिला. मधल्या काळात काही बौद्ध व जैन ग्रंथकारांनी 'न्यायदर्शन' वर आक्षेप घेतले. त्या आक्षेपांचे खंडन करण्याकरिता उद्योतकर यांनी आपले 'वार्तिक' (न्यायवार्तिक) इ.स. ६३५ च्या आसपास रचले. परंतु ही टीका तत्कालीन पंडितमंडळींना समजण्यास कठीण व गूढ वाटली होती. म्हणून उद्योतकरानंतर दोन शतकांनी (इ.स. ८४१ ) वाचस्पती मिश्रांनी न्यायवार्तिकावर 'तात्पर्यटीका' या नावाची उत्कृष्ट टीका लिहिली. त्यानंतर १० व्या शतकात जयंतभट्टाने मूळ सूत्रांवर 'न्यायमंजरी' नावाची टीका उत्कृष्ट साहित्यिक शैलीमध्ये लिहिली. जयंतभट्टानंतर उदयानाचार्य (इ.स. ९८४) उदयास आला. याने वाचस्पती मिश्रांच्या 'तात्पर्यटीके'वर 'तात्पर्यपरिशुध्दी' नावाची टीका लिहिली. याशिवाय त्याचे 'लक्षणावली', 'न्यायकुसुमांजली' हे दोन ग्रंथ श्रेष्ठ विद्वत्तेचे प्रतीक समजले जातात. याच सुमारास भासर्वज्ञ या न्यायपंडिताने 'न्यायसार' नावाचा स्वतंत्र ग्रंथ लिहिला. याशिवाय वर्धमानोपाध्याय, रचिदत्त मिश्र, वल्लभाचार्य इत्यादी कमी अधिक महत्त्वाचे ग्रंथकार निर्माण झाले.

'न्यायशास्त्रा' वरील वाययाचा हा इतिहास एका विद्वानाचा व त्याच्या ग्रंथाचा उल्लेख केल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. १३ व्या शतकात उदय पावलेल्या एका असामान्य व चतुरस्त्र विद्वत्तेने भूषित अशा महान तर्कशास्त्री गंगेशोपाध्याय किंवा गंगेशाने रचलेल्या 'तत्त्वचिंतामणी' या अभूतपूर्व ग्रंथा पूर्वीच्या दोन शतकांतील प्रमाणशास्त्रावरील ग्रंथांना मागे टाकून 'नवन्यायदर्शना' ला जन्म दिला. या ग्रंथाच्या प्रभावापुढे प्राचीन सूत्र- भाष्यांचे तेजही फिके पडू लागले. या ग्रंथाचे एकंदर चार खंड आहेत.

प्रत्यक्षखंड, अनुमानखंड, उपमानखंड आणि शब्दखंड अशी त्याची नावे आहेत. हा ग्रंथ इतका महत्त्वाचा ठरला की, गेल्या ५०० वर्षांतील सर्व शास्त्रांवर या ग्रंथाचा परिणाम झालेला आहे. यामुळेच या ग्रंथावर टीका- उपटीकाही फार झालेल्या आहेत. हा मूळ ग्रंथ सुमारे ३०० पानांचाच असला, तरी त्याच्यावरील टीकांची पाने मोजल्यास ती १० लाखांच्याही वर जाईल, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

गंगेश हा बिहार राज्यातील मिथिलेमधील दरभंगा शहरापासून १२ मैल असलेल्या एका खेड्यात जन्मला. इ.स.च्या १५ व्या शतकापर्यंत या ग्रंथाचे वर्चस्व मिथिलेवर इतके वाढले कील तेथील पंडितवर्ग हा ग्रंथ मिथिलेच्या बाहेर जाऊ देत नव्हते. परंतु वासुदेव सार्वभौमाने मोठ्या कष्टाने तो मिथिला प्रांतातून बंगाल प्रांतातील नवद्वीप नावाच्या विभागात आणून त्याचा बंगाल प्रांतात प्रसार सुरू केला. येथेच रघुनाथ तार्किकशिरोमणी हा प्रख्यात तार्किक निर्माण झाला.

---

पान २ वरून

## बालहक्क आणि शाळांची जबाबदारी

बदलापूरमधील शाळेत २०२४ मध्ये दोन अल्पवयीन मुलींवरील कथित लैंगिक अत्याचाराच्या घटनेने हा फरक किती धोकादायक असू शकतो, हे दाखवून दिले. त्यानंतरच्या चौकशीत शाळेतील अनेक निगराणी कॅमेरे कार्यरत नसल्याचे समोर आले आणि शाळेच्या सुरक्षा व्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले. प्रश्न फक्त अत्याचार करणारा कोण होता, एवढाच नाही. प्रश्न असा आहे की, व्यवस्था जागी होती का? तक्रार ऐकण्याची यंत्रणा होती का? मुलांच्या सुरक्षिततेसाठी जबाबदारी निश्चित होती का? धोक्याची चिन्हे ओळखली जात होती का? आणि घटना घडल्यानंतर नव्हे, तर घटना घडण्यापूर्वी प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक व्यवस्था कार्यरत होती का? शाळेची खरी जबाबदारी इथेच सुरू होते. शाळेने मुलाला फक्त परीक्षा पास होण्यासाठी तयार करू नये; त्याला सुरक्षितपणे जगण्यासाठीही तयार केले पाहिजे. त्याचवेळी शाळेने स्वतःच्या व्यवस्थेचेही परीक्षण केले पाहिजे. स्वच्छतागृह आहे का यापेक्षा ते वापरण्यायोग्य आहे का, सुरक्षा कॅमेरा आहे का यापेक्षा तो कार्यरत आहे का, तक्रारपेटी आहे का यापेक्षा तक्रार ऐकली जाते का, समानतेची घोषणा आहे का यापेक्षा प्रत्यक्षात कोणाला कोणती संधी मिळते हे प्रश्न अधिक महत्त्वाचे आहेत. शाळेची गुणवत्ता मोजताना त्यामुळे केवळ निकाल, प्रवेशसंख्या किंवा इमारतीची भव्यता पाहून चालणार नाही. त्या शाळेत मुलाला सुरक्षित वाटते का? त्याला भेदभावाचा अनुभव येतो का? त्याला प्रश्न विचारता येतात का? तो अन्यायाविरुद्ध बोलू शकतो का? त्याला समान संधी मिळते उढ ? मूलभूत सुविधा प्रत्यक्ष कार्यरत आहेत का? त्याच्या मानसिक आरोग्याची काळजी घेतली जाते का? तक्रार केल्यावर त्याच्यावरच दोष ठेवला जात नाही ना? या प्रश्नांची उत्तरेही शाळेच्या गुणवत्तेचा भाग झाली पाहिजेत. बालहक्कांचे संरक्षण ही शाळेची अतिरिक्त जबाबदारी नाही. ती शिक्षणाच्या गुणवत्तेचीच कसोटी आहे. मुलाला शाळेत प्रवेश मिळणे हा बालहक्काचा पहिला टप्पा आहे; पण त्या शाळेत सुरक्षितपणे, समानतेने, सन्मानाने आणि स्वतःची क्षमता विकसित करण्याच्या संधीसह शिकता येणे हा त्या हक्काचा खरा अर्थ आहे. शाळेच्या दारातून आत येताना मुलाने आपली जात, धर्म, भाषा, आर्थिक परिस्थिती, पालकांचा व्यवसाय किंवा सामाजिक ओळख बाहेर ठेवावी, अशी अपेक्षा आपण करतो. मग शाळेनेही त्याच्याकडे पाहताना या ओळखी बाजूला ठेवायला हव्यात.

पान ३ वरून

## नाचू कीर्तनाचे रंगी

सर्वांचे उद्दिष्ट एकच. आणि ते म्हणजे 'यथा नदिनां बहवोऽम्बुवेगाः सुमुद्रमेवाभिमुखा द्रवन्ति।' म्हणजे ज्याप्रमाणे सर्व नद्या कशाही वाहात गेल्या तरी त्यांनी शेवटी समुद्राकडेच धाव घ्यावी, तसे कीर्तनाचे सर्व प्रकार गुणाधिश परमेश्वराचेच गुणगान करतात.

**कीर्तनाचे प्रकार-** नारदीय, महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्रातील हरदासी, वारकरी, सांप्रदायी, रामदासी, पंत, विवेचनात्मक, चक्री, जुगलबंदी, गायन प्रधान, दशावतार, नाटक आणि आश्चर्य वाटेल पण तमाशा, सामाजिक, राष्ट्रीय, सरकारी आणि कार्पोरेट इत्यादी. अनेक दिग्गज कीर्तनकार या सर्व प्रकारात होऊन गेलेत व आजही आहेत.

**भाषेचे बंधन नाही-** मराठी, हिंदी, गुजराती भाषेतील कीर्तने अनेकांनी ऐकली असतील. मी स्वतः संस्कृत, इंग्रजी आणि फारसी भाषेतील कीर्तने ऐकली आहेत. रेवरंड ना. वा. टिळक आणि अलिकडचे बाबा महाराज सातारकर मराठी आणि इंग्रजीतून कीर्तने करीत. कीर्तनाचे विविध प्रकार, कीर्तन कसे असावे, कसे नसावे हे सर्व पुढील अंकात बघू... (पूर्वार्ध)

पान ४ वरून

## मंदिराभिमुख समाज

**विश्व हिंदू परिषदेच्या मंदिर आयामाची दिशा**

विश्व हिंदू परिषदेच्या मंदिर अर्चक पुरोहित संपर्क आयामाच्या कार्यातून मंदिरांशी संपर्क वाढवणे, भक्तांना जोडणे आणि मंदिरांच्या सामाजिक भूमिकेला बळ देणे यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मंदिरांचे संघटन, व्यवस्थापनातील भक्तांचा सहभाग, स्वच्छता अभियान, संस्कार आणि सेवाकार्य या दिशेने व्यापक जनसहभाग निर्माण होणे आवश्यक आहे. मंदिराभिमुख समाज म्हणजे मंदिरातून मिळालेली प्रेरणा घरात, व्यवसायात आणि सामाजिक व्यवहारात जगणारा समाज. '**माझे मंदिर, माझी जबाबदारी**' या संकल्पातून प्रत्येक भक्त पुढे आला, तर मंदिर समाजाच्या जीवनाला दिशा, संस्कार, सेवा आणि सामर्थ्य देणारे केंद्र बनेल.

**भक्तांना मंदिराशी जोडणारी सातत्यपूर्ण अभियाने**

विश्व हिंदू परिषदेच्या मंदिर अर्चक पुरोहित संपर्क आयामाचे कार्य भक्तांना मंदिराशी जोडणे आणि मंदिरांना अधिक सक्षम करणे या दिशेने सुरू आहे. भक्तांना मंदिराच्या व्यवस्थापनातील प्रश्न समजावेत, त्यांच्यात जबाबदारीची जाणीव निर्माण व्हावी आणि त्यांनी प्रत्यक्ष कार्यात सहभागी व्हावे, यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. दरवर्षी राज्यभर आयोजित होणारे मंदिर स्वच्छता अभियान हा त्यातील महत्त्वाचा उपक्रम आहे. श्रमदानासाठी मंदिरात आलेला भक्त परिसराच्या गरजा जवळून पाहतो. व्यवस्थापनाशी संवाद साधण्याची संधी मिळते. या सहभागातून '**माझे मंदिर, माझी जबाबदारी**' ही भूमिका प्रत्यक्ष कृतीत उतरू शकते.

**प्रत्येक मंदिरात भक्तमंडळीचे संघटन**

प्रत्येक मंदिराभोवती सक्रिय भक्तमंडळीचे संघटन उभे राहणे आवश्यक आहे. नियमित दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांबरोबर परिसरातील कुटुंबे, महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांना या कार्याशी जोडावे. मंदिराच्या गरजांवर चर्चा करून स्वच्छता, संस्कार, उत्सव, सेवा आणि देखभाल यांसाठी जबाबदाऱ्या स्वीकाराव्यात. हे संघटन मंदिर व्यवस्थापनाशी समन्वय साधून काम करणारे असावे. नियमित बैठका, कामांचा आढावा आणि पुढील उपक्रमांचे नियोजन यांमुळे सहभाग टिकून राहतो.

काही मोजक्या व्यक्तींवर सर्व कामांचा भार पडण्याऐवजी अनेक भक्तांच्या योगदानातून मंदिराचे कार्य अधिक व्यापक होऊ शकते. जिल्हानिहाय मंदिर व्यवस्थापनाचे व्हॉट्सप समूह तयार करून संपर्क आणि माहितीची देवाणघेवाण वाढवण्याचे कामही केले जात आहे. मंदिरांच्या अडचणी, उपयुक्त अनुभव, प्रशिक्षणाची माहिती आणि तज्ज्ञ मार्गदर्शन या माध्यमातून परस्परांपर्यंत पोहोचवता येते. एखाद्या मंदिराने यशस्वीपणे राबविलेला उपक्रम इतर मंदिरांसाठीही उपयोगी ठरू शकतो.

**मंदिर व्यवस्थापक आणि पुरोहितांच्या संमेलनातून संवाद**

जिल्ह्यांमध्ये मंदिर व्यवस्थापक, विश्वस्त, अर्चक आणि पुरोहितांची संमेलने आयोजित करून त्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मंदिरांचे व्यवस्थापन करणाऱ्यांना येणाऱ्या अडचणी आणि धार्मिक सेवा देणाऱ्या अर्चक-पुरोहितांचे प्रश्न प्रत्यक्ष ऐकून घेणे हा या संवादाचा महत्त्वाचा भाग आहे. मंदिराची मालमत्ता, देखभाल, आर्थिक नियोजन, नोंदी, धार्मिक परंपरा, भक्तांच्या सुविधा आणि सेवाकार्य यांसारख्या विषयांवर अनुभवांची देवाणघेवाण करता येते. अर्चक-पुरोहितांचे प्रशिक्षण, उपजीविका, सन्मान आणि पुढील पिढीची तयारी यांवरही विचार व्हावा. स्थानिक प्रश्नांची नोंद घेऊन त्यांवर पुढील कार्यवाही निश्चित केली, तर संमेलनांचा लाभ संबंधित मंदिरांना आणि व्यक्तींना मिळू शकतो.

**मंदिरांना तज्ज्ञ सहाय्य आणि सामूहिक विचारमंथन**

प्रत्येक मंदिराकडे सर्व विषयांचे तज्ज्ञ उपलब्ध असतीलच असे नाही. म्हणून मंदिरांना आवश्यकतेनुसार कायदा, लेखांकन, वास्तुरचना, अभियांत्रिकी, सुरक्षितता, माहिती तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन यांसंबंधी तज्ज्ञ सहाय्य उपलब्ध करून देण्याची दिशा मंदिर आयामाने स्वीकारली आहे. योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळाल्यास कामांचे नियोजन अधिक व्यवस्थित होऊ शकते. मंदिरांसमोरील विविध प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी विषयानुसार तज्ज्ञ समूहांत विचारमंथन घडविण्याचे कामही सुरू आहे.

स्थानिक व्यवस्थापकांचे अनुभव आणि तज्ज्ञांचे ज्ञान एकत्र आल्यास व्यवहार्य उपाय सुचू शकतात. प्रश्नाची वस्तुस्थिती समजून घेणे, संबंधित कागदपत्रांचा अभ्यास करणे आणि मंदिराच्या क्षमतेनुसार उपाय ठरवणे, अशी कार्यपद्धती उपयुक्त ठरते.

मंदिरांशी संबंधित कायद्यांमध्ये आवश्यक बदल सुचविण्याच्या दृष्टीने कायदेतज्ज्ञांच्या मदतीने अभ्यास, सल्ला आणि प्रस्तावित मसुदे तयार करून शासनासमोर मांडण्याचे प्रयत्न केले जात आहेत. मंदिरांच्या प्रत्यक्ष अडचणी शासनापर्यंत अभ्यासपूर्ण स्वरूपात पोहोचाव्यात आणि त्यावर योग्य निर्णय व्हावेत, हा त्यामागील उद्देश आहे. समाजाचा सहभाग, पारदर्शकता आणि उत्तरदायी व्यवस्थापन यांना बळ देणारी व्यवस्था उभी राहावी, यासाठी सातत्यपूर्ण संवाद आवश्यक आहे.

**मंदिराभिमुख समाजासाठी सर्वांचा सहभाग**

मंदिर आयामाच्या या कार्याला प्रत्येक भक्ताने आपल्या क्षमतेनुसार हातभार लावावा. कुणी श्रमदान करावे, कुणी युवकांना प्रशिक्षण द्यावे, कुणी व्यावसायिक कौशल्यातून मदत करावी, तर कुणी गरजू व्यक्तींना सेवाउपक्रमांशी जोडावे. मंदिर व्यवस्थापक, अर्चक, पुरोहित, उद्योजक आणि सामान्य भक्त यांच्या सहकार्यातून या कार्याला गती मिळू शकते.

मंदिराभिमुख समाज म्हणजे मंदिरातून मिळालेली प्रेरणा आपल्या दैनंदिन जीवनात जगणारा समाज. श्रद्धेतून सदाचार, संस्कारातून जबाबदारी, सेवेतून आत्मीयता आणि संघटनातून सामर्थ्य निर्माण व्हावे. मंदिर समाजाच्या आध्यात्मिक, सामाजिक आणि आर्थिक उन्नतीचे केंद्र बनावे.

'**माझे मंदिर, माझी जबाबदारी**' हा संकल्प प्रत्येकाच्या मनात रुजला, तर या परिवर्तनाची सुरुवात आपल्या जवळच्या मंदिरापासून होऊ शकते. या कामात आपल्या सर्वांचे स्वागत आहे. प्रत्यक्ष सहभागी होण्यासाठी कृपया संपर्क करावा. (लेखक विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र-गोवा मंदिर पुरोहित संपर्क आयामचे क्षेत्र संपकृ प्रमुख आहेत.)

# धुमसते युरोप...

परराष्ट्रकारण

**ओंकार मुळ्ये**

स्पेनमधील आंदोलनाला कारणीभूत ठरलेली घटना काहीशी उपरोधिक होती. गुंतवणूक निधीने भाड्यात तब्बल २३० टक्क्यांची वाढ केल्यानंतर माद्रिदमधील एका ८७ वर्षीय महिलेची घरातून हकालपट्टी करण्यात आली. या घटनेने मोठा संताप उफाळून आला. गगनाला भिडलेले भाडे, मोठ्या प्रमाणावरील मालमत्ता सट्टेबाजी, अल्पकालीन पर्यटनासाठीच्या भाड्याच्या घरांचा वाढता व्यवसाय आणि स्थिर राहिलेले वेतन, या सर्वांचा एकत्रित परिणाम असा झाला की, अनेक तरुण कामगारांसाठी जीवन जगणे दिवसेंदिवस अशक्य होत आहे.

स्पेनचे समाजवादी पंतप्रधान पेद्रो सांचेझ यांनी सोमवारी अचानक सार्वत्रिक निवडणूक घेण्याची घोषणा केली. उजव्या विचारांच्या पक्षांनी त्यांच्या आपत्कालीन गृहनिर्माण विधेयकाला नाकारल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.

फ्रान्स आणि स्पेन या दोन्ही युरोपीय देशांतील संकटांकडे एकत्रितपणे पाहिल्यास मुख्य प्रवाहातील सरकारांसमोरील काही मूलभूत समस्या स्पष्ट होतात. पहिली समस्या म्हणजे, विशेषतः तरुणांना आता छोट्या-छोट्या उपाययोजना- उदा. विशिष्ट करसवलती किंवा किरकोळ प्रशासकीय सुधारणा या खोलवर रुजलेल्या सामाजिक-आर्थिक समस्यांवर लावलेल्या तात्पुरत्या मलमपट्टीसारख्या वाटू लागल्या आहेत. दुसरी समस्या म्हणजे, रस्त्यावरचा वाढता दबाव आणि त्याचा फायदा उठवण्यासाठी उत्सुक असलेले विरोधी पक्ष. बहुमत नसलेल्या सत्ताधारी आघाड्यांसाठी परिस्थिती कठीण होणार आहे.

दरम्यान, अधिकाधिक कट्टर होत चाललेले विरोधी पक्ष या असंतोषाचा सक्रियपणे राजकीय फायदा उठवत आहेत. कट्टर डाव्या विचारसरणीचे फ्रान्समधील जाँ-ल्यूक मेलाँशों, ज्यांना ३५ वर्षांखालील ४७ टक्के मतदारांचा पाठिंबा असल्याचे सांगितले जाते; त्यांनी आंदोलनकर्त्यांना उघडपणे पाठिंबा दिला. स्पेनमध्ये डाव्या विचारसरणीचे पोदेमोस आणि सुमार पक्षांनी गृहनिर्माण संकटासाठी नियंत्रणाबाहेर गेलेल्या आर्थिक भांडवलशाहीला थेट जबाबदार धरले आहे. स्पेनमध्ये कट्टर उजव्या विचारसरणीचा 'व्हॉक्स' पक्ष मुख्य विरोधी पक्ष





**स्पेनमध्ये वाढत्या गृहनिर्माण संकटाच्या निषेधार्थ ५० शहरांमध्ये हजारो नव्हे; तर लाखो लोक रस्त्यावर उतरले आहेत, तर फ्रान्समध्ये दीर्घ शालेय तास, शिक्षकांची कमतरता, मोडकळीस आलेल्या वर्गखोल्या आणि विद्यापीठ प्रवेशाची अस्पष्ट व्यवस्था याविरोधात विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला हिंसक रुप प्राप्त झाले. दोन्ही आंदोलनांची कारणे वेगवेगळी असली, तरी मुख्यतः तरुणांनी सुरू केलेल्या या दोन्ही आंदोलनांमधून पश्चिम युरोपातील सरकारांसमोरील वाढती समस्या स्पष्ट होते.**



'पॉप्युलर पार्टी'सोबत उभा राहिला आणि सांचेझ सरकारच्या आपत्कालीन गृहनिर्माण पॅकेजला विरोध केला. हे पॅकेज घरमालकांना शिक्षा करणारे सरकारी अतिक्रमण असल्याचे त्यांनी मांडले.

दोन्ही बाजूंनी होणाऱ्या या राजकीय दबावात मुख्य प्रवाहातील सरकारे अधिकाधिक अडचणीत सापडत आहेत. जेव्हा एखादी संपूर्ण पिढी असा निष्कर्ष काढते की, समाजाच्या विद्यमान व्यवस्था त्यांना ना परवडणारी घरे देऊ शकतात, ना कार्यक्षम शाळा; तेव्हा राजकीय संमतीचा पाया ढासळू लागतो आणि अशाच परिस्थितीचा फायदा देशातील डावे आणि असामाजिक घटक घेऊन, सरकारविरोधी भावना अधिक भडकावतात.

संसदेतील बहुमताचा अभाव आणि आर्थिक मर्यादांमुळे हतबल झालेल्या सत्ताधार्यांच्या या कमकुवतपणाचा राजकीय फायदा उठवण्यासाठी दोन्ही बाजूंनी (कट्टर डावे आणि उजवे विचारसरणीचे) विरोधी पक्ष सज्ज झाले आहेत. स्पेनमधील पेद्रो सांचेझ सरकारने अचानक घेतलेला निवडणुकांचा निर्णय हे याच राजकीय कोंडीचे थेट उदाहरण. जोपर्यंत युरोपातील सरकारे या मूलभूत सामाजिक-आर्थिक समस्यांवर ठोस, दीर्घकालीन आणि क्रांतिकारी उपाय शोधत नाहीत, तोपर्यंत रस्त्यांवरील हा असंतोष शमणार नाही. पण, आंदोलनाच्या नावाखाली शहरांना, नागरिकांना वेठीस धरण्याचा हा जागतिक अराजकावादाचा 'ट्रेंड' सर्वस्वी धोकादायक आणि लोकशाही मूल्यांना नख लावणारा आहे. त्यामुळे संवादातून मार्ग काढणे आणि अराजकवाद्यांना वेळीच आवरणे गरजेचे!

# नावी पिल्ले : भारतीय वंशपरंपरा, मानवता आणि 'नोबेल' पुरस्कार

गौरव

**डॉ. पंकज जयस्वाल**

**दरवर्षीप्रमाणे विज्ञानजगतातील 'नोबेल' पुरस्कारांची घोषणा नुकतीच करण्यात आली. यामध्ये भौतिकशास्त्रातील 'नोबेल' पुरस्कार बेल्जियन-अमेरिकन शास्त्रज्ञ फ्रान्सिस हाल्झेन यांना, तर शांततेचा 'नोबेल' पुरस्कार दक्षिण आफ्रिकन भारतीय वंशाच्या कायदेतज्ज्ञ, वर्णभेदाविरुद्ध लढा देणार्या नावी पिल्ले यांना जाहीर झाला. त्यानिमित्ताने 'नोबेल' पुरस्काराने गौरवान्वित या दोन दिग्गजांच्या कार्याचा आढावा घेणारे हे लेख...**





१९६७ मध्ये भारतीय वंशाच्या एका तरुण महिलेने वर्णभेदी दक्षिण आफ्रिकेत एक कायदेशीर फर्म स्थापन केली, जिथे वंशभेद जीवनाच्या प्रत्येक पैलूमध्ये खोलवर रुजलेला होता. जवळपास ६० वर्षांनंतर तिला 'नोबेल' शांतता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तिचे नाव नवनेथम नावी पिल्ले आणि तिचे पारंपरिक नाव (नवनेथम, एक तामिळ नाव, जे अनेकदा सांस्कृतिक वारसाशी जोडले जाते) तिचा प्रबळ तामिळ वंश अधोरेखित करते. जरी तिचा भारताशी असलेला संबंध तिच्या वंश, समाज आणि व्यापक ऐतिहासिक भारतीय जनसमुदायामध्ये (डायस्पोरा) खोलवर रुजलेला असला; तरी तिची सार्वजनिक कारकीर्द आणि जीवन प्रामुख्याने दक्षिण आफ्रिका आणि आंतरराष्ट्रीय कायदेशीर क्षेत्रातच घडले.

पिल्ले या भारतीय वंशाच्या तिसऱ्या पिढीतील दक्षिण आफ्रिकन आहेत. त्यांचे आजी-आजोबा १९व्या शतकाच्या उत्तरार्धात पूर्वीच्या मद्रास प्रांतामधून (आताचे तामिळनाडू आणि आसपासचे प्रदेश) स्थानिक ऊस मळ्यांसाठी करारबद्ध किंवा साहाय्यक मजूर म्हणून आले होते. डर्बनच्या लेअरवुडमधील एका कामगारवर्गातील स्थलांतरित कुटुंबात वाढलेल्या तिच्या सुरुवातीच्या वर्षांवर, वंशभेदाच्या मोठ्या परीक्षांना तोंड देऊनही आपली सांस्कृतिक ओळख, भाषा आणि सामुदायिक बंधने निष्ठेने जपणार्या एकसंध दक्षिण आफ्रिकन-भारतीय जनसमुदायाचा प्रभाव होता.

नावी पिल्ले यांची पार्श्वभूमी अत्यंत सामान्य. त्यांचे वडील बसचालक होते- त्यांना स्वतःच्या चिकाटीमुळे आणि डर्बनमधील त्यांच्या स्थानिक भारतीय-दक्षिण आफ्रिकन समुदायाच्या आर्थिक पाठिंब्यामुळे उच्चशिक्षण घेणे शय झाले. हा समुदाय प्रतिभावान तरुणांना विद्यापीठाची पदवी मिळवण्यासाठी मदत करण्याकरिता एकत्र आला होता. त्या ज्या दक्षिण आफ्रिकन- भारतीय समुदायातून येतात, त्यांचा भारतीय सांस्कृतिक परंपरा, भाषा (जसे की तामिळ) आणि सणांशी दीर्घकाळचा संबंध आहे, जो वर्णभेदी राजवटीने केलेल्या सांस्कृतिक दडपशाहीविरुद्ध लवचीकता टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक ठरला आहे. १९४१ मध्ये डर्बनमध्ये जन्मलेल्या पिल्ले अशा समाजात वाढल्या, जिथे वंशाच्या आधारावर राहण्याच्या, शिक्षणाच्या आणि रोजगाराच्या संधींवर निर्बंध होते.

भारतीय तामिळ वंशाची महिला म्हणून, त्यांना दोन स्तरांवर भेदभावाला सामोरे जावे लागले. असे असूनही, त्या वकील झाल्या आणि १९६७ मध्ये नतालमध्ये वकिलीचा व्यवसाय सुरू करणार्या त्या पहिल्या महिला ठरल्या. त्यांनी राजकीय कैदी आणि नेल्सन मंडेला यांच्यासह वर्णभेदविरोधी कार्यकर्त्यांचे प्रतिनिधित्व केले आणि वांशिक असमानतेला संस्थात्मक स्वरूप देणाऱ्या सरकारला विरोध केला. वर्णभेदी राजवटीने लादलेल्या कठोर कायदेशीर आणि सामाजिक मर्यादांमध्ये, जिथे गैरश्वेतांना पद्धतशीरपणे मतदानाच्या हक्कापासून वंचित ठेवणे, विलगीकरण आणि सांस्कृतिक आत्मसातीकरण किंवा विस्थापनाचे प्रयत्न यांचा सामना करावा लागला. दक्षिण आफ्रिकेतील भारतीय समुदाय आपली सांस्कृतिक ओळख जपण्यासाठी प्रामुख्याने मजबूत सामुदायिक एकोपा, अध्यात्म आणि तळागाळातील संघटनांवर अवलंबून राहिला.

भारतीय संस्कृती, भाषा आणि धार्मिक ओळख जतन करण्याचे प्रयत्न विविध महत्त्वाच्या मार्गांनी दिसून आले. पायाभूत सुविधा म्हणून मंदिरे आणि आध्यात्मिक केंद्रांची स्थापना करण्यात आली. अधिकृत शासकीय पाठिंब्याअभावी आणि श्वेतवर्णीय अल्पसंख्याक सरकारकडून अनेकदा संशयाच्या नजरेने पाहिले जात असल्यामुळे समाजाने आपली मर्यादित संसाधने एकत्र करून स्थानिक मंदिरे उभारली. जोहान्सबर्गमधील मेलरोझ श्री शिव सुब्रमण्यम आलयम (स्थापना १८९०) आणि डर्बनमधील अनेक मंदिरे यांसारखी ऐतिहासिक ठिकाणे केवळ पूजास्थळांपुरती मर्यादित न राहता, सामाजिक संबंधांना प्रोत्साहन देणारी मध्यवर्ती, समुदायाने एकत्र येण्याची ठिकाणे ठरली. आर्थिक गरजेपोटी युरोपीय भाषा आणि चालीरीती स्वीकारण्यासाठी वसाहतवादी आणि वर्णभेदी दबाव असूनही, कुटुंबांनी तामिळ, तेलुगू, हिंदी, गुजराती यांसारख्या आपल्या मातृभाषा दृढतेने जपल्या.

स्थानिक भाषा घरे, सामुदायिक केंद्रे आणि धार्मिक स्थळांमध्ये अनौपचारिकपणे शिकवल्या जात होत्या. 'रामायणा'सारखी महाकाव्ये, पवित्र काव्य आणि पारंपरिक भक्तिगीते यांसारखा सांस्कृतिक वारसा मौखिकरीत्या आणि सामुदायिक ग्रंथांच्या माध्यमातून प्रसारित झाला, ज्याने अभिमान आणि लवचीकता वाढवणारा नैतिक आणि सांस्कृतिक पाया म्हणून काम केले.

**नावी पिल्ले यांचा जीवनप्रवास आणि कारकीर्दः-**

नवनेथम नावी पिल्ले (पूर्वाश्रमीच्या नायडू) यांचा जन्म दि. २३ सप्टेंबर १९४१ रोजी दक्षिण आफ्रिकेत झाला. आज त्या एका प्रतिष्ठित दक्षिण आफ्रिकन कायदेतज्ज्ञ म्हणून ओळखल्या जातात. शिवाय, त्यांनी २००८ ते २०१४ या काळात संयुक्त राष्ट्रांच्या 'मानवाधिकार उच्चायुक्त' पदावरही काम केले आहे. एवढेच नाही, तर तामिळ वंशाच्या भारतीय दक्षिण आफ्रिकन नागरिक म्हणून, त्यांनी दक्षिण आफ्रिकेच्या उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून काम करणार्या पहिल्या गैरश्वेतवर्णीय महिला म्हणून इतिहासदेखील घडवला. शांतता आणि आंतरराष्ट्रीय कायद्यातील त्यांच्या योगदानासाठी त्यांना यंदाच्या 'नोबेल' शांतता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आणि हा सन्मान मिळवणाऱ्या त्या पहिल्या दक्षिण आफ्रिकन महिला ठरल्या.

डर्बनमध्ये जन्मलेल्या आणि वाढलेल्या पिल्ले यांनी १९६३ मध्ये कला शाखेची पदवी (बॅचलर ऑफ आर्ट्स) आणि १९६५ मध्ये नताल विद्यापीठातून कायद्याची पदवी (बॅचलर ऑफ लॉ) मिळवली. शिक्षणानंतर त्यांनी फौजदारी बचाव वकील एन. टी. यांच्या हाताखाली काम करत, वकील म्हणून आपल्या कायदेशीर कारकिर्दीला सुरुवात केली. वर्णभेदाविरुद्धच्या कायदेशीर बचावामध्ये त्या सक्रियपणे सहभागी होत्या.

नावी पिल्ले यांच्या कारकिर्दीला एक असाधारण वळण मिळाले. १९९५ मध्ये वर्णभेद संपल्यानंतर पिल्ले या दक्षिण आफ्रिकेच्या उच्च न्यायालयात नियुक्त झालेल्या पहिल्या गैरश्वेतवर्णीय महिला ठरल्या. लवकरच त्यांना आपल्या देशाच्या सीमांपलीकडील गुन्ह्यांची प्रकरणे हाताळावी लागली. रवांडासाठीच्या आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयात न्यायाधीश म्हणून, त्यांनी एक महत्त्वपूर्ण कायदेशीर दाखला प्रस्थापित करण्यातही महत्त्वाची भूमिका बजावली. बलात्कार आणि लैंगिक हिंसाचाराला वंशसंहाराचे कृत्य म्हणून वर्गीकृत केले जाऊ शकते, याला मान्यता दिली. आंतरराष्ट्रीय कायद्यात अनेकदा दुर्लक्षित राहिलेल्या, महिलांनी सोसलेल्या अत्याचारांची ही एक महत्त्वपूर्ण कबुली होती. नंतर पिल्ले यांनी आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयात न्यायाधीश म्हणून काम केले आणि संयुक्त राष्ट्रांच्या 'मानवाधिकार उच्चायुक्त' पदाची जबाबदारीही यशस्वीपणे सांभाळली.

१९९५ मध्ये वर्णभेद संपल्यानंतर त्यांची दक्षिण आफ्रिकेच्या उच्च न्यायालयात 'प्रभारी न्यायाधीश' म्हणून नियुक्ती झाली आणि संयुक्त राष्ट्र महासभेने त्यांची रवांडासाठीच्या आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायाधिकरणात न्यायाधीश म्हणून निवड केली, जिथे त्यांनी आठ वर्षे (१९९९-२००३) सेवा बजावली. त्यापैकी शेवटची चार वर्षे त्या अध्यक्ष होत्या. २००३ मध्ये त्या हेग येथील आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायालयात न्यायाधीश झाल्या आणि २००८ पर्यंत अपील कक्षात कार्यरत होत्या. सुश्री पिल्ले या १९६७ मध्ये त्यांच्या मूळ प्रांतात, नतालमध्ये वकिलीचा व्यवसाय सुरू करणाऱ्या पहिल्या महिला होत्या. त्यांनी वर्णभेदविरोधी कार्यकर्त्यांसाठी 'बचाव वकील' म्हणून काम केले, छळाचे मुद्दे समोर आणले आणि रॉबेन बेटावरील कैद्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवला. सध्या पिल्ले या आंतरराष्ट्रीय न्यायालयात नरसंहाराच्या गुन्ह्याला प्रतिबंध आणि शिक्षा करण्यावरील अधिवेशनाच्या अंमलबजावणीसंदर्भात (गांबिया विरुद्ध म्यानमार) तदर्थ न्यायाधीश म्हणून कार्यरत आहेत. त्या माद्रिदमधील आंतरराष्ट्रीय मृत्युदंडाविरोधी आयोगाच्या अध्यक्षा, आंतरराष्ट्रीय न्युरेमबर्ग तत्त्व अकादमीच्या सल्लागार परिषदेच्या अध्यक्षा आणि उत्तर कोरियातील अटकेसंबंधी अर्ध- न्यायिक चौकशीच्या अध्यक्षादेखील आहेत. अशा या महान मातृशक्तीला सादर प्रणाम आणि अभिनंदन!

# मानवी शरीरात शिरणारे अदृश्य संकट

वेध

**प्रा. सुनीता पवार**

आज प्लॅस्टिक आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. प्लॅस्टिक शिवाय आधुनिक जीवनाची कल्पनाच करणे कठीण झाले आहे. पाण्याच्या बाटल्या, टिफिनचे डब्बे, खेळणी, पॅकिंग साहित्य, टी बॅग, स्वयंपाकघरातील वस्तू, ऑनलाईन मागवलेल्या पदार्थांचे पॅकेजिंग आपल्या आजूबाजूला प्लास्टिकच प्लॅस्टिक दिसत आहे. प्लॅस्टिकचे मोठे तुकडे कालांतराने सूक्ष्म कणांमध्ये बदलतात.

साधारणपणे ५ मिलिमीटरपेक्षा लहान प्लॅस्टिकचे कण मायक्रो प्लॅस्टिक तर त्यापेक्षा अतिशय सूक्ष्म आकाराचे कण नॅनो प्लॅस्टिक म्हणून ओळखले जातात. हे कण इतके सूक्ष्म असतात की ते आपण पाहूही शकत नाही. हवा, पाणी आणि अन्नाच्या माध्यमातून त्यांचा मानवाशी संपर्क होऊ शकतो.आपण पाणी पितो, अन्न खातो आणि श्वास घेतो. या मार्गांनी सूक्ष्म प्लॅस्टिक कण शरीरात जाण्याची शक्यता आहे. मानवी रक्तासह शरीराच्या विविध भागांमध्ये मायक्रो प्लॅस्टिक आढळल्यांचे अहवाल आलेले आहेत. नॅनो प्लॅस्टिक पेशींशी परस्पर संवाद करू शकते, अशी वैज्ञानिक चिंता आहे. काही अभ्यासकांनी प्लॅस्टिक कण आणि दाहजन्य प्रक्रिया यांच्यातील संभाव्य संबंध तपासले आहे. मात्र हृदयविकार, रक्तवाहिन्यांचे ब्लॉकेज किंवा कोलेस्ट्रॉलचे कारण थेट प्लॅस्टिकच आहे, असे सध्या ठामपणे म्हणता येत नाही. हृदयविकारामागे कोलेस्ट्रॉल, उच्च रक्तदाब, मधुमेह, धूम्रपान, अनुवंशिकता, आहार आणि जीवनशैली यांसह अनेक घटक असतात. प्रयोगशाळेतील काही अभ्यासकांमध्ये सूक्ष्म प्लॅस्टिक कणांमुळे पेशीमध्ये ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस, दाह किंवा पेशीच्या कार्यात बदल होण्याची शक्यता तपासली गेली आहे. आईच्या दुधाच्या नमुन्यामध्ये मायक्रो प्लॅस्टिक आढळल्याचे संशोधन प्रकाशित झाले आहे. यामुळे गर्भवती महिला, माता आणि लहान मुलांच्या प्लॅस्टिक संपर्क बाबत विशेष चिंता निर्माण झाली आहे. मात्र याचा अर्थ असा नाही की आईचे दूध देणे धोकादायक आहे. उलट, आईचे दूध बालकांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. याऐवजी आई आणि बाळाचा अनावश्यक प्लॅस्टिक संपर्क कमी करणे हा अधिक योग्य दृष्टिकोन आहे.

चहाची पिशवी, टूथब्रश आणि स्वयंपाकघरातील वस्तू काही प्लॅस्टिकयुक्त चहाच्या पिशव्यांमधून गरम पाण्याच्या संपर्कात सूक्ष्म प्लॅस्टिक कण सुटू शकतात, असे संशोधन सूचित करते. त्याचप्रमाणे प्लॅस्टिकच्या वस्तू घासताना किंवा झिजताना सूक्ष्म कण निर्माण होऊ शकतात. म्हणून शक्य असेल तेथे स्टील किंवा काचेच्या बाटल्या वापरणे, गरम पदार्थ प्लॅस्टिकमध्ये ठेवणे टाळणे, प्लॅस्टिकचा अनावश्यक वापर कमी करणे, पुनर्वापर आणि योग्य कचरा व्यवस्थापन करणे या सवयी अंगीकारता येतात. आजकाल ऑनलाईन फूड डिलिव्हरी सेवांमुळे पॅकेजिंगचा वापर वाढला आहे. गरम पदार्थ प्लॅस्टिकच्या पॅकेजिंगमध्ये दीर्घकाळ राहिल्यास पदार्थ आणि पॅकेजिंग याचा संपर्क वाढतो. शक्य असेल तेथे पर्यावरणपूरक आणि सुरक्षित पॅकेजिंगचा आग्रह ग्राहकांनी धरावा. व्यावसायिकांनीही एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लॅस्टिकऐवजी सुरक्षित पर्यायांचा वापर वाढविणे गरजेचे आहे. प्लॅस्टिक कचरा जमिनीत जातो. तो तुकडे तुकडे होऊन सूक्ष्म कणांमध्ये बदलतो. ते पाणी, हवा आणि अन्नसाखळीत प्रवेश करू शकतात. आता बदलाची गरज आहे. प्लॅस्टिक एका दिवसात आपल्या जीवनातून काढून टाकणे शक्य नसले तरी अनावश्यक प्लॅस्टिक कमी करणे शक्य आहे. आपण आपल्या घरापासून सुरुवात करूया. पाण्यासाठी स्टीलची बाटली वापरूया. गरम अन्नासाठी काचेचे किंवा स्टीलचे डबे वापरूया. एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लॅस्टिकला नकार देऊया.

प्लॅस्टिक कचरा इतर कचऱ्यापासून वेगळा करूया. मुलांना पर्यावरणपूरक वस्तूची सवय लावूया. प्रश्न फक्त आपल्या आरोग्याचा नाही; प्रश्न पुढच्या पिढीच्या आरोग्याचा आहे. एक संकल्प करूया- 'गरज असेल तेथेच प्लॅस्टिक, पर्याय असेल तेथे प्लॅस्टिकला नकार आणि आपल्या आरोग्यासाठी स्वच्छ पर्यावरणाचा स्वीकार करणे म्हणजेच भविष्य सुरक्षित करणे होय.'

# ‘बजरंग दला’ची ४२ वर्षांची ध्येययात्रा!

निमीत्त...

विनोद बन्सल

**देव, देश आणि धर्माचे कार्य स्वतःच्या बाहुबलावर पूर्ण करण्यासाठी तत्पर असलेल्या तरुणांची वाहिनी सुरु करण्याच्या इराद्याने बीजारोपण केलेला ‘बजरंग दल’रुपी वृक्ष, आता ४२ वर्षांचा झाला. अहोरात्र झटणाऱ्या बजरंगींच्या बाहुबलावर विश्वास ठेवून, असंख्य धर्मकार्य करणार्या ‘बजरंग दला’च्या प्रवासाचा आढावा घेणारा हा लेख...**

ज्या ठिकाणी बजरंग दलाचा जन्म झाला आणि ज्या प्रारंभिक कार्यासाठी या संघटनेची निर्मिती झाली, त्या कार्याच्या पूर्ततेचा सुखद अनुभव मनात साठवूनच बजरंग दलाचे आठ माजी प्रमुख दि. २ एप्रिल रोजी अयोध्याधाम येथे पोहोचले होते. तेथेच पूजाअर्चा केल्यावर त्यांनी, श्रीराम जन्मभूमी मंदिर परिसरात उभारण्यात आलेल्या आपले आराध्य दैवत बजरंगबली यांच्या मंदिरावर सामूहिकरीत्या ध्वजारोहण केले. हे दृश्य त्या सर्व योद्ध्यांच्या डोळ्यांत कृतज्ञतेचे अश्रू आणणारेच ठरले.

१९८४ मध्ये विश्व हिंदू परिषदेने, अयोध्येत ‘श्रीराम-जानकी रथयात्रा’ काढली. मात्र, तत्कालीन सरकारने या यात्रेला सुरक्षा पुरविण्यास नकार दिला. त्यानंतर पूजनीय संत आणि श्रद्धेय सिंहलजी यांना श्रीरामाचे हे कार्य स्वतःच्या बाहुबलाच्या जोरावर पूर्ण करू शकेल, अशा युवकांच्या एका संघटित वाहिनीची आवश्यकता जाणवली. रथयात्रेच्या सुरक्षेसाठी त्यांनी, हिंदू युवकांची एक संघटितशक्ती उभी केली. या संघटनेला ‘बजरंग दल’ असे नाव देण्यात आले. पुढे विश्व हिंदू परिषदेच्या या युवा संघटनेवर, श्रीराम मंदिर आंदोलनाला गती देण्याची आणि देशभरातील हिंदू युवकांना संघटित करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली.

भागात ‘लव्ह जिहाद’, अवैध धर्मांतरण, गोहत्या, जिहादी दहशतवाद किंवा हिंदू श्रद्धेवरील आघाताचा विषय असो अथवा सामाजिक समरसता, धार्मिक यात्रा, तीर्थक्षेत्रे, मठ-मंदिरे, पूजनीय संत, मातृशक्ती, गोमाता आणि भारतमातेच्या सुरक्षेचा प्रश्न असो; बजरंग दल सदैव कटिबद्धतेने उभे असल्याचे दिसते.

सेवाकार्य : दरवर्षी लाखो युनिट रक्तदान,

आपल्या ४२ वर्षांच्या वाटचालीत विश्व हिंदू परिषदेच्या या युवा संघटनेने, समाजाच्या सहभागातून अनेक जनजागरण अभियानांचे आयोजन केले. कालांतराने या अभियानांनी जागतिक स्तरावरही नोंद घेण्याजोगे विक्रमही प्रस्थापित केल्याचे, संघटनेकडून सांगण्यात येते. १९८४ मध्ये युवकांच्या सहभागातून सुरू झालेल्या ‘श्रीराम जन्मभूमी मुक्ती’ आंदोलनाने,

मध्ये ‘बाबा बुढा अमरनाथ यात्रे’ला पुन्हा प्रारंभ करून दिला. त्यामुळे या भागातून हिंदूंचे पलायन थांबण्यास मदत झाली, तसेच समाज आणि सुरक्षा दलांचे मनोबलही वाढले. याशिवाय, मेवातमधील ‘नल्हड महादेव यात्रा’, कर्नाटकातील ‘दत्तपीठ यात्रा’ आणि अयोध्येपासून जनकपूरपर्यंत निघणारी ‘श्रीराम-जानकी विवाह वरात यात्रा’ अशा उपक्रमांतूनही, सामाजिक समरसता आणि एकात्मतेची भावना जागृत केली जात आहे.

श्रीरामसेतूचे रक्षण : प्रभू श्रीरामांच्या आदेशानुसार, नल आणि नील यांनी बांधलेल्या श्रीरामसेतूचे तत्कालीन सरकारच्या कथित हस्तक्षेपापासून रक्षण करण्यासाठी, विश्व हिंदू परिषदेने मोठे जनआंदोलन उभारले होते. तत्कालीन केंद्र सरकारने, सर्वोच्च न्यायालयात प्रभू श्रीरामांच्या अस्तित्वाबाबतच प्रश्न उपस्थित केल्याचा आरोपही करण्यात आला. त्यावेळी देशभरात अवघ्या चार तासांचे यशस्वी ‘चक्काजाम’ आंदोलन करण्यात आले. परिणामी, सरकारला त्याच दिवशी नमते घ्यावे लागले. दिल्लीतील सुवर्ण जयंती पार्क




प्रारंभी बजरंग दलाची धुरा विनय कटियार यांच्याकडे सोपविण्यात आली. त्यांच्यानंतर अनुक्रमे जयभान सिंह पवैया (ग्वाल्हेर, मध्य प्रदेश), डॉ. सुरेंद्र कुमार जैन (रोहतक, हरियाणा), प्रकाश शर्मा (कानपूर, उत्तर प्रदेश), सुभाष चौहान (कंधमाल, ओडिशा), राजेश पांडे (रीवा, मध्य प्रदेश), मनोज वर्मा (कन्नौज, उत्तर प्रदेश), सोहन सिंह (धार, मध्य प्रदेश) आणि नीरज दोनेरिया (आग्रा, उत्तर प्रदेश) यांनी, बजरंग दलाचे ‘राष्ट्रीय संयोजक’ म्हणून जबाबदारी सांभाळली. आज बजरंग दलाने ४२ वर्षांचा टप्पा पूर्ण केला असतानाच, या संघटनेची धुरा राजस्थानातील पाली इथल्या ४१ वर्षीय किशन प्रजापत यांच्या हाती आहे.

‘सेवा, सुरक्षा आणि संस्कार’ हे ध्येयवाय घेऊनच, बजरंग दल कार्यरत आहे. देशभरातील युवकांमध्ये राष्ट्र, धर्म, संस्कृती आणि संस्कारांची जोपासना करण्याबरोबरच शौर्य, सुरक्षा आणि स्वावलंबनाची भावना विकसित करण्यासाठीही संघटना सातत्याने सक्रिय आहे. देशाच्या कोणत्याही वृक्षारोपण, मंदिरांची स्वच्छता, तीर्थक्षेत्रांतील व्यवस्था व सुरक्षा, आजारी गायी आणि गरजू रुग्णांसाठी रुग्णवाहिकासेवा, तसेच अपघात, नैसर्गिक आपत्ती आणि महामारीच्या काळात तातडीने मदतकार्य अशा विविध सेवा, बजरंग दलाचे कार्यकर्ते निःस्वार्थ भावनेने करतात. युवकांना शारीरिकदृष्ट्या सुदृढ बनविण्यासाठी दररोज बलोपासना केंद्रे चालविणे; भक्तीतून शक्ती आणि शौर्याची प्रेरणा मिळवण्यासाठी साप्ताहिक ‘हनुमान चालीसा’ पठणाचे आयोजन करणे, तसेच विद्यार्थ्यांमध्ये संस्कार आणि मूल्यशिक्षण रुजविणे, अशी अनेक कार्येही संघटनेच्या माध्यमातून होतात. आतापर्यंत लाखो गोमातांची कसाईखान्यांकडे होणारी रवानगी रोखण्यात आल्याचा, तसेच ‘लव्ह जिहाद’च्या घटनांमधून हजारो भगिनींची सुटका केल्याची नोंद संघटनेकडे आहे.

मंदिरे आणि संतांवरील आघातांबरोबरच देश, धर्म आणि संस्कृतीवर होणार्या कोणत्याही हल्ल्याला, बजरंग दलाने नेहमीच ठामपणे प्रत्युत्तर दिले आहे.

देशातील लाखो गावांमधील ६५ कोटी लोकांना जोडले. रस्त्यापासून संसदेपर्यंत आणि सर्वोच्च न्यायालयापर्यंत आपला आवाज बुलंद करत, ४९६ वर्षांच्या संघर्षानंतर देशाच्या स्वाभिमानाचे पुनर्जागरण घडवून आणण्यात आले. अखेर दि. २२ जानेवारी २०२४ रोजी, अयोध्येत प्रभू श्रीरामललांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाली आणि या ऐतिहासिक दिवसाची सुवर्णाक्षरांनी नोंद झाली.

जिहादी दहशतवादाला आव्हान: १९९५ मध्ये दहशतवाद्यांनी अमरनाथ यात्रेला धमकी देत, ही यात्रा बंद पाडण्याचा इशारा दिला होता. यात्रेला येणारा कोणीही परत जाणार नाही, अशीच धमकी त्यांनी दिली होती. त्यावेळी बजरंग दलाच्या आवाहनाला प्रतिसाद देत, ५१ हजार बजरंगी आणि अन्य एक लाख शिवभक्तांनी ‘जय भोले’चा जयघोष करत, दुर्गम अमरनाथ यात्रेच्या दिशेने कूच केले. त्यानंतर ही यात्रा रोखण्याचे धाडस कोणीही करू शकले नाही. पुंछ जिल्ह्यातील सीमावर्ती भाग हिंदूविहीन करण्याच्या जिहादी कटाची चाहूल घेत, बजरंग दलाने २००५

येथे जमलेल्या लाखो रामभक्तांच्या जनसागरापुढे, सरकारचा हट्ट टिकू शकला नाही.

१९८४ पासून आजपर्यंत बजरंग दलाने देश, धर्म, संस्कृती आणि राष्ट्राच्या रक्षणासाठी नेहमीच अग्रभागी राहून भूमिका बजावली आहे. ‘सेवा, सुरक्षा आणि संस्कार’ हा मूलमंत्र घेऊन संस्कृत भाषा, वेद पाठशाळा आणि संस्कारांचे संवर्धन करण्यासाठीही संघटनेने अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. मात्र, धर्मांतर, ‘लव्ह जिहाद’, गोहत्या, जिहादी दहशतवाद, धार्मिकस्थळांची सुरक्षा, संस्कृती आणि संस्कारांचा र्हास, परकीय घुसखोरी, तसेच लोकसंख्येतील असमतोल यांसारखी अनेक आव्हाने आजही समाजासमोर उभी आहेत. या आव्हानांचा मुकाबला करून, हिंदू समाजाला त्यांपासून मुक्त करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याची भूमिका संघटनेकडून मांडली जाते. (लेखक विश्व हिंदू परिषदेचे राष्ट्रीय प्रवक्ते आहेत.)



## ।। श्री नवदुर्गा ।।

**शैलपुत्री**
‘शैलपुत्री ती प्रथम स्वरूपा, हिमगिरीची तनया ।
महादेवी पार्वती मंगला, मोहमयी माया ।
आई ईश्वरी देवी दुर्गा, तेजो यी माता ।
संकट निवारण्या दृढ ती, पाठीशी भक्ता ।।१।।

**ब्रह्मचारिणी**
सत्चित्त आनंदमयी प्रे ला, ब्रह्मवरददायिनी ।
ब्रह्मचारिणी तपश्चारिणी, अद्वितीय कल्याणी ।
तेजो य ती ब्रह्मस्वरूपा, सत्यानंद भवानी ।
द्वितीय स्वरूपा देवी दुर्गा, असे ब्रह्मचारिणी ।।२।।

**चंद्रघंटा**
आल्हादक प्रसन्नचंद्रमा, घंटीरूपी स्थित शिरी ।
दिव्यत्वाचे तेज मुखावर, भव्य मूर्ती गोजिरी ।
तृतीय स्वरूपा चंद्रघंटा, अस्त्र-शस्त्र दश हाती ।
आदिमाया आदिशक्ती, नवदुर्गा ती जगती ।।३।।

**कुष्मांडा**
जग उद्धरण्या त्रिविध ताप ते, उदरी विसावले ।
व्याधी दु:ख संकट हरविण्या, तत्पर ते जाहले ।
कुष्मांडा ती चतुर्थ दुर्गा, अष्टभूजा भगवती ।
चतुर्थ स्वरूपा देवी दुर्गा, कुष्मांडेची महती ।।४।।

**स्कंदमाता**
हृदयामध्ये जिच्या करुणा, वत्सल ललिता देवी
सनत कुमारांची माता, स्कंद सहोदर ते ही ।
चतुर्भुजा ती स्कंदमाता, भगवत् शक्ती म्हणती ।
पंचम स्वरूपा माता दुर्गा, ख्यात असे जगती ।।५।।

**कात्यायनी**
मातृवत्सल सुखदायिनी, देत स्नेह सावली ।
महर्षी कात्यायन ऋषींची, मानस कन्या बनली ।
महिषासुरमर्दिनी षट्‌रूपी, कात्यायनीची ख्याती ।
षष्ठम् स्वरूपा नवदुर्गा ती, कात्यायनी या जगती ।।६।।

**कालरात्री**
काळावरती मात करी ती, कालविनाशिनी दुर्गा ।
सप्तम स्वरूपा शुभंकर ती, कालरात्री दुर्गा ।
देई आशिष ती भक्तांना, प्रसन्न होऊनी चित्ती ।
नवरूपातील कालरात्री ती, सदैव देईल शक्ती ।।७।।

**महागौरी**
महान केली तपश्चर्या, दिव्य तेज प्राप्ती ।
अष्टम स्वरूपा महागौरीची गौरवर्ण कांती ।
सृष्टी व्यापक त्रिलोक जननी, अंबिका भगवती ।
अष्टम दुर्गा आणि भवानी, महागौरीची ख्याती ।।८।।

**सिद्धिदात्री**
सिद्धिदायिनी मोक्षदायिनी, सिद्धिदात्री माता ।
शक्तिदायिनी मुक्तिदायिनी, भवतारिणी भक्ता ।
कल्याणी त्रिगुणात्मक शुभदा, चैतन्याची मूर्ती ।
नवदुर्गा ती नवम स्वरूपा, सिद्धिदात्री सुखकर्ती ।।९।।

नीलकृष्ण देशपांडे

# तापत्या ग्रहापासून पृथ्वीला इशारा

पर्यावरण

मिलिंद बेंडाळे

सौरमंडळातील सर्वाधिक उष्ण ग्रह कोणता, असा प्रश्न विचारला की, बुध ग्रहाचे नाव घेतले जाते. सूर्याच्या सर्वात जवळ असल्याने बुधावरच सर्वाधिक तापमान असेल, असा सरळ तर्क मनात येतो; पण विज्ञानाचा इतिहास आणि निसर्गाचे नियम अनेकदा अशा सरळ तर्कांना छेद देतात. सूर्याच्या सर्वाधिक जवळ असूनही बुध हा सौरमंडळातील सर्वाधिक उष्ण ग्रह नाही. हा मान शुक्राला मिळतो. शुक्राच्या पृष्ठभागावरील सरासरी तापमान सुमारे ४६४ अंश सेल्सिअस असते. बुधाच्या सूर्याभिमुख भागात तापमान सुमारे ४३० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचत असले, तरी त्याच्या रात्रीच्या काळात ते उणे १९० अंश सेल्सिअसपर्यंत घसरते. शुक्रावर मात्र प्रचंड उष्णता जवळपास सतत कायम राहते. या फरकामागे सूर्यापासूनचे अंतर नव्हे, तर वातावरणाची रचना आणि हरितगृह परिणामाची ताकद हे निर्णायक घटक आहेत.

शुक्राचा अभ्यास करताना मानवाला स्वतःच्या पृथ्वीबद्दलही अनेक मूलभूत प्रश्न पडतात. एखाद्या ग्रहाचे वातावरण बदलले, हरितगृह वायूंचे प्रमाण वाढले आणि उष्णता बाहेर जाण्याचा मार्ग मर्यादित झाला, तर त्या ग्रहाचे भविष्य कसे बदलू शकते, याचे शुक्र हे सौरमंडळातील सर्वात प्रभावी उदाहरण आहे. पृथ्वी आणि शुक्र यांची परिस्थिती समान नसली, पृथ्वी लगेच शुक्रासारखी होणार नसली, तरी शुक्राचा धडा दुर्लक्षित करण्याइतका साधा नाही. शुक्र आणि पृथ्वी यांना अनेकदा 'जुळे ग्रह' म्हटले जाते. आकारमानाच्या दृष्टीने दोन्ही ग्रहांमध्ये बरेच साम्य आहे. शुक्राचा आकार पृथ्वीच्या जवळपास आहे. त्याचे वस्तुमान आणि गुरुत्वाकर्षणही पृथ्वीशी काही प्रमाणात तुलनात्मक आहे; मात्र या वरवरच्या साम्यापलीकडे गेल्यावर दोन्ही ग्रहांच्या आजच्या परिस्थितीमध्ये जमीन-अस्मानाचा फरक दिसतो. पृथ्वी जीवनाने भरलेली आहे; तर शुक्राचा पृष्ठभाग अत्यंत उष्ण, प्रचंड दाबाखालील आणि मानवाच्या कल्पनेपलीकडील प्रतिकूल परिस्थितीचा आहे. याच ठिकाणी एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो.

जवळपास एकाच काळात, सौरमंडळाच्या एकाच परिसरात आणि तुलनेने समान आकाराच्या या दोन ग्रहांचे भविष्य इतके वेगळे कसे घडले, या प्रश्नाचे उत्तर शोधताना वातावरणाची भूमिका केंद्रस्थानी येते. ग्रहाचे तापमान ठरवण्यासाठी केवळ सूर्यापासूनचे अंतर पुरेसे नसते. त्या ग्रहाचे वातावरण किती दाट आहे, त्यात कोणते वायू आहेत, सूर्याची ऊर्जा किती प्रमाणात शोषली जाते आणि पृष्ठभागावरील उष्णता पुन्हा अवकाशात किती सहजपणे जाऊ शकते, यावर ग्रहाचे हवामान अवलंबून असते. बुधाचे वातावरण अत्यंत विरळ आहे. त्यामुळे दिवसा सूर्याची उष्णता



पृष्ठभागाला थेट तापवते; रात्री ती उष्णता मोठ्या प्रमाणात अवकाशात निघून जाते.

शुक्राच्या बाबतीत नेमकी उलट परिस्थिती आहे. त्याचे वातावरण अत्यंत दाट असून त्यात कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण सुमारे ९६ टक्के आहे. हे वातावरण जणू एखाद्या प्रचंड उष्णतारोधक आवरणासारखे काम करते. सूर्याची ऊर्जा आत येते; पण पृष्ठभागाकडून बाहेर पडणारी उष्णता सहजपणे अवकाशात निघून जाऊ शकत नाही. परिणामी शुक्र एका प्रचंड नैसर्गिक भट्टीसारखा तापत राहतो. 'हरितगृह परिणाम' हा शब्द केवळ पर्यावरणीय संकटाशी जोडला जातो. प्रत्यक्षात हरितगृह परिणाम स्वतःमध्ये वाईट नाही. उलट, पृथ्वीवर जीवन टिकण्यासाठी अत्यावश्यक वातावरणातील कार्बन डायऑक्साईड, जलवाष्प, मिथेन आणि इतर काही वायू पृथ्वीवरील उष्णतेचा काही भाग धरून ठेवतात. ही प्रक्रिया नसती, तर पृथ्वीचे सरासरी तापमान आजच्या तुलनेत खूप कमी असावे आणि जीवनासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली नसती. समस्या हरिगृह परिणामामुळे नाही, तर असमतोलात आहे. पृथ्वीवर निसर्गाने लाखो वर्षांच्या प्रक्रियेत तयार केलेले एक संतुलन आहे.

महासागर कार्बन डायऑक्साईड शोषतात, जंगल कार्बन शोषून घेतात, माती आणि खडक दीर्घकालीन कार्बनचक्रात भूमिका बजावतात. वातावरण, महासागर, जमीन आणि जीवसृष्टी यांच्यातील हे संतुलन ढासळले की हवामान बदलाची प्रक्रिया वेगाने सुरू होते.

> **शुक्राच्या जळत्या पृष्ठभागाकडे पाहताना पृथ्वीने यासंदर्भातील धडा समजून घेणे आवश्यक आहे. वातावरणाचा समतोल ही निसर्गाने दिलेली कायमस्वरूपी हमी नसून सामूहिक जबाबदारी आहे. आज घेतलेले निर्णय पुढील काही वर्षांचे नव्हे, तर पुढील अनेक पिढ्यांच्या जीवनमानाचे भविष्य ठरवतील. म्हणूनच शुक्राची आग निव्वळ अंतराळातील एक घटना नाही, तर पृथ्वीच्या भविष्याबाबत निसर्गाने दिलेला गंभीर इशारा आहे.**

शुक्रावर हे संतुलन एका टोकाला पोहोचले. तेथील वातावरणातील प्रचंड कार्बन डायऑक्साईडने उष्णता अडकवण्याची क्षमता इतकी वाढवली, की ग्रहाचे पृष्ठभागीय तापमान अत्यंत उच्च पातळीवर गेले. शुक्रावरील आजचे वातावरण पृथ्वीवरील सामान्य हवामान प्रक्रियांशी तुलना करता येणार नाही इतके तीव्र आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागावरील वायुदाबाच्या तुलनेत शुक्रावरील वायुदाब ९० पटांपेक्षा अधिक आहे. ही परिस्थिती इतकी भीषण आहे की, तेथे अनेक धातूही वितळण्याच्या तापमानाच्या जवळ पोहोचतात. निसर्गातील एखादी जीवनदायी प्रक्रिया संतुलनाच्या मर्यादा ओलांडते, तेव्हा तिचे परिणाम विनाशकारी ठरू शकतात. पाणी जीवन देते; पण महापूर विनाश घडवतो. आग अन्न शिजवते; पण नियंत्रण सुटल्यावर सर्व काही भस्म करते. हरितगृह परिणामाचेही तसेच आहे. नियंत्रित आणि संतुलित स्वरूपात तो जीवनाचा आधार आहे; पण अतिरेक झाला, तर ग्रहाचे स्वरूपच बदलू शकतो. शुक्रावर पाणी होते का, असा प्रश्न सर्वांना पडतो. काही वैज्ञानिक मॉडेल आणि संशोधनांनुसार सौरमंडळाच्या सुरुवातीच्या काळात शुक्र आजइतका कोरडा आणि भयानक उष्ण नव्हता. तेथे मोठ्या प्रमाणावर पाणी आणि कदाचित महासागरही असण्याची शक्यता व्यक्त केली जाते. ही कल्पना खरी ठरल्यास शुक्राचा इतिहास पृथ्वीच्या भविष्यासंदर्भात आणखी महत्त्वाचा ठरतो. पाणी हे केवळ जीवनासाठी आवश्यक घटक नाही, तर हवामान नियंत्रित करणार्या प्रणालीचाही प्रमुख भाग आहे. कार्बन डाय ऑक्साईड शोषतात आणि जागतिक हवामानाला स्थैर्य लाभण्यास मदत करतात.शुक्रावर तापमान वाढत गेल्यानंतर पाण्याचे मोठ्या प्रमाणात बाष्पीभवन झाले असावे. वातावरणात अधिक जलवाष्प गेले. जलवाष्प हे स्वतःही प्रभावी हरितगृह वायू असल्याने तापमानवाढीची प्रक्रिया आणखी वेगाने पुढे गेली असण्याची शक्यता आहे. अजून एक प्रकारचा फिडबॅक लूप तयार होतो. तापमान वाढल्याने अधिक पाणी बाष्पीभवन होते. अधिक जलवाष्पामुळे हरितगृह परिणाम वाढतो. त्यामुळे तापमान आणखी वाढते. हा क्रम एखाद्या मर्यादेपलीकडे गेला की, परिस्थिती स्वतःला अधिक तीव्र बनवू लागते. त्याच वेळी पाण्याचे महासागर कमी झाल्याने कार्बन डायऑक्साईड शोषून घेणारी नैसर्गिक व्यवस्था कमकुवत होते. परिणामी, अधिक कार्बन डायऑक्साईड वातावरणात जमा होते आणि उष्णतावाढीचा वेग वाढतो. या प्रक्रियेला विज्ञानात अ ग्रीनहाऊस इफेक्ट' शी जोडून पाहिले जाते.

शुक्राच्या इतिहासात ही प्रक्रिया नेमकी कोणत्या पद्धतीने आणि कोणत्या कालखंडात घडली, यावर संशोधन सुरू असले, तरी आज शुक्राची स्थिती अत्यंत तीव्र हरितगृह परिणामाचे उदाहरण असल्याबद्दल शंका नाही.

शुक्राचा उल्लेख होताच पृथ्वीच्या भविष्यासंदर्भात अनेकदा भीती निर्माण करणारी तुलना केली जाते. 'पृथ्वीही एक दिवस शुक्रासारखी होईल का?' असा प्रश्न उपस्थित केला जातो. या प्रश्नाचे उत्तर देताना विज्ञानापेक्षा सनसनाटीपणाला जास्त महत्त्व देणे धोकादायक आहे. पृथ्वी आणि शुक्राच्या परिस्थिती भिन्न आहेत.

पृथ्वीवर महासागर आहेत, सक्रिय जलचक्र आहे, जैवविविधता आहे आणि वातावरणाची रचना पूर्णपणे वेगळी आहे.

पृथ्वीच्या हवामानातील बदल म्हणजे तत्काळ शुक्रासारखी परिस्थिती निर्माण होईल, असा निष्कर्ष काढणे वैज्ञानिकदृष्ट्या योग्य नाही; परंतु याचा अर्थ शुक्राकडून मिळणारा इशारा दुर्लक्षित करावा, असेही नाही.